महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे - ४११००१

# मार्गदीपिका

## कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५

भाग ४

# वकिलांची भूमिका

कौटुंबिक हिंसा पीडित महिलेला न्याय मिळवून देताना……





लेखक : रमा सरोदे

'सहयोग', पुणे

आणि

स्त्री अभ्यास केंद्र,

आयएलएस विधी महाविद्यालय,

पुणे

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे - ४११००१

# मार्गदीपिका

## कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५

भाग ४

# वकिलांची भूमिका

कौटुंबिक हिंसा पीडित महिलेला न्याय मिळवून देताना......





लेखक : रमा सरोदे

'सहयोग', पुणे

आणि

स्त्री अभ्यास केंद्र,

आयएलएस् विधी महाविद्यालय,

पुणे


SWISSAID

# ‘कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’

ह्या कायद्याखाली नेमलेल्या

# अधिकारी आणि सेवा पुरविणाऱ्यांसाठी मार्गदीपिकांचे ७ भाग

| | | |
|---|---|---|
| भाग १ | लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा | - मिलिंद चव्हाण |
| भाग २ | न्यायदंडाधिकाऱ्यांची भूमिका | - जया सागडे |
| भाग ३ | संरक्षण अधिकाऱ्यांची भूमिका | - प्रसन्ना इनवल्ली |
| भाग ४ | वकिलांची भूमिका | - रमा सरोदे |
| भाग ५ | वैद्यकीय सेवा देणाऱ्यांची भूमिका | - संगीता रेगे<br>- पद्मा देवस्थळी<br>- सुजाता आयार्कर |
| भाग ६ | पोलिसांची भूमिका | - मेधा देव<br>- तृप्ती पांचाल |
| भाग ७ | सेवादायी संस्थांची भूमिका | - प्रसन्ना इनवल्ली |

© स्वीसएड, सर्व लेखक; आय्एल्एस् विधी महाविद्यालय आणि महिला व बाल विकास बिभाग, महाराष्ट्र राज्य.

प्रकाशक : मा. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१

२३.१२.२०१९

CHIEF JUSTICE
HIGH COURT AT BOMBAY
सत्यमेव जयते

# संदेश

कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ हा दिवाणी स्वरुपाचा महत्वाचा कायदा आहे. हया कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी अनेक घटकांवर जबाबदारी टाकलेली आहे. त्यातील न्यायाधिश आणि न्याययंत्रणा हा एक महत्वाचा घटक आहे.

कौटूंबिक हिंसेची समस्या गंभीर, गुंतागुंतीची आहे. पुरुषप्रधान आणि पितृसत्ताक समाजरचनेत, लिंगभावाधीष्ठीत होणारी हिंसा (शारीरिक, मानसिक, लैंगिक, आर्थिक, शाब्दिक) स्त्री–पुरुषामध्ये भेदभाव निर्माण करते. ही हिंसा स्त्रीच्या मानवी हक्कांचे आणि राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करते. हया पार्श्वभूमीवर कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाच्या कायदयाखालील येणाऱ्या प्रकरणांमध्ये न्यायालयांचा दृष्टीकोन अधिक संवेदनशिल असणे अपेक्षित आहे असे माननिय सर्वोच्च न्यायालयाने *कृष्णा भटाचारजी वि. सारथी चौधरी* (क्रिमिनल अपिल नंबर.१५४५/२०१५ निर्णय दिनांक २० नोव्हेंबर, २०१५) या न्यायनिर्णयात नमूद केलेले आहे.

कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ हा कायदा स्त्रियांच्या हितासाठी केलेला आहे. त्यामुळे कायद्यातील तरतुदीचा अन्वयार्थ लावताना एकापेक्षा जास्त अर्थ निघत असतील तर कायदयांच्या उद्दिष्टाला पूरक असा अर्थ निवडला पाहिजे. स्त्रियांना तो त्यांना जास्तीत जास्त न्याय्य कसा ठरेल हयाचा विचार व्हायला हवा.

आयएलस विधी महाविद्यालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राने पुढाकार घेउन दंडाधिकाऱ्यांच्यासह संरक्षण अधिकारी, पोलीस, वैद्यकीय अधिकारी, सेवा देणाऱ्या संस्था आणि वकील हयांच्यासाठी तयार केलेल्या मार्गदीपिकांचे मी स्वागत करतो. या सर्व मार्गदीपिका कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ मधील तरतुदींबाबत सर्वसमावेशक आहेत. विशेष म्हणजे 'लिंगभाव आणि कौटूंबिक हिंसा' ह्याविषयावरील स्वतंत्र मार्गदीपिका सर्व संबधित घटकांना उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो.

सर्व हितसंबधाना माझ्या शुभेच्छा !

१६ ऑक्टोबर २०१८

(न्यायमुर्ती नरेश ह. पाटील)

# ऋणनिर्देश

“पीडब्ल्यूडीव्हीए कादयाखालील सर्व हितसंबंधियांसाठी मार्गदीपिका तयार करणे” ह्या प्रकल्पाला दिलेल्या अर्थसाहाय्यासाठी आणि संकल्पनात्मक रचनेसाठी आम्ही ‘स्विसएड इंडियाचे’ ऋणी आहोत.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश माननीय न्यायमूर्ती श्री. नरेश पाटील ह्यांनी दिलेल्या संदेशाबद्दल आम्ही त्यांचे विशेष ऋणी आहोत.

अनेक सहकार्यांच्या सहभागामुळेच हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला. या सर्वांचेही आम्ही ऋणी आहोत. त्यांचा नामनिर्देश पुढीलप्रमाणे:

**लेखक**

- मार्गदीपिका - वकिलांची भूमिका - रमा सरोदे, आणि त्यांचे सहकारी असीम सरोदे ‘सहयोग’, पुणे, आणि इतर वकील
- मार्गदीपिका - वैद्यकीय सुविधा देणाऱ्यांची भूमिका - संगीता रेगे, पद्मा देवस्थळी, आरथी चंद्रशेखर, सुजाता आयार्कर - सेहत (CEHAT), मुंबई, आणि ‘दिलासा’ केंद्राचे सहकार - चित्रा जोशी, मृदुला सावंत, संजना चिक्लेकर
- मार्गदीपिका - पोलिसांची भूमिका - मेधा देव, तृप्ती पांचाल - टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या, RCI-VAW आणि या विभागातील सहकारी - नंदकिशोर डहाळे, शीतल देवस्थळी, सुनिता पवार - मुंबई
- मार्गदीपिका - लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा - मिलिंद चव्हाण, लिंगभाव प्रशिक्षक, पुणे
- संरक्षण अधिकाऱ्यांची भूमिका लिहिताना प्रसन्ना इनवल्ली यांना महाराष्ट्र महिला-बाल विकास आयुक्तालय, आणि शहरी व ग्रामीण भागातील काही संरक्षण अधिकाऱ्यानी दिलेल्या माहितीबद्दल तसेच मार्गदीपिकेच्या कच्च्या मसुद्यावर प्रतिक्रया दिल्या बाबत आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**अनुवाद साहाय्य**

सुषमा देशपांडे

**इतर साहाय्य**

आय्एल्एस् विधी महाविद्यालयचे - अशोक माळवदे, योगेश सोनावणे, शुभांगी पुराणिक, प्रमोद राणे, हरिभाऊ दोडके, चंद्रकांत घुमे, वेंकट घतकार

**छपाई**

जलाराम कॉपियर्स, पुणे

**सर्वांना पुनः एकदा मनापासून धन्यवाद!**

## दोन शब्द ...

### सुरवात करताना ...

स्त्रियांवर होणारी कौटुंबिक हिंसा हा भारतातीलच नव्हे तर जगातील एक गंभीर सामाजिक प्रश्न आहे. कौटुंबिक हिंसेचे गंभीर आणि दूरगामी परिणाम केवळ स्त्रियांच्या आयुष्यावरच नाही तर कुटुंब आणि समाजावर होत असतात. २००५ पर्यंत कौटुंबिक हिंसेचे प्रश्न हे फौजदारी कायद्यातून हाताळले गेले होते. मात्र त्यातून पीडित स्त्रीची कुटुंबात राहून हिंसा थांबावी ही इच्छा पुरी होत नव्हती. उलट हिंसा करणाऱ्या सासरच्या लोकांना तुरुंगवासाची शिक्षा होत होती. त्यामुळे, ती कुटुंबापासून तुटत होती. या पार्श्वभूमीवर देश भरातील महिला संघटनांनी/ सामाजिक संघटनांनी एकत्रित आवाज उठवून कौटुंबिक हिंसेसंदर्भात दिवाणी स्वरूपाचा कायदा हवा, अशी मागणी केली. लॉयर्स कलेक्टिवने पुढाकार घेऊन 'कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण कायद्याचे' प्रारूप तयार केले. देशातील वेगवेगळया भागांमध्ये जाऊन संघटनांबरोबर चर्चा करून या प्रारुपात बदल केले गेले आणि ते सरकारला सादर करण्यात आले. संसदेच्या दोन्ही गृहांनी या कायद्याला मान्यता दिली, आणि 'कौटुंबिक हिंसे पासून महिलांचे संरक्षण अधिनियम' *(पीडब्ल्यूडीव्हीए* - Protection Of Women from Domestic Violence Act) २००५ मध्ये अस्तित्वात आला. त्यानंतर या कायद्याखालील नियमांची बांधणी झाल्यावर २६/१०/२००६ रोजी या कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली.

या कायद्याची अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्यापैकी एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी नेमलेली यंत्रणा. ह्या यंत्रणेचे न्यायाधीश, संरक्षण अधिकारी, वकील, वैद्यकीय सेवा देणारे, सेवादायी संस्था आणि पोलीस हे घटक आहेत.

ह्या सर्व घटकांच्या ह्या कायद्याअंतर्गत असलेल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये स्पष्ट करण्यासाठी स्त्री अभ्यास केंद्राने अनेक प्रशिक्षणे 'स्विसएड इंडिया'च्या आर्थिक साहायाने आयोजित केली. प्रत्येक प्रशिक्षणात 'लिंगभाव' या विषयावर  वर स्वतंत्र दीर्घ सत्र घेण्यात आले. अशी प्रशिक्षणे देशभर अनेक संस्था आयोजित करत होत्या. त्यामुळे अनेकांनी सर्व घटकांना उपयोगी होतील अशी मॅन्युअल्स तयार केली होती. मात्र मराठीत अशा प्रकारचे साहित्य उपलब्ध नव्हते. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक टप्प्यावर कसे काम करायचे, पिडीतेला न्याय मिळण्याच्या दृष्टीने कोणती पाऊले उचलायला पाहिजेत, काय खबदारी घ्यायची, इत्यादी मुद्द्यांच्या संदर्भात साहित्य निर्माण करण्याची गरज होती. स्त्री अभ्यास केंद्राने या कायद्याखालील नेमलेल्या यंत्रणेतील सर्व हितसंबंधीयांसाठी अशा प्रकारचे मराठीत साहित्य तयार करण्याचा दृष्टीने स्विसएड इंडियाच्या आर्थिक साहाय्याने एक प्रकल्प हाती

घेतला. या प्रकल्पाअंतर्गत १. **न्यायाधीश**, २. **संरक्षण अधिकारी**, ३. **वकील**, ४. **वैद्यकीय सेवा देणारे**, ५. **सेवादायी संस्था** आणि ६. **पोलीस** - ह्या प्रत्येक हितसंबंधियांसाठी स्वतंत्र मार्गदीपिका तयार करण्याचे ठरविले.

*पीडब्ल्यूडीव्हीए* कायद्याची बांधणी स्त्रीवादी भूमिकेतून स्त्रियांचे मुलभूत हक्क आणि मानवी हक्क यांची जपणूक आणि संवर्धन व्हावे या पायावर आधारित आहे. कौटुंबिक हिंसा स्त्रियांचा सन्मानाने जगण्याचा अधिकार काढून घेते आणि स्त्री-पुरुषामध्ये भेदभाव करते. या सर्व मुद्द्यांचा विचार करता स्त्रियांवर होणाऱ्या कौटुंबिक हिंसेकडे लिंगभावाच्या दृष्टिकोनातून बघणे फार आवश्यक आहे. अर्थातच त्यासाठी लिंगभाव म्हणजे काय हेही स्पष्ट असायला हवे. म्हणून वरील सहा मार्गदीपिकांबरोबरच **'लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा'** ही स्वतंत्र सातवी मार्गदीपिका तयार करण्याचे ठरविले.

ह्या सातही मार्गदीपिका लिहिण्यासाठी वेगवगळ्या हितसंबंधीयांच्या बरोबर *पीडब्ल्यूडीव्हीए* कायद्याखाली ज्यांनी विशेष काम केले आहे त्यांना लिहिण्याची विनंती करायची असे ठरवले. वकिलांसाठी सहयोग संस्था, पुणे; वैद्यकीय सेवा देणाऱ्यासाठी - सेहत संस्था, मुंबई; पोलिसांसाठी - टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई; यांना विनंती केली. 'लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा या मार्गदीपिकेसाठी' - श्री. मिलिंद चव्हाण, लिंगभाव प्रशिक्षक; यांना विनंती केली. सर्वानीच मार्गदीपिका लिहिण्याचे तत्परतेने मान्य केले. स्त्रीअभ्यास केंद्राने न्यायाधीश, संरक्षणअधिकारी आणि सेवादायी संस्था यांच्यासाठी मार्गदीपिका लिहिण्याची जबाबदारी घेतली.

ह्या सातही मार्गदीपिका आपल्यासमोर सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. केवळ स्विसएड इंडिया, ह्यांच्या आर्थिक साहाय्यामुळेच हे आम्हाला शक्य झाले.

ह्या मार्गदीपिका **सर्व हितसंबंधियांना आणि प्रशिक्षकांनाही** उपयुक्त ठरतील असा आम्हाला विश्वास वाटतो.

**डॉ जया सागडे** | **प्रसन्ना इनवल्ली**
**मानद संचालिका** | **समन्वयक**

**स्त्री अभ्यास केंद्र,**

**आय्एल्एस् विधी महाविद्यालय, पुणे**

२० ऑक्टोबर २०१८

# महिला व बाल विकास आयुक्तालय

## महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते
GOVERNMENT OF MAHARASHTRA

२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस शेजारी, पुणे- ४११००१

फोन : ०२०- २६३३००४० Email : commissionerwcd@ymail.com


क्र. : मबाविआ/ ६२०५ दिनांक : २३/१२/२०१९

### "संदेश"

महाराष्ट्र राज्याने महिलांच्या विविध प्रश्नांवर व त्यांच्यासाठी करण्यात आलेल्या उपायावर अनेक योजनांवर प्रगत पाऊले उचलली आहेत.राज्यपातळीवर कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ ची अंमलबजावणी महिला व बाल विकास विभागामार्फत सुरु आहे.या कायदयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संरक्षण अधिका-यांच्या नियुक्त्या करणे, त्यांचे प्रशिक्षण,त्यांच्या कार्यालयांना सोयी सुविधा पुरविणे, कायदयाच्या सनियंत्रणासाठी मुल्यांकन पध्दती विकसीत करून सांख्यिकी माहिती जिल्हा व तालुकास्तरावर अदयावत ठेवणे इ.अनेक महत्वाची कामे विभागामार्फत पार पाडली जात आहेत.

PWDVA २००५ कायदयाची अंमलबजावणीची जबाबदारी जरी विभागाची असली तरी या कायदयांतर्गत निश्चित केलेले सर्व स्टेकहोल्डर्स / सहभागी यंत्रणा यांची ही तितकीच महत्वाची जबाबदारी आहे. आय एल एस विधी महाविदयालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राने सर्व सहभागी यंत्रणा / स्टेकहोल्डर्स जसे की, संरक्षण अधिकारी, वकील,पोलीस,वैदयकीय सेवा देणारे,सेवादायी संस्था आणि मा. न्यायदंडाधिकारी यांच्यासाठी तयार केलेल्या मार्गदर्शिका हया अत्यंत उपयुक्त असून त्याचा वापर सर्व स्टेकहोल्डर्सनी स्वतःच्या दैनंदिन कामात करणे आवश्यक आहे.जेणे करून पिडीत महिलेला लवकरात लवकर सर्व सेवा देणे शक्य होईल.

या मार्गदर्शिकेमध्ये दैनंदिन कामातही उदाहरणे देऊन टप्प्या टप्प्याने सर्व स्टेकहोल्डर्सच्या / सहभागी यंत्रणाच्या भूमिका व जबाबदा-या अधिक स्पष्ट करून सांगण्यात आल्या आहेत व त्या प्रत्येकासाठी उपयुक्त आहेत.

याबदल आय एल एस् विधी महाविदयालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राचे विशेष आभार व PWDVA २००५ या कायदयाच्या अंमलबजावणीसाठी काम करणा-या सर्व सहभागी संस्था / यंत्रणा यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा !

(डॉ.हृषीकेश यशोद )
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य,पुणे

मार्गदीपिका

'कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५'

**वकिलांची भूमिका**

# अनुक्रमणिका


१.० प्रस्तावना....3

**विभाग अ - पीडितेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांसाठी**....7

२.० कारवाईपूर्व टप्पा....7

२.१ विश्वासाचे आणि व्यावसायिक नाते निर्माण करावे....8

२.२ सदर कायद्याखाली केसची अर्हता तपासावी....10

२.३ माहिती देऊन त्यातून निवड करण्यास मदत करावी.....15

२.४ जोखीम किती आहे याचा अंदाज घेऊन त्यानुसार सुरक्षेचे उपाय योजावेत.....18

२.५ सदर कायद्याखाली नेमलेल्या अनेक मदत करणाऱ्या सहभागी घटकांच्या सेवा कशा वापराव्यात याची माहिती द्यावी.....19

२.६ गुप्तता बाळगली जाईल याची हमी द्यावी.....21

२.७ सदर कायद्याच्या १२ कलमान्वये अर्ज लिहावा.....21

२.८ पीडितेने केलेल्या आरोपांसाठी पुरावा मिळवा....40

२.९ अशिलाचा अन्य सेवांशी संपर्क घडवून आणा:....41

अर्ज तयार करताना लक्षात ठेवण्याचे काही मुद्दे....42

३.० कारवाई चालू असताना....44

३.१ अर्ज न्यायालयात फाईल करणे:....44

३.२ नोटीस बजावणे:....49

३.३ प्रतिवादीचे लेखी निवेदन आणि खटल्यास सामोरे जाणे:....51

३.४ गरजेनुसार समुपदेशकाकडे जाण्याबाबत निर्देश मागणे/करणे:....51

३.६ पुरावा नोंदवणे :....54

३.७ युक्तिवाद: .......... 56

३.८ अंतिम आदेश : .......... 56

४.० कारवाईपश्चात टप्पा .......... 57

४.१ अंतिम आदेशाची अंमलबजावणी .......... 57

४.२ संरक्षण आदेशाचा भंग : .......... 59

४.३ अपील .......... 61

५.० पीडिता वापरू शकेल असे अन्य कायदे .......... 61

**विभाग ब - प्रतिवादीचे प्रतिनिधित्व करणारे वकील** .......... 63

प्रतिवादीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांची उद्दिष्टे सदर कायद्याच्या मोठ्या उद्दिष्टांशी खालील काही प्रकारे मिळती जुळती असतात .......... 63

परिशिष्टे .......... 66

# मार्गदीपिका

# ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’

# **वकिलांची भूमिका**

## १.० प्रस्तावना

कौटुंबिक हिंसेच्या केसमध्ये पीडितेचा प्रतिनिधी म्हणून वकिलाची भूमिका फार महत्त्वाची असते. वकील हा पीडिता आणि न्यायदान व्यवस्था यांना जोडणारा दुवा असतो. कायद्याचा सल्ला देण्याची भूमिका ती/तो बजावत असते/असतो, पण त्याही पलीकडे जाऊन पीडितेस अन्यायाविरुध्द आणि हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा देणे तिच्या सबलीकरणासाठी तितकेच महत्त्वाचे असते.

**ही भूमिका बजावण्यासाठी वकिलात जे महत्त्वाचे गुण असावे लागतात ते असे**

- समानुभूतीने स्वतःला पीडितेच्या जागी मानून हिंसेत जे काही सूक्ष्म फरक आहेत ते समजून घेणे.
- कायद्यातील फार कठीण शब्द न वापरता साध्या, सुबोध आणि सोप्या भाषेत पीडितेशी बोलणे म्हणजे तिला काय चालले आहे ते कळेल आणि ती घाबरून जाणार नाही.
- केसच्या चांगल्या आणि वाईट बाजू पीडितेस समजावून सांगण्याची क्षमता असणे तसेच अन्य कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ (सदर कायदा) खाली नेमलेल्या सहभागी घटकांशी (स्टेक होल्डर्स) संपर्क असणे.
  (ह्या अधिनियमाचा यापुढे सदर कायदा असा उल्लेख केला जाईल याची नोंद घ्यावी.)
- पीडितेस अशा पध्दतीने साहाय्य करण्याची तयारी असणे, जेणेकरून ती स्वतः केसचा ताबा घेण्यास शिकेल.
- पीडितेस काय हवे आहे ते सांगण्यासाठी तिला अवसर देणे, म्हणजे जे मार्ग व्यवहार्य असतील त्यांच्यावर चर्चा करून त्याप्रमाणे अर्जात कायदेशीर विनंती/ प्रार्थना करता येईल.
- प्रत्येक केस ही वेगळी असते म्हणून तिला वेगळेपणाने हाताळण्याची क्षमता असणे.

कृपया नोंद घ्यावी: **योग्य ते कायदेशीर धोरण स्वीकारण्यासाठी केस फक्त कायद्याच्या दृष्टिकोनातून समजून घेऊ नये तर त्या पीडितेचा सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संदर्भही विचारात घ्यावा.**

या मार्गदीपिकेतून पीडितेच्या वकिलांबरोबरच प्रतिवादीच्या वकिलाससुध्दा संबोधण्याचे खालील हेतू आहेत.

- **कौटुंबिक नातेसंबंध हे हिंसामुक्त** असावेत हा या कायद्यामागील मूळ उद्देश आहे ते समजेल आणि ते आकलन कायम राहील.
- पीडितेचा वकील आणि प्रतिवादीत हिंसा थांबवण्यासाठी **संवाद व्हावा** आणि असा दृढविश्वास निर्माण व्हावा की **कुठल्याही सबबीखाली कौटुंबिक हिंसा करता येत नाही.**
- **कौटुंबिक हिंसेच्या केसमध्ये वकिली करणे हे फक्त जिंकणे किंवा हरणे एवढ्यापुरते मर्यादित नाही तर वकिलांमध्ये हिंसा थांबवण्याची क्षमता असते व ते सकारात्मक मानवी नातेसंबंध** निर्माण करून त्यातून व्यापक समाजहित साधू शकतात हा दृष्टिकोन विकसित झाला पाहिजे.
- दोन्ही अशिलांचा कौटुंबिक हिंसेस विरोध असावा यावर भर देण्यासाठी त्यांच्यात त्यांचे **वकील परिवर्तन घडवून** आणू शकतात हा विश्वास जोपासला जावा.

पहिल्या भेटीपासून ते आदेशांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंतच्या प्रवासात वकिलांनी अशिलाशी कसे वागावे हे वाचकांना या मार्गदीपिकेत उलगडून सांगितले आहे.

ती दोन विभागात मांडली असून **अ** विभाग पीडितेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांसाठी तर **ब** विभाग प्रतिवादीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांसाठी आहे.

**सदर कायद्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये**

‘लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा’ या पहिल्या भागातील चर्चेनुसार सदर कायदा हा एका सल्लामसलतीच्या प्रक्रियेतून अस्तित्वात आला. ही सल्लामसलत कौटुंबिक हिंसा पीडिता, महिलांच्या हक्कांना पाठिंबा देणाऱ्या संस्था, आणि कायदा तयार करणारे यांच्यात घडली. त्याचा परिणाम म्हणजे दिवाणी स्वरूपाचा परंतु ज्याला काही विशिष्ट फौजदारी अर्थ आहे असा कायदा निर्माण झाला.

**स्त्रिया ह्या पीडित, असक्षम असतात ह्या वस्तुस्थितीवर हा कायदा स्त्रियांना संबोधतो— सदर कायदा हा एक हितकारक कायदा म्हणून तयार केला गेला:** पहिल्या भागात

आपल्या पितृसत्ताक आणि पुरुषी वर्चस्व असलेल्या समाजात स्त्रिया हिंसेस तोंड देताना असक्षम असतात आणि सत्तासंबंध लिंगाधिष्ठित आहेत, ते तसेच न बदलता राहावेत यासाठी हिंसेचा वापर कसा केला जातो असे वर्णन केले आहे. सदर कायदा या असक्षम गटाची, स्त्रियांची दखल घेतो म्हणून तो हितकारी कायदा समजला जातो. 'हिंसा थांबवा' आदेश म्हणजेच संरक्षणाचा आदेश देऊन तो महिलांना कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण देतो. या कायद्यान्वये पुरुषांना संरक्षण मिळू शकत नाही.[1]

**'कौटुंबिक हिंसे'ची व्यापक व्याख्या करतो: सदर कायद्याने** शारीरिक, भावनिक,लैंगिक, आणि आर्थिक अशा सर्व प्रकारच्या छळाचा समावेश करून कौटुंबिक हिंसेची व्याख्या केली आहे.

**कौटुंबिक हिंसेतील पीडितेस तोडगा सुचवतो- सदर कायदा हा एक दिवाणी कायदा आहे:** या मार्गदीपिकेच्या भाग एक मध्ये चर्चा केल्याप्रमाणे कौटुंबिक हिंसेची समस्या सोडवण्याच्या अन्य सर्व मार्गांचा अवलंब करून पाहिल्यानंतर (नाईलाजाने) कायदा हा अगदी शेवटचा आधार म्हणून स्त्री त्याच्याकडे पाहते हा नेहमी येणारा अनुभव आहे. वैवाहिक नातेसंबंधांना धक्का न लागू देता हिंसा थांबावी अशीच तिची बरेचदा अपेक्षा असते. नातेसंबंध टिकवून तिला न्याय हवा असतो. म्हणून कायद्याने तिला हिंसा थांबवण्याचा तोडगा देणे आणि तिला घरातच सुरक्षितपणे राहता येणे हे महत्त्वाचे आहे. तिच्या कुटुंबातील तिला त्रास देणाऱ्यांना गुन्हेगार ठरवून तिची समस्या सुटणार नसते. हे लक्षात घेऊन सदर कायदा हा दिवाणी कायदा बनवला गेला.

**हिंसेचा सामना करण्यासाठी अनेक कायदेशीर पर्याय पुरवतो:** हा कायदा हिंसेचा सामना करण्यासाठी स्त्रीस अनेक पर्याय देण्याचा प्रयत्न करतो. हा कायदा जसे कौटुंबिक हिंसामुक्त जीवन जगण्याचा हक्क प्रस्थापित करतो तसेच तो एकत्रित घरात राहण्याच्या हक्कासाठी निवासाचा आदेश देतो, आर्थिक भरपाईचा आणि साहाय्याचा तसेच मुलांच्या ताब्याचा आदेश देतो. तो अंतरिम आदेश आणि तत्काळ साहाय्य  मिळण्यासाठी एकतर्फी आदेशांची तरतूद करतो.  सदर कायद्याखाली ती महिला फौजदारी केससुध्दा दाखल करू शकते.

**कौटुंबिक हिंसा पीडितेस बोलणी/ वाटाघाटी करण्यास वाव उपलब्ध करून देतो :** सदर कायदा महिलेवर आणि तिच्या मुलांवर होत असलेली हिंसा थांबवण्याचा सर्वप्रथम आणि प्राधान्याने प्रयत्न करतो हे निःसंशय! आपण मार्गदीपिकेच्या पहिल्या भागात पाहिले की पितृसत्ताक पध्दतीतील लिंगाधिष्ठित सत्तेचे नातेसंबंध हे हिंसेचे मूळ कारण आहे. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की न्यायालयाच्या आदेशामुळे हिंसा थांबल्यास त्या पीडितेस या

---

[1] निशी गुप्ता वि. राहुल गुप्ता या केसमध्ये याची पुनरोक्ती झाली (RLW2009(2)Raj1091) यात न्यायालयाने  असे सांगितले की सदर कायद्याखाली केलेला मुलाच्या ताब्याचा अर्ज मान्य करता येत नाही कारण अर्जदार नवरा, एक पुरुष आहे.

सत्तेच्या नातेसंबंधात बोलणी/ वाटाघाटी करण्यास जी समानतेवर आधारलेली भूमिका हवी असते ती मिळते.

**प्रतिवादीच्या पुढील कौटुंबिक हिंसेस पायबंद बसतो** : न्यायालयाकडून हिंसा थांबवण्याचा आदेश मिळून (संरक्षण आदेश)सुध्दा प्रतिवादीने हिंसा चालूच ठेवली तर हा कायदा दिवाणी असूनही ह्या कायद्यानुसार त्याच्याविरुध्द फौजदारी कारवाई करता येते.

**कौटुंबिक हिंसेचा सामना करण्यासाठी पीडितेस अनेक प्रकारे हा कायदा साहाय्य पुरवतो:** कायदेशीर पर्यायांव्यतिरिक्त हा कायदा पीडितेस आधारसेवांचा हक्क पुरवतो. त्यातून ती पीडिता संरक्षण अधिकारी, पोलिस, आधार गृह, वैद्यकीय सुविधा, कायदे सुविधा, आणि कौटुंबिक हिंसेविरोधी कायद्याखाली नोंद झालेल्या स्वयंसेवी संघटना आणि अशासकीय संघटनांच्या सेवांचे साहाय्य  घेऊ शकते.

## विभाग अ - पीडितेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांसाठी

पहिल्या भेटीपासून ते आदेशांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंतच्या प्रवासात वाचकांना नेऊन वकिलांनी अशिलाशी कसे वागावे हे सांगण्यासाठी, हा भाग तीन टप्प्यांमध्ये सादर करून त्यावर चर्चा केली आहे. ते तीन टप्पे असे - १. कारवाईपूर्व, २. प्रत्यक्ष कारवाई, आणि ३. कारवाईपश्चात टप्पा.

**‘कारवाई पूर्व’** टप्प्यात अशील वकिलाकडे आल्यापासून ते केस फाईल करण्याचा निर्णय होईपर्यंत वकील काय करू शकतो त्याचा तपशील दिलेला आहे.

**‘कारवाई चालू’** असतानाच्या टप्प्यात कारवाईची प्रक्रिया आणि ती चालू असताना वकील आपल्या अशिलांना कशी मदत करतात ते दिले आहे.

आणि ‘**कारवाईनंतरच्या’** टप्प्यात वकील अशिलास आदेशाची अंमलबजावणी करण्यात आणि / किंवा अपील करण्यात कसे साहाय्य करतात ते दिलेले आहे.

## २.० कारवाईपूर्व टप्पा

१. विश्वासाचे आणि व्यावसायिक नाते निर्माण करावे.
२. सदर कायद्याखाली केसची अर्हता तपासणे.
३. माहिती देऊन त्यातून निवड करण्यास साहाय्य करावे.
४. जोखीम किती आहे याचा अंदाज घेऊन त्यानुसार सुरक्षेचे उपाय योजावेत.
५. मदत करणाऱ्या अनेक सहभागी घटकांच्या[2] सेवा कशा वापराव्यात याची माहिती द्यावी.
६. गुप्तता बाळगली जाईल याची हमी द्यावी.
७. सदर कायद्याच्या 12 कलमान्वये अर्ज लिहावा.
८. पीडितेने केलेल्या आरोपांसाठी पुरावा मिळवा.
९. अशिलाचा अन्य सेवांशी संपर्क घडवून आणावा.

[2] सदर कायद्यांतर्गत नेमलेल्या सर्व प्रकारच्या अधिकाऱ्यांना या मार्गदीपिकेत ‘सहभागी घटक’ असे नमूद केले आहे

## २.१ विश्वासाचे आणि व्यावसायिक नाते निर्माण करावे

वकील आणि अशिलास न्याय मिळवण्यासाठी आणि प्रतिवादीबरोबरच्या समस्या सोडवण्यासाठी एकत्र काम करायचे असते. दोघांमध्ये जर विश्वासाचे आणि व्यावसायिक नाते निर्माण झाले तर ह्या खाचखळग्यांनी भरलेल्या रस्त्यावर दीर्घकाळासाठी चालणे सुकर होईल. या कायद्यामुळे पीडिता स्त्री असल्यामुळे हिंसा सहन करणाऱ्या महिलेबरोबर वकिलाचा प्रवास सुरू होतो. कायद्याच्या मदतीने परिस्थितीचा ताबा तिच्याकडे देण्यासाठी आणि तिच्या हक्कांवर दावा करण्यासाठी तिला सक्षम बनवणे हे वकिलाचे काम असते. म्हणूनच विश्वासाचे आणि व्यावसायिक नाते निर्माण करणे हे आणखीच महत्त्वाचे होऊन बसते. हे साध्य करण्यासाठी जे काही मार्ग आहेत ते खाली दर्शवले आहेत –

### २.१.१ तिचा स्वीकार करावा :

पीडिता ही असुरक्षित असते आणि ती अनुभवत असलेली हिंसा थांबवण्याचे सर्व प्रयत्न फोल ठरल्यानंतर फार मोठ्या अपेक्षेने आणि आशेने वकिलाकडे येते. ती कुटुंबीयांकडे तसेच मैत्रिणींकडे आधारासाठी जाऊन आलेली असते, समुपदेशकाकडे गेलेली असते परंतु सर्व प्रयत्न फोल ठरल्यामुळे ती नाईलाजाने शेवटचा उपाय म्हणून कायद्याचा आधार घेते. अशा वेळी जो समानुभूतीने न्यायालयात तिच्या हक्कांसाठी लढेल, न्याय मिळवण्यासाठी हुज्जत घालेल अशा वकिलाने तिला सुरुवातीपासूनच संवेदनशीलता, आस्था दाखवणे गरजेचे आहे. त्यामुळे विश्वासाचे आणि व्यावसायिक नाते निर्माण होण्यास साहाय्य होईल.

### २.१.२ तिला समानुभूती दाखवावी :

तिचे म्हणणे शांतपणे ऐकून घ्या. हे कौशल्य वकिलांनी अंगी बाणवले पाहिजे. तिला व्यक्त होण्यास वाव मिळेल असे प्रश्न विचारावे, तिच्या वास्तव आणि अवास्तव अपेक्षा काय आहेत हे जाणून घेण्यासाठी तिचे म्हणणे संवेदनशीलतेने ऐकून घ्यावे. ती बोलत असताना तिचे बोलणे लक्षपूर्वक ऐकावे आणि शब्दातून आणि देहबोलीतून तिला प्रतिसाद द्यावा. तिच्या भावनांना पुष्टी देऊन (दुःख, राग, आणि चिंता) तिला शक्य तितकी मदत देण्याचा दिलासा द्यावा. तिला सतत सांगत राहावे की होणाऱ्या हिंसेस ती जबाबदार नाही तसेच कारणीभूतही नाही, तिला हेही सांगावे की हिंसा सहन करणे, केस दाखल करून स्वतःच्या हक्कांसाठी झगडणे यात काहीही गैर नाही आणि त्याबद्दल तिला अपराधी वाटण्याचे काही कारण नाही. उलट हिंसा सहन करणे आणि हिंसा होत

असलेल्या घरात राहणे हे मुलांच्या दृष्टीने खूपच वाईट आहे. ती बोलत असताना तिला हवे तेव्हा भावनांना वाट करून देण्यासाठी रडू देणे, पाणी देऊ करणे यासारख्या साध्या कृतीतून समानुभूती दाखवणे हे वकील आणि अशील यांतील नातेसंबंध दृढ होण्यास आवश्यक असते.

**२.१.३ तिच्या दृष्टिकोनातून हिंसेतील सर्व बारकावे समजून घ्यावे:**

हिंसा का होते आणि कधी होते असे तिला वाटते याची चौकशी करावी. हिंसेच्या प्रसंगाविषयी आणि तिने त्याला कसा प्रतिसाद दिला याविषयी तिला बोलू द्यावे इतकेच नव्हे तर बोलण्यास उत्तेजन द्यावे. तिला कोणाचा आधार आहे आणि त्यांनी तिला कशी मदत केली किंवा करू शकतात याची विचारणा करावी. विशेषतः हिंसा थांबवण्याच्या दृष्टीने तिने कोणती पावले उचलली याची चौकशी करावी. ती जितकी अचूक माहिती देईल तितके अधिक वकील तिला समजून घेईल आणि तिच्या केसमध्ये मदत करू शकेल असा तिला दिलासा द्यावा. असे केल्यास ज्या महिलेस तिच्या स्वतःच्या म्हणवणाऱ्या व्यक्तींनी दोष दिला आहे, नाकारले आहे, छळले आहे त्या महिलेचा विश्वास संपादन करायला साहाय्य होईल. **वरवर पाहता सर्व केसेस सारख्या दिसल्या तरी प्रत्येक केस ही एकमेव असते हे मान्य करायला हवे.** ती महिला हिंसेकडे कोणत्या दृष्टीने पाहते, हिंसक नातेसंबंधात कोणत्या परिवर्तनाची ती अपेक्षा करते, आणि वकील चर्चा करू शकेल असे संभाव्य तोडगे या सर्व बाबतीत ती केस एकमेव असते.

**२.१.४ तिला सुलभ वाटेल अशा भाषेचा वापर करावा:**

तिला कोणती भाषा वापरल्यास सुलभ वाटते असा विचार केला जावा. त्यामुळे तिला बोलते व्हायला आणि जे म्हणायचे आहे ते म्हणायला सोपे जाईल.

## २.२ सदर कायद्याखाली केसची अर्हता तपासावी

सर्वात प्रथम वकिलाने हे तपासले पाहिजे की ती केस या कायद्याला लागू असलेल्या अटींमध्ये बसू शकते किंवा नाही. ह्या कायद्यान्वये फक्त महिला (आणि तिची मुले) या कायद्याखाली केस दाखल करू शकतात.

ती जर खालील अटींची पूर्तता करत असेल तर तिला केस दाखल करण्याची अर्हता असते

- जर त्या महिलेस कौटुंबिक हिंसेखाली प्रतिवादीने त्रास दिला, अपाय केला, इजा केली, धोका निर्माण केला आणि / किंवा शारीरिक / मानसिक / भावनिक / लैंगिक / आर्थिक दृष्ट्या धमकावले तर
- प्रतिवादी व्यक्ती पीडितेशी *कौटुंबिक नातेसंबंधात* असेल तर

दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर जर हिंसा करणारी व्यक्ती त्या महिलेशी कौटुंबिक नातेसंबंधात असेल तरच त्या व्यक्तीच्या विरुध्द सदर कायद्याखाली केस दाखल करण्यास ती महिला पात्र असते.

अर्हतेविषयी अधिक स्पष्टता असावी यासाठी खालील व्याख्यांची नोंद घेणे महत्त्वाचे आहे.

**<u>सदर कायद्यामधील महत्त्वाच्या व्याख्या:</u>**

१. **कौटुंबिक हिंसा : कलम 3 अन्वये – “** प्रतिवादीची कोणतीही कृती वगळणे, किंवा करणे किंवा वर्तन हे खालील बाबींमध्ये हिंसक ठरते-

अ. पीडित व्यक्तीस अपाय करणे, इजा पोहोचवणे, किंवा त्याच्या आरोग्यास, सुरक्षिततेस, जीवितास किंवा एखाद्या अवयवास, किंवा त्याच्या शारीरिक अथवा मानसिक स्वास्थ्यास धोका निर्माण करणे, किंवा तशी प्रवृत्ती असणे यात शारीरिक, लैंगिक, शाब्दिक,आणि आर्थिक गैरवर्तन करण्याचाही समावेश होतो.

ब. पीडित व्यक्तीचा आणि अन्य संबंधित व्यक्तीचा हुंडा किंवा मालमत्ता किंवा मौल्यवान वस्तुंची बेकायदेशीर मागणी करण्यासाठी जबरदस्ती करण्याच्या उद्देशाने छळ करणे, दुखापत करणे, किंवा तिच्या जीवितास धोका निर्माण करणे

क. कलम अ किंवा ब मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे वर्तन केल्याने पीडित व्यक्तीस किंवा तिच्याशी संबंधित अन्य व्यक्तीस धमकावल्याचा परिणाम होणे.

ड. पीडित व्यक्तीस अन्य प्रकारे शारीरिक अथवा मानसिक अपाय करणे किंवा इजा करणे.”

क्रमांक १च्या स्पष्टीकरणात अशा अनेक कृती / वर्तनांचा समावेश आहे की ज्यांना शारीरिक, लैंगिक, शाब्दिक, भावनिक आणि आर्थिक छळ असे म्हटले जाते. (कृपया पुढे दिलेल्या तालिके मधील उदाहरणे पाहा).

२. **पीडित व्यक्ती: कलम 2(a) :** 'पीडित व्यक्ती' म्हणजे कोणतीही स्त्री (आणि तिची अज्ञान मुले) जी प्रतिवादीबरोबर कौटुंबिक नातेसंबंधात असते किंवा आहे आणि जी प्रतिवादीवर कौटुंबिक हिंसा झाल्याचा आरोप करते अशी कोणतीही स्त्री.

३. **प्रतिवादी: कलम 2(q) :** प्रतिवादी म्हणजे कोणतीही प्रौढ व्यक्ती(स्त्री अथवा पुरुष) जी पीडितेशी कौटुंबिक नातेसंबंधात आहे किंवा असते.

४. **कौटुंबिक नातेसंबंध : कलम 2(f) - कौटुंबिक नातेसंबंध म्हणजे-**
   - अशा दोन व्यक्तींमधील नातेसंबंध जे नेहमी *एकत्रित घरात* एकत्र राहत आहेत किंवा राहत आले आहेत.
   - आणि जेव्हा ते रक्ताच्या नातेसंबंधात , विवाहात, किंवा विवाहसदृश नातेसंबंधात असतात किंवा दत्तक विधानाने संबंधात असतात.
   - किंवा एकत्र कुटुंबातील सदस्य म्हणून एकत्र राहत असतात.

५. **सामायिक/एकत्रित घर : कलम 2(s). -** एकत्रित घर म्हणजे असे घर ज्यात पीडिता राहते किंवा कोणत्याही काळी कौटुंबिक नातेसंबंधामुळे एकटी किंवा प्रतिवादीबरोबर राहत आली आहे,यात खालील बाबींचा समावेश होतो:
   - पीडितेच्या आणि प्रतिवादीच्या एकट्याच्या किंवा दोघांच्या मालकीच्या किंवा भाड्याच्या घरात
   - दोघांपैकी एकाच्या किंवा दोघांच्या नावे, हक्क, हिस्सा, अथवा हितसंबंध त्या घराबाबत असणे.
   - ते घर प्रतिवादी ज्या कुटुंबाचा सदस्य आहे अशा एकत्र कुटुंबाच्या मालकीचे असू शकते जे त्याच्या किंवा पीडितेच्या नावे, हक्क, हिस्सा, अथवा हितसंबंधात नसते.

६. **मूल : कलम 2(b) -** मूल म्हणजे अठरा वर्षांखालील कोणतीही व्यक्ती. त्यात कोणत्याही दत्तक, सावत्र, किंवा मानलेल्या मुलाचा समावेश होतो.

खाली दिलेल्या तालिकेत कौटुंबिक हिंसेच्या कृतींची आणि वर्तनांची विविध वर्गातील उदाहरणे दिली आहेत :

| **शारीरिक छळ** | **लैंगिक छळ** | **भावनिक छळ** | **आर्थिक छळ** |
|---|---|---|---|
| कोणतेही असे वर्तन ज्यामुळे शारीरिक वेदना होतील, आरोग्यास आणि हितास धोका निर्माण होईल | अशी लैंगिक स्वरूपाची हिंसा की ज्यामुळे त्या महिलेचा सन्मान राहणार नाही आणि तिची बेइज्जती होईल | अशी हिंसा की ज्यामुळे तिला मानसिक त्रास होईल आणि धक्का बसेल | अशी हिंसा की ज्यामुळे ती आर्थिक दृष्ट्या कमकुवत होईल |
| मारणे, थप्पड मारणे,चावणे,लाथा मारणे,ठोसे लगावणे,ढकलणे,जाळणे,जेवायला न देणे इ. | जबरदस्तीने समागम करायला लावणे,अश्लील चित्रे दाखवणे,लहान मुलांवर नको असताना लैंगिक कृती किंवा अत्याचार करणे, इ. | अपमान,नावे ठेवणे,अपमानास्पद वागणूक देणे,जबरदस्तीने विवाह करणे,मूल किंवा मुलगा होत नाही म्हणून कुचेष्टा करणे, नोकरी करण्यास मनाई करणे,चारित्र्यावर संशय घेणे इ. | पगार, रोजगार काढून घेणे,देखभालीचा खर्च न देणे,मुलांची फी न देणे,घरातून बाहेर हाकलणे, घरातील वस्तूंचा वापर करू न देणे,घरातील वीज, भाडे इ.ची बिले न भरणे इ. |

खाली काही उदाहरणे दिली आहेत ज्यात ती महिला कौटुंबिक हिंसेविरोधी कायद्याखाली केस दाखल करण्यास पात्र **नसते.**

१. 'य' ही 'क्ष'च्या कुटुंबात काम करणारी असून २४ तास तिथेच राहते. 'क्ष' कुटुंबातील सदस्य तिला मारहाण करतात अशी तिची तक्रार घेऊन ती वकिलाकडे येते.

   या केसमध्ये 'य' ही व्यक्ती या कायद्याखाली येत नाही कारण जरी ती त्या घरात मालकाकडे राहत असली तरी ती त्यांच्या कौटुंबिक नातेसंबंधात नाही; उलट ते मालक – नोकर असे नाते आहे.

२. सानिकाने घटस्फोट घेऊन ६ वर्षे झाली आहेत.त्या घटस्फोटातून तिला मुलांचा ताबा मिळाला आहे नंतर जेव्हा ती मुले सज्ञान झाली तेव्हा ती त्यांच्या वडिलांच्या संपर्कात आली. धाकट्या मुलीने वडिलांच्या सांगण्यावरून असा शैक्षणिक अभ्यासक्रम निवडला की ते कॉलेज तिच्या वडिलांच्या घराजवळ होते. तथापि, तिने कॉलेजजवळील वसतिगृहात राहायचे ठरवले. त्या मुलीस काही वैद्यकीय समस्या असल्याने तिने घरापासून दूर असलेल्या वसतिगृहात राहू नये असे आईचे म्हणणे होते. परंतु मुलीने आईचे न ऐकता वडिलांच्या म्हणण्याप्रमाणे केले. मुलीची वैद्यकीय समस्या वाढली. आईला मुलीच्या राहत्या ठिकाणी ऱाहायला जावे लागले आणि त्यासाठी नोकरी सोडावी लागली आणि आर्थिक नुकसान सोसावे लागले. आता तिला नवऱ्याविरूध्द कौटुंबिक हिंसेची केस दाखल करायची आहे कारण तिच्या मते, त्याने तिच्या मुलीला प्रभावित केल्यामुळे आता तिला प्रकृतीवर होणाऱ्या परिणामांना तोंड द्यावे लागत आहे.

या केसमध्ये आईला जरी मुलीच्या प्रकृतीमुळे काळजी वाटत असली तरी ती मुलीच्या वतीने केस दाखल करू शकत नाही कारण ती मुलगी आता सज्ञान आहे.

**(केस लॉ) न्यायालयाचे न्यायनिर्णय काही व्याख्या स्पष्ट केल्यामुळे आणि त्यात सुधारणा केल्या असल्यामुळे वकिलाने त्याबाबत अद्ययावत माहिती ठेवून त्याविषयीचे ज्ञान करून घेतले पाहिजे.**

**पात्रता ठरवणाऱ्या काही महत्त्वाच्या केसमधील कायद्याची उदाहरणे**

१. विवाहाच्या पुराव्यासंबंधी आणि पोटगीसंबंधी हक्काविषयी – चंदमुनिया वि. वीरेंद्रकुमारसिंग कुशवाहा आणि अन्य **(2011) 1 S.C.C. 141 सदर कायद्याच्या** ‘कौटुंबिक नातेसंबंध’ या कक्षेत ‘पत्नी’ या संज्ञेचा उदारपणे अर्थ लावण्यात आला आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२५ अन्वये पोटगीसाठी विवाहाचा काटेकोर पुरावा ही पूर्व अट नाही. ज्याठिकाणी वैध विवाह नसून जर फक्त दीर्घकाळ एकत्र राहत असतील तर अशा केसमध्ये त्या स्त्रीस पोटगी मिळण्याचा हक्क आहे.

२. “विवाहसदृश नातेसंबंधाचा अर्थ लावण्याविषयी डी. वेलुसामी वि. डी. पटचैयामल **(2010) 10 S.C.C. 469** सदर कायद्याच्या कलम 2(f) अन्वये “कौटुंबिक नातेसंबंध” या शब्दात फक्त वैवाहिक नातेसंबंध अंतर्भूत नसून विवाहसदृश नातेसंबंधही येतात. विवाहसदृश नातेसंबंध म्हणजे कॉमन लॉ (प्रारूढ विधि) लग्न असा अर्थ होतो. अशा लग्नात औपचारिक विवाह होण्याची आवश्यकता नसली तरी-

अ. त्या जोडप्याने समाजात नवरा बायकोसारखे स्वतःला सादर केले पाहिजे.
आ. त्यांचे वय कायद्याने विवाहायोग्य असले पाहिजे.
इ. कायदेशीर लग्न करण्याकरता ते अविवाहित असण्याबरोबरच अन्य अटी पूर्ण करू शकले पाहिजेत.
ई. ते स्वेच्छेने एकत्र राहिले असले पाहिजेत आणि समाजात दीर्घकाळ नवरा बायकोसारखे वावरले असले पाहिजेत.

लीव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या सर्वांनाच विवाहसदृश नातेसंबंधात राहणारे असे मानले जाणार नाही आणि त्यामुळे २००५ च्या अधिनियमानुसार लाभ मिळणार नाहीत. असे लाभ मिळवण्यासाठी उपरोक्त अटींची पूर्तता केली पाहिजे आणि ती पुराव्यानिशी सिध्द केली पाहिजे.

**इंद्र शर्मा वि. व्ही.के. व्ही. शर्मा (2013) 15 S.C.C. 755** या केसमध्ये सततच्या साहचर्यातून विवाहविषयक गृहीतक निष्पन्न होऊ शकते. या उदाहरणातील केसमध्ये अर्जदारास हे माहीत होते की नातेसंबंध सुरू होण्यापूर्वीपासून प्रतिवादी विवाहित असल्याने तिचे स्थान ठेवलेली स्त्री किंवा रखेल असे आहे. सदर कायद्याच्या कक्षेत येण्यासाठी तो नातेसंबंध विवाहसदृश असावयास हवा. न्यायालयाने या संपूर्ण नातेसंबंधाचे बारकाईने विश्लेषण करावे आणि एकेक घटकास वेगळे काढू नये. अर्जदार महिला ही ठेवलेली किंवा रखेल असल्यामुळे ती विवाहसदृश नातेसंबंधात राहू शकत नाही.

३. प्रतिवादी स्त्रियाही असू शकतात. सदर कायद्याखाली महिला नातेवाईकांनासुध्दा प्रतिवादी करता येते का याविषयी अनेक तर्क होते. ह्या बाबीचा निर्णय अर्चना नाईक वि. उर्मिलाबेन नाईक (2010CriLJ751) या केसमध्ये झाला. यात मुंबई उच्चन्यायालयाने असा निर्णय दिला की प्रतिवादी असलेल्या प्रौढ पुरुषाच्या स्त्री नातेवाईकाससुध्दा सदर कायद्याखाली प्रतिवादी करता येते.

हिरल पी. हरसोरा आणि अन्य वि. कुसुम नरोत्तमदास हरसोरा आणि अन्य या केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने सदर कायद्यामधील कलम 2(q) अन्वये 'व्यक्ती' या शब्दाआधीचे 'प्रौढ पुरुष' हे शब्द रद्द केले. त्यासाठी असे ग्राह्य धरले गेले की त्याच परिस्थितीत असलेल्या दोन व्यक्तींमध्ये हे शब्द फरक करतात आणि असा फरक करणे हे सदर कायद्यानुसार जे उद्दिष्ट साध्य करायचे आहे त्याच्या विरोधी आहे. त्यात अधिनियमाच्या कलम 2(q) चे परंतुक (प्रोव्हीजो) निष्प्रभ असल्याने ते रहित केले आहे याचाही उल्लेख केला आहे.

## २.३ माहिती देऊन त्यातून निवड करण्यास मदत करावी.

### २.३.१ अशिलास अवधी द्या आणि सर्व वस्तुस्थिती अचूक माहीत करून घ्या:

कामात व्यस्त असल्यामुळे आणि जास्त करून कौटुंबिक हिंसेच्या एकसारख्या वाटणाऱ्या केसेस हाताळणारे वकील वस्तुस्थिती गृहीत धरतात आणि त्यांना जो कायदेशीर तोडगा योग्य वाटतो त्याविषयी थेट चर्चाच सुरू करतात. असे करण्याऐवजी अशिलाचे काय म्हणणे आहे ते नीट ऐकून घ्यावे. शांतपणे ऐकून घेतल्यास केससाठी उपयुक्त असलेला बराचसा तपशील हाती लागू शकतो. चांगले प्रश्न विचारण्याचे कौशल्यही माहिती काढून घेण्यासाठी महत्त्वाचे असते परंतु प्रश्न विचारताना संवेदनशीलता दाखवली पाहिजे.

### २.३.२ योग्य ते प्रश्न विचारा :

योग्य प्रश्न विचारता येणे हा वकिलासाठी आवश्यक गुण आहे. माहिती काढून घेण्यासाठी, अनुभव कळण्यासाठी, ती पीडिता हिंसेकडे कोणत्या दृष्टीने पाहते ते कळण्यासाठी, तिला खरोखरच काय हवे आहे ते व्यक्त करण्यास साहाय्य होण्यासाठी आणि वकिलास तिच्याविषयी जी आस्था वाटते त्यासाठी प्रश्न विचारण्याचे कौशल्य कामी येते. उदा. लैंगिक छळाबद्दल चौकशी करताना वकील जर पुरुष असेल तर थेट प्रश्न विचारताना अवघडल्यासारखे वाटते. अशा परिस्थितीत वकील तिला असे म्हणू शकतो की अनेक स्त्रियांना लैंगिक हिंसेचा अनुभव येतो आणि अशा वेळी तो तिला परिचित असलेल्या बोली भाषेत तिच्याशी बोलू शकतो. तिच्यावर होणारी हिंसा थांबवताना तिला जे काही अडथळे आले, ज्या काही आव्हानांना तोंड द्यावे लागले ते समजून घेण्यासाठी तिला तिने हिंसा थांबवण्यासाठी काय प्रयत्न केले ते विचारावे. यातून तिची कमजोरी तसेच बलस्थाने कळण्यास साहाय्य होईल.

**हिंसा थांबवण्यासाठी तिने जे प्रयत्न केले त्याविषयी माहिती देणाऱ्या प्रश्नांची उदाहरणे**

- तुम्ही तुम्हाला आलेला हिंसेचा अनुभव कुटुंबातील कोणत्याही सदस्यास,मैत्रिणीस अथवा शेजारच्यांना सांगितला आहे का?
- तुम्ही कोणत्या अशासकीय संस्थेत गेला आहात का?
- तुम्ही समुपदेशकाकडे गेला आहात का?
- जर याचे उत्तर हो असेल तर प्रतिवादीसुध्दा समुपदेशकास भेटला आहे का?
- समुपदेशकाच्या भेटीतून काय निष्पन्न झाले?
- तुम्ही पोलिसांकडे तक्रार केली आहे का?
- तुमच्याकडे एफआयआरची प्रत आहे का?
- तुम्ही संरक्षण अधिकाऱ्यांस भेटला आहात का?
- त्यांनी डीआयआर तयार केला आहे का?
- तुम्हाला कधी इजा झाली आहे का?
- तुम्ही डॉक्टरकडे गेलात का?
- तुमच्याकडे डॉक्टरचा अहवाल किंवा प्रिस्क्रिप्शन आहे का?
- इतक्या सर्व प्रयत्नांनंतर हिंसा कमी झाली का / तिच्यात वाढ झाली का?

ह्या माहितीमुळे वकिलास पीडितेच्या झगड्याचे पूर्ण चित्र स्पष्ट होईल आणि त्यामुळे तो / ती वकील तिने ज्या प्रकारच्या हिंसेस तोंड दिले आहे आणि त्याचे तिच्यावर जे परिणाम झाले आहेत ते मांडून एक सशक्त केस उभी करू शकेल.

**२.३.३ तिची काय मागणी आहे हे तिला नक्की विचारा :**

ह्या माहितीमुळे वकील तिला जे शक्य आहे ते का  आणि कसे शक्य आहे आणि जे शक्य नाही ते का शक्य नाही याबाबतीत साहाय्य  करू शकेल. वकील नेहमीच सशक्त केस उभी करण्याचा प्रयत्न करतात.  स्पष्ट आणि अचूक सत्य माहीत झाल्याने वकिलास त्याचे हे उद्दिष्ट साध्य करण्यास निश्चितच साहाय्य  होते आणि अशिलास सुध्दा स्वतःच्या केसवर अधिक भर देता येतो. वकिलाची भूमिका ही शिक्षक आणि मार्गदर्शकाची असते.

**२.३.४ अशिलास सदर कायद्याखाली जे काही हक्क आणि सेवा उपलब्ध आहेत त्याविषयी माहिती द्यावी:**

यासाठी वकील सहभागी घटकांची ज्यात काही कर्तव्ये नेमून दिली आहेत अशा कौटुंबिक हिंसेविरोधी कायद्याच्या कलम 5 चा वापर करेल. सदर कायद्याचा फॉर्म ४ यासाठी मार्गदर्शन करेल. (फॉर्म ४ साठी परिशिष्ट १ पाहा) हे करताना वकील शिक्षकाची भूमिका निभावेल आणि त्यामुळे व्यावसायिक जवळीकीस अधिक बळकटी येईल. पीडितेस प्रश्न विचारण्यासाठी आणि त्यावर चर्चा करण्यासाठी उत्तेजन द्यावे त्यामुळे तिच्या मनात वकिलाच्या क्षमतेविषयी विश्वास निर्माण होईल आणि अशिलाचा निर्णय घेण्याचा आत्मविश्वास वाढेल. जशी जवळीक निर्माण होईल तसे पीडितेस लैंगिक छळासारख्या संकोच वाटणाऱ्या विषयावर तसेच अन्य क्लेशकारक प्रसंगांवर बोलणे सुलभ होईल.

**२.३.५ तिच्याबरोबर कायदेशीर अथवा अन्य व्यापक तोडग्यांबाबत चर्चा करावी:**

वकिलाकडे येणाऱ्ी अशील तिच्या केसशी संबंधित अशा योग्य कायद्यांच्या पर्यायांबाबत पूर्णपणे अज्ञानी असू शकते. तिला प्रश्न विचारून तिच्या शंकांचे निरसन करून घेण्यास उत्तेजन द्यावे. जर केसमधून वकिलाच्या असे निदर्शनास आले की कायद्याव्यतिरिक्त न्यायालयाच्या बाहेर काही पर्याय आहेत किंवा समुपदेशन केंद्र काही मदत करू शकते तर वकिलाने अशिलास तसे जरूर सुचवावे. न्याय मिळविण्यासाठी केवळ न्यायालय नाही तर इतरही यंत्रणा वापरता येतात याची माहिती दयावी.

**२.३.६ कायदेशीर अथवा अन्य पर्यायांच्या संभाव्य परिणामांची तिच्याबरोबर चर्चा करावी:**

पीडिता जी काही कायदेशीर पावले उचलेल त्या प्रत्येकाचे तिच्या कौटुंबिक नातेसंबंधांवर, तिच्या समाजातल्या स्थानावर, आर्थिक परिस्थितीवर, दैनंदिन जीवनावर, मुलांवर, स्वतःच्या मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्यावर आणि तिच्या सर्व स्रोतांवर परिणाम होतील. म्हणून वकिलाने फक्त पर्यायांची चर्चा न करता त्यांचे संभाव्य परिणाम सांगितले तर ते उचित ठरेल. अशिलास सदर कायद्याच्या प्रक्रियांविषयी (वेळ आणि पैसा यांसह) माहिती देऊन शिक्षित करणेसुध्दा तितकेच महत्त्वाचे आहे.

यासर्वांमुळे तिला माहिती झाल्यावर निवड करता येईल—तिला न्यायालयात जायचे की नाही, कोणती कायदेशीर कारवाई करायची, आणि का, तिने उचललेल्या पावलांचे जे परिणाम होतील त्याला तोंड देण्यासाठी स्वतः कसे सुसज्ज व्हायचे, आणि अन्य अशाच काही बाबी. हेच अशिलाचे सक्षमीकरण होय.

**लक्षात ठेवा: जेव्हा अशील सर्व माहिती करून घेऊन निवड करते तेव्हा ती स्वतःच्या निर्णयाची जबाबदारी घेण्याची शक्यता वाढते.**

## २.४ जोखीम किती आहे याचा अंदाज घेऊन त्यानुसार सुरक्षेचे उपाय योजावेत.

अशिलास किती सुरक्षित वाटत आहे याची वकिलाने चाचपणी करणे तसेच ती महिला तत्काळ सुरक्षेची कोणती दक्षता घेऊ शकते याविषयी तिला विचार करायला प्रोत्साहन देणेही महत्त्वाचे आहे. अन्य केसेसमध्ये सुरक्षेचे कोणते उपाय केले गेले तेही वकील सुचवू शकतो.

**परिस्थितीनुसार प्रत्येक केसची सुरक्षा योजना वेगळी असते.**

**वकील सुचवू शकेल अशा सुरक्षेच्या उपायांची काही उदाहरणे**

- धारदार शस्त्रे किंवा केरोसीनसारखे ज्वालाग्राही पदार्थ लपवून ठेवणे
    - तिच्या मैत्रिणींच्या आणि शेजाऱ्यांच्या संपर्कात राहणे, त्यांना कौटुंबिक हिंसेच्या घटनेची माहिती देणे, त्यांचा आधार घेणे, उदाः जर तिच्या घरातून काही विचित्र आवाज किंवा आरडाओरडा ऐकू आल्यास डोकावून बघणे, किंवा हस्तक्षेप करणे, किंवा ती फार दिवसात न दिसल्यास तिच्या घरी जाणे.
    - तिचा मोबाईल फोन सहज सापडेल असा हाताशी ठेवणे.
    - अणीबाणीच्या काळात उपयोगी पडावेत म्हणून नातेवाईकांचे, मैत्रिणींचे,पोलिसांचे,संरक्षण अधिकाऱ्यांचे फोन नंबर्स लक्षात ठेवावे किंवा सहज हाती येऊ शकतील असे ठेवावेत.
    - तिची शैक्षणिक सर्टिफिकेट्स, आर्थिक कागदपत्रे, फोटो, मेडिकल सर्टिफिकेट्स असे महत्त्वाचे कागदपत्र सुरक्षित जागी ठेवावेत.
    - सोने आणि सोन्यासारख्या अन्य मौल्यवान वस्तु प्रतिवादीपासून लांब सुरक्षित जागी ठेवाव्यात.
    - तिला ही माहिती द्यावी की एकदा तिने कायदेशीर कारवाई करायचे ठरवले की ती सदर कायद्याच्या फॉर्म ५ मध्ये दिलेली सुरक्षा योजना वापरू शकते.(अंमलात आणू शकते.) (फॉर्म ५ साठी परिशिष्ट २ पाहा)

## २.५ सदर कायद्याखाली नेमलेल्या अनेक मदत करणाऱ्या सहभागी घटकांच्या सेवा कशा वापराव्यात याची माहिती द्यावी.

ज्यांना काही भूमिका वठवायची आहे अशा अनेक सहभागी घटकांची नेमणूक करता येणे ही सदर कायद्याची जमेची बाजू आहे. या सहभागी घटकांच्या आधाराची पीडितेस गरज लागू शकते म्हणून वकिलाने त्याबाबतची माहिती अत्यंत चिकाटीने दिली पाहिजे.

**तिला देण्यात येणारी अन्य सहभागी घटकांची काही माहिती खालीलप्रमाणे आहे:**

- पोलिसांची मदत : जर पीडितेस घराबाहेर पडता आले नाही किंवा तिला अन्यायकारक पध्दतीने घरातच डांबून ठेवले तर ती १०९१ या महिलांसाठीच्या हेल्पलाईनशी संपर्क करू शकते. ती महिला जरी पोलिसांपर्यंत पोचू शकत नसेल तरी पोलिस तिच्यापर्यंत या फोन नंबरमुळे पोचू शकतात.
  जेव्हा पीडित व्यक्ती या हेल्पलाईनचा वापर करते तेव्हा गस्त घालणारे पथक तिच्या सुटकेसाठी येऊ शकते. अशिलास हे सांगितलेच पाहिजे की तिच्या तक्रारीची नोंद गस्त घालणाऱ्या पथकातील पोलिसांच्या रजिस्टरमध्ये झाली आहे की नाही याची खात्री करून घ्यावी.(जरी तो अदखलपात्र गुन्हा असला तरी) तो पुरावा म्हणून राहील.
- आधार गृह : जर एकत्रित घरात राहणे असुरक्षित असेल किंवा तिला जर घरातून हाकलून दिले असेल तर तिला उपलब्ध असलेल्या निवारा/ आधार गृहांची माहिती द्यावी. वकिलाने अशिलास आधार गृहाचा पत्ता दिला पाहिजे.
- समुदेशन सेवा : बऱ्याच केसेमध्ये समुपदेशनाने हिंसा थांबवता येते. समुपदेशकाचे साहाय्य घेऊन हिंसा कशी थांबवता येईल हे ज्ञान वकिलाने अशिलास दिले पाहिजे. विशेषतः ज्या केसेसमध्ये प्रतिवादी समुपदेशन घेण्यास स्वेच्छेने तयार असतो तिथे समुपदेशनाचे शब्द परिणामकारक ठरतात. समुपदेशकाकडे जाणे हे न्यायालयात जाण्याआधी साहाय्य घेतल्याचे एक प्रकारे रेकॉर्ड होऊ शकते.
- संरक्षण अधिकारी : काही वेळेस त्या महिलेस सदर कायद्याखाली अर्ज करावा की नाही असा संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असते. तिला फक्त कायद्याचा सल्ला हवा असतो त्यामुळे ती गरज भासल्यास नंतर काही कारवाई करू शकते. वकिलाने तिला संरक्षण अधिकाऱ्यांचे काय महत्त्व आहे ते सांगावे. अशा वेळेस संरक्षण अधिकाऱ्याकडून कौटुंबिक हिंसा अहवाल **(डीआयआर)** घेणे हे सर्वात उत्तम धोरण राहील कारण त्याला पुरावा म्हणून महत्त्व असते. त्यामुळे अशिलाचे संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर चांगले संबंध प्रस्थापित होतील आणि नंतर जेव्हा ती स्त्री न्यायालयात अर्ज दाखल करेल तेव्हा संरक्षण अधिकारी महत्त्वाची भूमिका बजावतील.

**सूचना:** जिल्ह्यात संस्थांचे, तज्ञांचे व मदत देऊ शकणाऱ्या इतर व्यक्तींचे (सदर कायद्याखाली) पत्ते आणि नावांसह जी यादी उपलब्ध असते ती महिला आणि बाल विकास कार्यालयाने तयार केलेली असते. वकिलाने त्याची प्रत सहज उपलब्ध करून देणे योग्य होईल.

**लक्षात ठेवा:** केस कधी दाखल करायची हे ठरवण्यास त्या महिलेस वेळ लागेल. केस तत्काळ दाखल करण्यास तिची तयारी नसेल. मधल्या काळात वकिलाने दिलेल्या माहितीचे तिला निर्णय घेण्यास तसेच या कायद्याखाली अर्ज दाखल करण्यास साहाय्य होईल.

**पीडित महिलेकडून कोणती माहिती मिळायला हवी याची वकील यादी करू शकतो.**

- तुम्ही कौटुंबिक हिंसेचा तुमचा अनुभव तुमच्या कुटुंबातील अन्य सदस्याला, किंवा मैत्रिणीला किंवा शेजारणीला सांगितला आहे का?
- तुम्ही कुठल्या अशासकीय संघटनेस भेट दिली आहे का?
- तुम्ही समुपदेशकास भेटला आहात का?
- जर भेटला असाल तर प्रतिवादी सुध्दा भेटला आहे का?
- समुपदेशकाच्या भेटीचे फलित काय झाले?
- तुम्ही पोलिसांकडे काही तक्रार केली आहे का?
- तुमच्याजवळ एफआयआरची प्रत आहे का?
- तुम्ही संरक्षण अधिकाऱ्यांना भेटला आहात का?
- त्यांनी कौटुंबिक हिंसा अहवाल (डीआयआर) तयार केला का? त्याची प्रत तुमच्याजवळ आहे का?
- तुम्हाला कधी कोणी दुखापत केली का?
- तुम्ही डॉक्टरकडे गेलात का?
- तुमच्याजवळ डॉक्टरचा अहवाल अथवा प्रिस्क्रिप्शन आहे का?

ह्याचबरोबर कलम 26 मधील तरतूदही लक्षात घ्यायला हवी. पीडितेचा जर दिवाणी, कौटुंबिक किंवा फौजदारी न्यायालयात अन्य दावा/खटला कलम 12 खालील अर्ज ज्या प्रतिवादींच्या विरोधात करायचा आहे त्याच प्रतिवादींच्या विरोधात प्रलंबित असेल तर सदर कायदयाच्या कलम 26 अन्वये त्याच दिवाणी, कौटुंबिक किंवा फौजदारी न्यायालयात कलम 12 खालील अर्जही दाखल करता येतो. या तरतुदीमुळे त्याच दोन पक्षात एकाच न्यायालयात केस प्रलंबित असेल तर ह्या न्यायालयातून त्या न्यायालयात धावपळ करायला न लागता तिथेच अर्ज दाखल करता येतो. मात्र पीडितेवर कलम २६ चा वापर केलाच पाहिजे अशी सक्ती

करता येत नाही. कलम २६ प्रमाणे कलम १२ खालचा अर्ज करण्यासाठी ती अजून एक सुविधा तिच्यासाठी उपलब्ध करून दिलेली आहे, पण त्या सुविधेचा उपयोग करायचा किंवा नाही ते तिच्या इच्छेवर अवलंबून असेल.

## २.६ गुप्तता बाळगली जाईल याची हमी द्यावी.

जेव्हा पीडिता तिची खाजगी माहिती वकिलास देत असते तेव्हा ती माहिती केसचा मसुदा तयार करण्यासाठी वापरली जाईल आणि ती जितकी जास्त माहिती देईल तितकी तिची केस अधिक बळकट होईल असे सांगणे वकिलाचे कर्तव्य आहे. त्यामुळे तिचा आत्मविश्वास वाढेल. त्याचवेळी वकिलाने तिला याची हमी दिली पाहिजे की या केसवर काम करणाऱ्या त्याच्या सहकाऱ्यांकडून तिच्या माहितीविषयी गुप्तता पाळली जाईल. त्याचप्रमाणे कारवाई चालू असताना त्याची सुनावणी इन कॅमेरा व्हावी अशी मागणी करण्याचा तिला हक्क आहे हे तिला वकील सांगू शकेल. पीडितेने मोकळेपणाने सर्व सांगावे म्हणून ही माहिती तिला देणे फार महत्त्वाचे आहे.

## २.७ सदर कायद्याच्या १२ कलमान्वये अर्ज लिहावा.

### २.७.१ अर्जातील मजकूर तयार करण्यासाठी सत्य माहितीचा शोध घ्यावा.

पीडितेशी सुरुवातीस बोलल्यानंतर वकिलास तिने सहन केलेल्या हिंसेविषयी माहिती मिळेल. तथापि, अर्जात मजकूर लिहिताना हिंसेचा बारीक सारीक तपशील,तसेच त्याचा तिच्यावर झालेला परिणाम हे शोधले पाहिजे तसेच अनेक आदेशांची विनंती करण्यासाठी आणि साहाय्यासाठी अर्ज व्यवस्थित लिहिला पाहिजे. खालील दोनपैकी एका मार्गाने ते उत्तम प्रकारे करता येते.

### २.७.२ जेव्हा ती महिला सत्य, प्रसंग, आणि अनुभव सांगत असते त्याचवेळी वकिलाने त्याचे लिखाण करणे :

अशा प्रकारचे लिखाण करण्याचा फायदा म्हणजे जर काही शंका असतील तर त्यांचे लगेच निरसन करता येते. वकिलास जर काही प्रश्न विचारायचे असतील तर ती पीडिता तिथेच उपस्थित असते व ती त्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकते आणि अशा रीतीने अंतिम मसुदा तयार होऊ शकतो.

### २.७.३ पीडितेकडून लेखी स्वरूपात सर्व माहिती घेणे :

पीडिता सर्व सत्य परिस्थिती, प्रसंग आणि अनुभव लिहिते आणि तिला न्यायालयाकडून / कायद्याकडून काय अपेक्षा आहे तेही लिहिते. त्यासाठी वकील तिला मार्गदर्शन करून काही सूचना देऊ शकतो जेणेकरून ती संबंधित प्रसंग कथन करू शकेल उदाः हिंसेच्या प्रसंगाचे वर्णन करून सांगताना ती हिंसा कोणत्या परिस्थितीत झाली, त्याचा तिच्यावर आणि तिच्या मुलांवर काय परिणाम झाला आणि त्या प्रसंगानंतर तिने काय केले( घर सोडले का, आई वडिलांना बोलावले का, पोलिस चौकीवर गेली का) याचा उल्लेख करेल. पीडितेने स्वतः काय घडले याचा तपशील लिहिण्याचा एक फायदा असा की वकील त्याच्या / तिच्या सवडीनुसार आणि त्याच्या वेगानुसार केसचा मसुदा तयार करू शकतो. तथापि, ते लिहिण्याला एक कालमर्यादा असावी त्यामुळे त्याची घाई किती आहे हे लक्षात घेऊन अवाजवी उशीर टाळता येतो. याशिवाय तयार झालेल्या मसुद्याबाबत पीडितेशी सल्लामसलत करून त्याप्रमाणे त्यात बदल करून मसुद्यास अंतिम स्वरूप देता येते.

### २.७.४ विनंती केल्याप्रमाणे प्रत्येक वस्तुस्थिती लिहावी.

पीडितेने पुरवलेली माहिती मसुद्यात वापरली जावी. वकिलाने मसुद्यातून कौटुंबिक हिंसेविषयीचा तिचा दृष्टिकोन मांडावा कारण तो व्यक्तीनिष्ठ असून प्रत्येक व्यक्तीगणिक तो वेगळा असतो. वकील पूर्वग्रहदूषित नसेल आणि त्याची स्वतःची मते आड येत नसतील तरच हे शक्य होते. यासाठी वकील चांगला श्रोता असावा आणि पीडितेच्या परिस्थितीविषयी त्याला समानुभूती असावी.

अर्जाचा मसुदा तयार करताना बारीक सारीक वाटणारे प्रसंगसुध्दा लिहावे आणि ते वरवर लहान वाटणारे प्रसंग मोठ्या प्रसंगांशी जोडावेत. अशा  प्रकारे मसुदा तयार केल्यास एक संदर्भ तयार होईल आणि हिंसेस चालना देणारे  प्रसंग नजरेत भरतील. यातून न्यायाधीशास त्या पीडितेने काय काय सहन केले आहे याची कल्पना येईल आणि तिने अर्जात ज्या प्रकारे विनंती केली आहे तिचे समर्थन होईल.

### २.७.५ पीडितेने जशी माहिती सांगितली तशीच फक्त वस्तुस्थिती लिहावी त्यात कोणताही वेडावाकडा बदल करू नये.

वकील हे फक्त अशिलाचे कोर्टातील प्रतिनिधी असतात आणि अखेरीस अशिलास न्यायालयात उभे राहून मुख्य आणि उलटतपासणीस तोंड द्यावे लागते आणि पुरावे सादर करावे लागतात. हिंसा, मग ती कितीही  लहान प्रमाणातील असो तिचा पीडितेवर आणि तिच्या कुटुंबावर परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. हिंसेत वाढ होणे, शारीरिक अथवा मानसिक आरोग्यावर

परिणाम होणे, मूलभूत गरजांपासून वंचित राहणे अशा प्रकारचा जो परिणाम होतो तो ठळक करून मांडला पाहिजे. वस्तुस्थितीस वेडेवाकडे वळण न देता ती मांडली तर अशिलास आत्मविश्वासपूर्वक न्यायालयात उभे राहता येते.

आपण एक उदाहरण पाहू – अदितीच्या वकिलाने तिच्या अर्जात लिहिले की तिला तिच्या नवऱ्याने जाळायचा प्रयत्न केला.  असा प्रसंग घडलाच नव्हता. अदितीचा भरपूर मानसिक छळ झाला होता. तो तिला नावे ठेवत असे आणि मित्र  आणि नातेवाईकांसमोर अपमानित करत असे. तिला त्याच्या आर्थिक छळालाही तोंड द्यावे लागले. तिच्या नवऱ्याने तिचे डेबिट कार्ड वापरले आणि त्याचे तिच्या बँकेच्या खात्यावरही नियंत्रण होते. त्याने कधीही शारीरिक हिंसा केली नव्हती. तिच्या वकिलाला वाटले की केस जास्त गंभीर वाटावी म्हणून शारीरिक हिंसा झाली असे लिहावे, म्हणून त्याने जाळण्याचा प्रयत्न केला असे लिहिले. उलटतपासणीच्या वेळी अदितीस या गोष्टीचा खूप ताण आला आणि ती अर्जात नमूद केलेल्या 'सत्य गोष्टी' विस्ताराने सांगू शकली नाही.

जे घडले नाही ते वकिलाने लिहिण्याची गरज नसते कारण त्यामुळे मुद्दा सिध्द न करता आल्यास केस कमकुवत होते.

**२.७.६ अर्जाची भाषा:**

केसचा मसुदा तयार करताना पीडितेस तिची कोणत्या भाषेला पसंती आहे हे विचारून घेणे योग्य ठरेल. जर पीडितेस प्रांतिक भाषा समजणे सुलभ वाटत असेल तर त्या भाषेत केसचा मसुदा तयार केला जावा. तो तयार झाल्यावर अशिलास वाचण्यास द्यावा. तो वाचून वकिलाचे तसेच अशिलाचेही समाधान झाले पाहिजे. जर ती महिला अशिक्षित असेल तर तो वाचून त्यातील आशय तिला कळल्याची खात्री करून घ्यावी. जरी तिने मसुदा इंग्रजीमध्ये तयार करण्यास तयारी दाखवली आणि तिला ती भाषा फारशी समजत नसली तरी वकिलाने तिला तो मसुदा वाचून दाखवावा आणि त्यात काय लिहिले आहे ते स्पष्ट करण्याचे प्रयत्न करावेत.

हे अतिशय महत्त्वाचे आहे कारण ती जेव्हा (व्हेरिफिकेशनवर) पडताळणीवर सही करते तेव्हा तिला माहीत हवे की त्यात काय लिहिले आहे. मसुदा तयार करणे ही केस लढवण्यातील महत्त्वाची बाजू असल्याने ती अतिशय अचूकतेने केली जावी आणि त्यातून वकील आणि अशील असे दोघांचेही समाधान व्हावे.

पीडितेस हे सांगणे महत्त्वाचे आहे की जर प्रतिवादीने तिच्या अर्जाला उत्तर म्हणून काही नवीन वस्तुस्थिती किंवा माहिती दिली आणि तिला जर त्या माहितीस आणि वस्तुस्थितीस उत्तर द्यायचे असेल तर ती रिजॉइंडर (प्रत्युत्तर) देऊ शकते. ही माहिती पीडितेस दिलासा देऊ शकते.

**२.७.७ अर्जात लिहिण्याचा तपशील:**

१. पीडितेच्या प्रतिवादीबरोबर असलेल्या **नात्याचा स्पष्टपणे 'कौटुंबिक नातेसंबंध' असा उल्लेख करावा**. या माहितीमुळे पीडिता स्त्री आणि प्रतिवादी यांच्यात सत्तेची समीकरणे प्रस्थापित होतात.

२. अर्जदार **सामायिक/एकत्रित घरात राहत** होती/ आहे.

३. **हिंसेचे स्वरूप-** शारीरिक, शाब्दिक/ भावनिक, लैंगिक आणि आर्थिक

**४. हिंसेचा तपशील**

हा तपशील देताना खालील गोष्टी कराव्यात

- शक्य तितके प्रसंग तारखेनुसार सादर करावेत म्हणजे त्यामधील दुवे जोडता येतात. ती पीडिता बोलताना किंवा लिहिताना कदाचित प्रसंग कालक्रमानुसार सांगणार नाही. परंतु वकिलास त्याचे / तिचे कौशल्य वापरून घटनांची साधारण तारीख, महिना, वेळ शोधावी लागेल म्हणजे ती महिला ते सर्व कालक्रमानुसार सादर करू शकेल.

- ज्या परिस्थितीत हिंसक घटना घडली त्यावेळी ती किती कमकुवत होती हे ठळकपणे सांगण्यासाठी हिंसा कोणत्या वेळी घडली, (हिंसा रात्री घडली) कुठे घडली, त्यावेळी कोण हजर होते, कोण हजर नव्हते, तिला कोणाचा पाठिंबा होता,त्या प्रसंगानंतर हिंसा वाढली का कमी झाली याची माहिती द्यावी.

  जर त्या पीडितेस तो प्रसंग घडल्याची नक्की वेळ आणि तारीख आठवत नसेल तर एक विशिष्ट काळ आठवायचा प्रयत्न करावा उदाः (उन्हाळ्याचे दिवस होते,दिवाळी होती इ.) यामुळे जर हिंसेची पुनरावृत्ती होत असेल तर न्यायाधीशांना त्याचा एक ठरावीक आकृतीबंध लक्षात येण्यास साहाय्य होईल.
  हिंसा कुठे झाली ती जागा महत्त्वाची आहे कारण त्यावरून तिला सेवांपर्यंत (वाहतूक, टेलिफोन, मोबाईल, पोलिसांचे साहाय्य इ.) पोचणे कितपत शक्य आहे ते ठरवता

येईल. या माहितीवरून साक्षीदार ओळखणे किंवा शोधून काढणे तसेच पुरावा गोळा करणे यास साहाय्य  होईल.

- परिस्थितीमुळे आणि केस दाखल केल्यामुळे त्या स्त्रीस हिंसेच्या ज्या धोक्याला सामोरे जावे लागते त्याची मांडणी करावी. भूतकाळात ज्या प्रसंगांमुळे, वादविवादांमुळे हिंसा वाढली होती, त्यामुळे आता तिला हिंसेची पुनरावृत्ती होण्याच्या धोक्याला सामोरे जावे लागत आहे आणि तिच्या जीवाला अजूनही कसा धोका आहे हे स्पष्ट करावे. या केसमध्ये भावी काळातील  हिंसेविषयीच्या संभाव्य भीतीचा उल्लेख करावा म्हणजे परिस्थितीचे गांभीर्य न्यायाधीशांच्या लक्षात येईल आणि ते त्यानुसार ताबडतोब अंतरिम आणि किंवा एकतर्फी आदेश देतील.

- तुलनात्मक दृष्टीने पाहता शारीरिक हिंसेचे वर्णन करणे सोपे आहे परंतु भावनिक हिंसेचे वर्णन करणे हे एक आव्हानच आहे. भाविनक हिंसेचे सादरीकरण पीडितेच्या दृष्टिकोनातून व्हायला हवे- हिंसा झाली त्यावेळी तिला काय आणि कसे वाटले, त्याचा तिच्यावर काय परिणाम झाला इ. असे केल्याने तिला काय काय सहन करावे लागले हे  न्यायदंडाधिकाऱ्यांना  अधिक चांगल्या प्रकारे समजेल.

- हे शक्य आहे की ती स्त्री काही कृती गृहीत धरेल आणि त्यांच्याकडे कौटुंबिक हिंसा या नजरेने बघणार नाही उदाः लैंगिक हिंसा किंवा शिवराळ भाषा. वकिलाचे हे काम आहे की त्याने तिला अशा कृतीसुध्दा हिंसेखाली येतात हे समजावून सांगावे आणि एकदा तिला हे समजले की  त्यांचा मसुद्यात समावेश करावा.

- तसेच ती लैंगिक हिंसेविषयी बोलायची टाळाटाळ करू शकेल – त्यात जबरदस्ती लैंगिक संबंध ठेवणे, लैंगिक संबंध न ठेवणे, पोर्नोग्राफी पाहायला लावणे,इ चा समावेश होतो, आधी चर्चा केल्याप्रमाणे तिला बोलते करणे हे वकिलाचे कौशल्य आहे. खाली दिलेल्या रेशमाच्या केसवरून हे समजून घ्यायचा प्रयत्न करूया.

  अतिशय प्रतिष्ठित घरातल्या राकेशबरोबर रेशमाचा विवाह झाला. तिच्या सासू – सासऱ्यांचे घरात वर्चस्व आणि पूर्ण नियंत्रण होते.  राकेशने जरी काही चूक केली आणि तिचा रेशमाला त्रास झाला तरी घरातले कोणीही राकेशला टोकत नसत किंवा काही बोलत नसत. त्यामुळे रेशमाची सासरी फारच नाजूक परिस्थिती होती. जेव्हा ती गरोदर राहिली तेव्हा डॉक्टरने त्यांना कोणत्याही प्रकारे लैंगिक संबंध ठेवू नये असा सल्ला दिला होता कारण तसे केल्यास

रेशमाच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता होती. डॉक्टरांच्या सल्ल्याविरुध्द जाऊन राकेशने रेशमावर लैंगिक संबंध ठेवण्याची जबरदस्ती केली परिणामतः तिचा गर्भपात झाला. त्यानंतर डॉक्टरांनी त्यांना गर्भधारणा होऊ देऊ नये असा सल्ला दिला परंतु पुन्हा रेशमावर जबरदस्ती लैंगिक संबंध लादल्याने ती लगेचच गरोदर राहिली . तिचा पुन्हा गर्भपात झाला.

डॉक्टरांनी सावधगिरी बाळगण्याच्या दोन सूचना देऊनही रेशमास दोनदा गर्भपात होण्याचा त्रास झाला. तिच्या प्रजनन आरोग्याच्या हक्कांचे हे उल्लंघन होते आणि लैंगिक हिंसा होती. या केसमध्ये रेशमा जेव्हा प्रथम वकिलाकडे आली तेव्हा तिला हे माहीत नव्हते की ही लैंगिक हिंसा आहे. केस फाईल करण्याआधी वकिलास तिला याचे ज्ञान द्यावे लागले.

- पीडिता संरक्षण अधिकाऱ्याकडे गेल्यावर त्याने फॉर्म १ मधील कौटुंबिक हिंसेचा अहवाल (डीआयआर) नियम क्र. 5(1), 5(2), आणि 17(3) अनुसार तयार करावा, हिंसेच्या तपशिलाबाबत त्याचा संदर्भ घ्यावा आणि अर्जात दिलेला तपशील त्याच्याशी जुळत आहे का याची खात्री करून घ्यावी. कौटुंबिक हिंसेच्या अहवालामध्ये (डीआयआर) नमूद केलेल्या तपशिलाव्यतिरिक्त आणखी कोणतीही अतिरिक्त माहिती किंवा हिंसेचा तपशील अर्जात लिहिला जावा. वकिलास जर डीआयआर योग्य वाटला नाही तर तो अर्जास जोडू नये.
  (फॉर्म १ साठी परिशिष्ट ३ पाहा)

  **कृपया नोंद घ्यावी : कौटुंबिक हिंसेचा अहवाल (डीआयआर) देणे हे अनिवार्य नाही. कौटुंबिक हिंसेविरोधी कायदयाच्या कलम 12 अन्वये न्यायालयाकडे कौटुंबिक हिंसेच्या अहवालाशिवाय (डीआयआर) थेट अर्ज करता येतो.**

- पीडितेने कौटुंबिक हिंसेचा अहवाल (डीआयआर) तयार करण्यासाठी आणि फाईल करण्यासाठी तसेच अन्य मदतीसाठी संरक्षण अधिकाऱ्यांकडे जावे हे सुचवण्यासाठी वकिलाने आपले तारतम्य वापरावे. कौटुंबिक हिंसेचा अहवाल (डीआयआर) हा महत्त्वाचा दस्त ऐवज असून तो न्यायालयाच्या ऑफिसरने, संरक्षण अधिकाऱ्यांनी तयार केलेला असतो. त्याचे न्यायालयात अणि कायद्याने फार मोठे अतिरिक्त मूल्य आहे.

**५. संबंधित आदेश मिळवण्यासाठी योग्य अशी विनंती/ प्रार्थना तयार करावी**

या अधिनियमाचा हिंसा थांबवा हा आदेश म्हणजे जणू प्राणच आहे— त्याचा सदर कायदयाचे कलम 18 असा उल्लेख केला जातो. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की कौटुंबिक हिंसेत सर्व प्रकारच्या हिंसांचा म्हणजे शारीरिक, भावनिक, लैंगिक, किंवा आर्थिक हिंसेचा समावेश होतो ज्याच्याविरुध्द असे आदेश मिळवता येतात.

या संरक्षण आदेशांबरोबरच असे तोडगे असतात किंवा साहाय्य असते की ज्यामुळे हिंसा चालू राहत नाही, परत होत नाही, किंवा होतच नाही. उदाः जर पतीने पत्नीस पोटगी देण्यास नकार दिला तर पत्नी पोटगीच्या आदेशाव्दारे साहाय्य मिळवू शकते, जर तिला एकत्रित घरातून बाहेर काढले – जी शारीरिक आणि आर्थिक हिंसा ठरते – तर ती निवासाचा आदेश मिळवू शकते, जर पतीने पत्नीस मुलापर्यंत येऊ देण्यास तसेच त्याचा ताबा देण्यास नकार दिला - जी मानसिक हिंसा ठरते – ती ताबा देण्याच्या आदेशातून साहाय्य मिळवू शकते. असे आणखी कित्येक आदेश मिळवता येतात.

> अन्य कायद्यांप्रमाणे सदर कायद्यामध्ये एक तोडगा एकाच प्रकारे वापरणे बंधनकारक नाही. या कायद्यान्वये त्याच तोडग्यास अनेक पर्याय असतात आणि ते प्रत्येक केसच्या गरजेप्रमाणे एकाच छताखाली उपलब्ध असतात. प्रत्येक अशिलानुसार कोणत्या आदेशाची विनंती करता येणे आणि अपरंपरागत विचार करणे हे महत्त्वाचे आहे.

ज्या आदेशांची विनंती करण्यात येते / प्रार्थना करण्यात येते ते आदेश सदर कायद्याच्या कलम 18 ते 22 अन्वये दिले जातात आणि ते 'पासून संरक्षण' यासाठीच जारी होतात.—

- संरक्षण आदेश - कलम 18
- निवासाचा आदेश कलम 19 - आर्थिक छळास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी (कलम 3(d)(iv) आणि कलम 17 अन्वये एकत्रित घरात राहण्याचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी
- आर्थिक साहाय्य कलम 20 - आर्थिक छळास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी
- ताबा आदेश - कलम 21 - शारीरिक आणि भावनिक छळास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी (जे लागू असेल ते)
- भरपाईचा आदेश कलम 22 हिंसेमुळे झालेल्या अपायाचा प्रतिबंध करण्यासाठी आणि त्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी कलम 3(d)

**अशा आदेशांविषयी तपशीलवार स्पष्टीकरण खाली दिले आहे -**

**१. <u>संरक्षण आदेश - कलम 18</u>**

संरक्षण आदेश म्हणजे हिंसा थांबवण्याचे आदेश; म्हणजे खालीलपैकी शारीरिक, भावनिक, लैंगिक, किंवा आर्थिक अशी कोणत्याही प्रकारची हिंसा थांबवण्याचे आदेश. ते आदेश फक्त सध्या होत असलेली हिंसा थांबवण्यापुरते नसतात तर तिची पुनरावृत्ती किंवा अन्य प्रकारची कोणतीही हिंसा थांबवतात.

संरक्षण आदेशासाठी विनंती करता येते आणि त्यात खालील एखाद दोन बाबींचा (परंतु तेवढ्यापुरताच मर्यादित नसतो) समावेश असतो.

- प्रतिवादीस..............
    - हिंसेचे कोणतेही कृत्य करण्यापासून थांबवणे
    - पीडितेच्या कामाच्या ठिकाणी जाण्यास किंवा मुलांच्या शाळांमध्ये जाण्यास किंवा जिथे पीडिता जाते अशा अन्य कोणत्याही ठिकाणी जाण्यास मनाई करणे.
    - पीडितेशी अथवा तिच्या कोणत्याही कुटुंब सदस्याशी कोणत्याही प्रकारे संपर्क ठेवू न देणे.
    - पीडितेची कोणतीही मालमत्ता उदाः बँकेशी संबंधित कागदपत्रे, लॉकर्स, किंवा अन्य मालमत्ता घेऊन जाण्यास मनाई करणे
    - पीडितेच्या कोणत्याही नातेवाईकावर, अवलंबून असणाऱ्यावर, किंवा तिला साहाय्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर कुठल्याही प्रकारची हिंसा करण्यापासून थांबवणे
    - त्याच्याकडे अथवा तिच्याकडे असलेली कोणतीही धोकादायक शस्त्रे किंवा स्फोटके देऊन टाकण्यास सांगावे
    - कोणतीही स्फोटके किंवा शस्त्रे किंवा धोकादायक पदार्थ मिळवण्यास मनाई करणे.
    - दारू किंवा अन्य मादक पदार्थांचे सेवन करू न देणे कारण ते हिंसेचे एक मूळ कारण बनते, सुधारण्याचा एक उपचार म्हणून न्यायालय प्रतिवादीस व्यसनमुक्ती केंद्रात जाण्याचा सल्लासुध्दा देऊ शकते. व्यसनामुळे हिंसा होण्याचा धोका जास्त असतो हे लक्षात आणून दिले पाहिजे.
    - पीडितेवर विवाह करण्याची सक्ती लादण्यास मनाई करणे.

- जर प्रतिवादी पीडितेस शिक्षण घेण्यापासून थांबवत असेल तर तसे न करण्याविषयी प्रतिवादीस सांगणे.

- आणि असे कोणतेही केसच्या दृष्टीने संरक्षणासाठी आवश्यक असणारे अन्य आदेश.

जी यादीत घालता येतील अशी विनंतीची काही उदाहरणे खाली दिली आहेत:

प्रतिवादीस कोणत्याही प्रकारची हिंसा करण्याची मनाई करण्याच्या साधारण आदेशाची विनंती करता येते. काही विशिष्ट आदेशांचीसुध्दा विनंती करता येते –

- *प्रतिवादीच्या आर्थिक छळास मनाई करणे .या छळामुळे पीडितेस घरगुती गरजांपासून तसेच तिच्या पोटगीच्या हक्कांपासून वंचित राहावे लागते.*

- *प्रतिवादीच्या भावनिक छळास मनाई करणे- म्हणजे घरकामावर सतत टीका न करणे,पीडितेच्या आई वडिलांना शिव्या न देणे, दारु न पिणे.*

**कौटुंबिक हिंसेच्या प्रत्येक केसमध्ये संरक्षण आदेश अत्यावश्यक का आहे त्याची पाच कारणे :**

१. जोपर्यंत पीडिता न्यायदंडाधिकाऱ्यांकडे (कलम 18 अन्वये जारी केलेला) संरक्षण आदेश मागे घेण्यात यावा असा अर्ज करत नाही तोपर्यंत तो वैध असतो किंवा लागू असतो म्हणजेच जोपर्यंत पीडितेस असे वाटत नाही की प्रतिवादीचे हिंसक वर्तन किंवा कृती कमी झाल्या आहेत आणि आता तिला सुरक्षित वाटत आहे तोपर्यंत तो आदेश लागू असतो.

२. हा आदेश असा विश्वास दृढ करतो की कौटुंबिक हिंसा ही सहन करण्याची बाब नसून पीडितेस हिंसामुक्त, शांतपणे आणि सन्मानाने जगण्याचा हक्क आहे आणि तो मिळवण्यासाठी ती त्यावर सदर कायद्याखाली तोडगा मागू शकते.

३. सर्वोच्च अधिकाऱ्याने हिंसा थांबवण्याचा आदेश दिल्यामुळे प्रतिवादीसुध्दा त्याचे पालन करण्याची शक्यता असते.

४. संरक्षण आदेशाचा भंग करणे हा गुन्हा मानला जातो आणि या गुन्ह्यासाठी सदर कायद्याच्या कलम 31 अन्वये एक वर्षापर्यंत तुरुंगवास आणि / किंवा २०,००० रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

५. संरक्षण आदेशाचा भंग केल्यास कलम 31 लागू करण्यास फक्त पीडितेची साक्ष पुरेशी ठरते.

**संरक्षण आदेशाचा विनंती अर्ज करण्यासाठी वकिलास सूचना**

- खालील बाबींवर पीडितेस माहिती द्यावी/ चर्चा करावी, /सुचवावे, /सल्ला द्यावा:
  - तिला ही माहिती द्या की संरक्षण आदेश हा हिंसा थांबवा आदेश आहे.
  - संरक्षण आदेशाची मागणी करणे हे अत्यंत महत्त्वाचे असून हिंसा थांबवण्यासाठी त्याची विनंती केलीच पाहिजे.
  - 'संरक्षण आदेशात' काय असते याची माहिती पीडितेस दयावी.(वर दिल्याप्रमाणे अनेक प्रकारचे संरक्षण आदेश असतात.)
  - हेही सांगा की संरक्षण आदेश हा कौटुंबिक हिंसेत मदत करणाऱ्या किंवा त्यास पाठिंबा देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीविरुध्द ( प्रतिवादीसह) मिळविता येतो.
  - पीडितेबरोबर एकत्र चर्चा करून चौकशी करा आणि ठरवा की तिला कोणत्या प्रकारचा संरक्षण आदेश हवा आहे आणि तिच्या केसमध्ये सर्वात योग्य असलेला संरक्षण आदेश कोणता याचा तिला सल्ला द्यावा.
  - तिला ही माहिती द्यावी की संरक्षण आदेश जारी करूनसुध्दा जर प्रतिवादी हिंसा करतच असेल तर तो फौजदारी गुन्हा ठरतो.
  - तिली ही माहिती द्यावी की जोपर्यंत पीडिता संरक्षण आदेश मागे घेण्याचा अर्ज करत नाही तोपर्यंत तो लागू राहतो.
- कोणत्याही प्रकारची कौटुंबिक हिंसा घडू नये आणि / किंवा त्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रतिबंध करणाऱ्या विशिष्ट किंवा सर्वसाधारण संरक्षण आदेशाची मागणी करावी.

### २. <u>निवासाचा आदेश - कलम 19</u>

जर प्रतिवादीने पीडितेस सामायिक/ एकत्रित घरातून हाकलून दिले किंवा येऊ दिले नाही तर ती कौटुंबिक हिंसा होते – सदर कायद्याचे कलम 3 स्पष्टीकरण 1(4) अन्वये केलेल्या व्याख्येनुसार तो आर्थिक हिंसेचा प्रकार होतो. अशा केसमध्ये सदर कायद्याचे कलम 12 अन्वये केलेल्या अर्जात वकील अधिनियमाच्या कलम 19 अन्वये निवासाच्या आदेशाचा *तोडगा* मागू शकतो.

सदर कायद्याच्या कलम 17 अन्वये दिलेला 'निवासाचा हक्क' मागण्यासाठी पीडितेस निवासाचा आदेश साहाय्य करतो. त्यात असे नमूद केले आहे की "*सध्या अस्तित्वात असलेल्या व लागू असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यात तरतूद असो व नसो, कौटुंबिक*

*नातेसंबंधात असलेल्या प्रत्येक स्त्रीला एकत्रित घरात रहाण्याचा हक्क आहे, मग त्या मालमत्तेवर तिचा हक्क, नाव, किंवा लाभदायक हितसंबंध असो व नसो"*

**लक्षात ठेवा - निवासाचा आदेश हा हिंसेस प्रतिबंध करण्यासाठी आणि पीडितेस हिंसेपासून संरक्षण देण्यासाठी आहे.** या आदेशामुळे तिला आणि तिच्या मुलांना बेघर होण्यापासून संरक्षण मिळते आणि तिला तिच्या एकत्रित घरावर हक्क दाखवण्यास साहाय्य मिळते.

पीडितेची सुरक्षितता ही सर्वात महत्त्वाची बाब आहे म्हणून सामायिक/ एकत्रित घरात राहण्याच्या हक्कावर दावा करण्यापूर्वी वकिलाने सुरक्षेची पडताळणी केली पाहिजे आणि त्याप्रमाणे निवासाच्या आदेशाबरोबर संरक्षणाचा आदेश मिळवून पुढील हिंसेस आळा घातला पाहिजे.

**हिंसेच्या संभाव्यतेस प्रतिबंध करणारे आदेश हे आधीच कलम 19 अन्वये दिल्या गेलेल्या निवासाच्या आदेशातच खालीलप्रमाणे समाविष्ट आहेत** :

- **मनाईचे आदेश**: खालीलपैकी एक किंवा अधिक बाबतीत प्रतिवादीस किंवा त्याच्या नातेवाईकांस मनाई करण्यात येते
  - एकत्रित घरातून प्रतिवादीची त्यावर मालकी , भाडे, किंवा अन्य ताबा नसला (कलम 19(1)(a)) तरी कौटुंबिक हिंसा पीडितेचे सामान बळकावणे किंवा अस्ताव्यस्त करून टाकणे.
  - जिथे कौटुंबिक हिंसा पीडिता राहते तिथल्या एकत्रित घराच्या कुठल्याही भागात प्रवेश करण्यास मनाई करणे (कलम 19(1)(c).
  - एकत्रित घर कोणत्याही पध्दतीने विभागण्याचा प्रयत्न करणे, विकणे किंवा त्यात अडथळा आणणे यास मनाई करणे.( कलम 19(1)(d)).
  - एकत्रित घरावरचे हक्क सोडून देण्यास मनाई करणे (कलम 19(1)(e).

- **सामायिक/ एकत्रित घरातून प्रतिवादीस स्वतः बाहेर जाण्याचा आदेश**: (कलम 19(1)(b). स्त्रियांच्या समाजातील स्थानाबाबत कायदा संवेदनशील असल्यामुळे एकत्रित घरातील कोणत्याही स्त्रीस जरी ती प्रतिवादी असली तरी घराबाहेर जाण्यास प्रतिबंध करतो. (कलम 19(1)) मधील तरतूद.

- **अन्य आदेश**
    - प्रतिवादीस कौटुंबिक हिंसा करण्यापासून प्रतिबंध घालण्यासाठी तारणासह किंवा तारणाशिवाय बॉँडची अंमलबजावणी करणे
    - संरक्षण देण्यासाठी पोलिसांना निर्देशित करणे किंवा पीडितेस किंवा तिच्या वतीने अन्य व्यक्तीस निवासाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात साहाय्य करणे.
    - सूचना: पोलिसांना असे निर्देश देण्याची गरज असल्याचे तसेच घराला जर कुलुप असेल तर ते तोडण्यास साहाय्य करण्याचा निर्देश द्यावा असे ती पीडिता तिच्या अर्जात स्पष्ट करेल.
    - पोलिसांना संरक्षण आदेशाची अंमलबजावणी करण्याचा निर्देश देणे.
    - पीडिता आणि तिच्या मुलांच्या निवासाच्या हक्कांवर दावा करताना संरक्षण आणि सुरक्षेसाठी अतिरिक्त अटी घालणारे अन्य आदेश

- **एकत्रित घरात राहण्याचा हक्क प्रस्थापित करणारे अन्य आदेश**
    - पीडितेसाठी एकत्रित घरासारखे पर्यायी घर शोधण्याचा व गरज पडल्यास त्याचे भाडे भरण्याचा प्रतिवादीस निर्देश देणे (कलम 19(1)(f))
    - भाडे भरणे किंवा आर्थिक गरजा आणि स्रोतांची परिपूर्तता करण्यासाठी पैसे देणे याची प्रतिवादीवर जबाबदारी लादणे

**निवासाच्या आदेशासाठी विनंती अर्ज लिहिताना वकिलासाठी पूर्वसूचना**

- सर्वात प्रथम पीडिता सामायिक/ एकत्रित घरात राहत आहे आणि तिचे प्रतिवादीबरोबर कौटुंबिक नातेसंबंध आहेत हे दाखवता येण्यासाठी तिला मार्गदर्शन करावे. काही गोष्टी दर्शवून ती हे दाखवू शकतेः
    - पासपोर्ट , आधारकार्ड, रेशन कार्ड यासारखी ओळखपत्रे
    - लीव्ह अॅड लायसेन्स किंवा दोन्ही पक्षांच्या नावे भाडे करार
    - या नातेसंबंधातून जन्मलेली अपत्ये
    - दोन्ही पक्षात असलेले आर्थिक अवलंबित्वाचे स्वरूप
- पीडितेकडून एकत्रित घराचा ताबा कसा काढून घेतला आहे हे दाखवण्यासाठी तिला साहाय्य करणे.
- तिला हे सांगा की प्रतिवादीने कायदेशीर पध्दतीने तिला बेदखल करण्याचा आदेश आणल्याशिवाय तिला बेदखल करता येत नाही. (कलम 17(2)).
- तिला हे सांगा की कायद्याने तिला दोन पर्याय उपलब्ध करून दिले आहेत त्यानुसार ती त्याच एकत्रित घरात राहू शकते किंवा तिला असुरक्षित वाटत असेल तर ती पर्यायी निवासाची मागणी करू शकते.

**पूर्वसूचनाः** पर्यायी निवासाची मागणी करण्याआधी वकील तिला सुचवू शकतो की तिने तिला जिथे घर हवे आहे त्या भागातील सध्याच्या घरांच्या किंमतीचा अभ्यास करावा (भाड्याच्या किंवा विकतच्या) म्हणजे तो न्यायालयात दाखल करता येईल.

- जर प्रतिवादीकडे एखादी जागा उपलब्ध असेल आणि तिथे कोणी राहत नसेल तर त्या जागेच्या किल्ल्या मिळण्याची मागणी करण्यासाठी तशा आदेशासाठी विनंती करावी ज्यामुळे ती जागा तिला उपलब्ध होईल.
- जर पीडितेच्या वकिलास वाटले की प्रतिवादी सरळपणे जागेचा ताबा देणार नाही तर विनंती अर्जातील क्लॉजमध्ये न्यायालयाकडे अशी विनंती करावी की जर त्या जागेला कुलुप असेल तर ते तोडण्यासाठी न्यायालयाने संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर पोलिसांनाही पाठवण्याचा निर्देश द्यावा. असे करण्याने पीडितेचा वेळ आणि तिचे प्रयत्न वाया जाणार नाहीत, नाहीतर तिला आदेशाची परिपूर्ती आणि अंमलबजावणी न झाल्याने पुन्हा न्यायालयात जावे लागेल.
- गरज पडल्यास निवासाच्या आदेशाची अंमलबजावणी करताना पीडितेला घरात जाताना पोलिसांनी संरक्षण द्यावे असा निर्देश न्यायदंडाधिकाऱ्यांनी द्यावा यासाठी विनंतीत तशी मागणी करावी.
- पीडितेस हे अगदी स्पष्ट करून सांगावे की निवासाच्या आदेशामुळे कोणताही मालकी अथवा मूलभूत हक्क निर्माण होत नाही. त्यामुळे फक्त पीडितेकडून एकत्रित घराचा ताबा काढता येत नाही आणि तिला जबरदस्तीने घराबाहेर हाकलता येत नाही.
- सर्वात महत्त्वाचे म्हणजे कलम 18 अन्वये निवासाच्या आदेशाबरोबरच संरक्षण आदेशाचीही मागणी करावी.

३. **<u>आर्थिक साहाय्यासाठी आदेश - कलम 20</u>:**

कौटुंबिक हिंसेचे पीडितेवर परिणाम होतात, कुटुंबावर अल्पकालीन परिणाम होतात तर समाज. राज्य, आणि राष्ट्रावर दीर्घकालीन परिणाम होतात. म्हणून सदर कायदा आर्थिक आदेशाची मागणी पूरी करतो.

- कौटुंबिक हिंसेमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानी बद्दल सदर कायदा संवेदनशील आहे.
- कौटुंबिक हिंसेच्या व्याख्येनुसार (कलम 3) आर्थिक नुकसान किंवा वंचितता हा आर्थिक छळसुध्दा एक प्रकारची कौटुंबिक हिंसा आहे.
- पीडितेस आणि तिच्या मुलांना आर्थिक छळापासून (कौटुंबिक हिंसा) संरक्षण मिळावे म्हणून आर्थिक आदेश दिले जातात.
- म्हणून कलम 12 अन्वये केल्या गेलेल्या अर्जात आर्थिक छळाविरुध्द कलम 18 अन्वये संरक्षण आदेशाची मागणी करणे आवश्यक आहे.

**आर्थिक साहाय्याचा आदेश मिळवण्यासाठी करावयाची विनंती**

कौटुंबिक हिंसेमुळे पीडितेस तसेच तिच्या मुलास / मुलांना जो खर्च किंवा नुकसान सहन करावे लागले त्याचा यात समावेश होतो, तो पुढीलप्रमाणे-

- पीडितेस नोकरीवर जाता येत नसल्याने आर्थिक नुकसान
- कौटुंबिक हिंसा पीडितेवर किंवा पीडितांवर वैद्यकीय उपचार
- मालमत्तेस हानी पोचल्याने, किवा ती नष्ट झाल्यामुळे नुकसान
- कौटुंबिक हिंसा पीडितेच्या ताब्यातून घेतलेली मालमत्ता हलवल्याने झालेले आर्थिक नुकसान
- अन्य खर्च उदाः सुरक्षित जागी जाण्यासाठी करावा लागलेला प्रवास खर्च, किंवा हॉटेलात राहावे लागल्यास तो खर्च, किंवा फोनसाठी करावा लागलेला खर्च
- फौजदारी प्रक्रिया संहितेच्या खाली कलम १२५ अन्वये किंवा त्याशिवाय अधिक किंवा वैयक्तिक कायद्यासह अन्य कुठल्याही कायद्यामुळे पीडितेस किंवा तिच्या मुलांना द्यावा लागणारा पोटगीचा खर्च.
- कौटुंबिक हिंसेमुळे पीडितेस किंवा तिच्या मुलांना आलेला खर्च किंवा त्यांचे झालेले नुकसान.

**आर्थिक साहाय्याचा आदेश मिळवण्यासाठी विनंती अर्ज लिहिण्याविषयी काही पूर्वसूचना**

- पीडितेस विचारावे की ती जे आरोप करत आहे त्याचे पुरावे म्हणून तिच्याकडे काही कागदपत्रे उपलब्ध असल्यास उदाः हिंसेमुळे ती जेव्हा कामावर जाऊ शकली नाही त्यावेळेस तिने किती दिवस बिनपगारी रजा घेतली ज्यामुळे तिचे आर्थिक नुकसान झाले, दैनंदिन खर्चाचे किराणा सामानाचे बिल, वैद्यकीय बिल, हॉस्पिटलचे बिल, शाळा कॉलेजच्या खर्चाच्या पावत्या असे सर्व पुरावे खर्चाची मागणी करण्याकरता दाखवता येतील.
- पीडितेसह ती किती प्रमाणात रक्कम मागत आहे आणि तिला एकूण किती रक्कम हवी आहे ते स्पष्ट करावे. तिने वेगवेगळ्या खर्चाच्या प्रकाराखाली रक्कम लिहावी. उदाः अन्न खर्च, वैद्यकीय खर्च, शाळेची फी, घरगुती बिले, इ. यामुळे न्यायालयासही दावा केलेल्या रकमेविषयी स्पष्ट कल्पना येईल.
- पीडितेस ज्या राहणीमानाच्या दर्जाची सवय आहे त्यानुसार आणि पुरेशा आणि योग्य रकमेची विनंती करावी. (कलम 20(2) अन्वये).
- खर्चाच्या स्वरूपानुसार न्यायालयाने प्रतिवादीस एकरकमी किंवा मासिक पोटगी देण्याचा निर्देश द्यावा म्हणून विनंती करावी.
- प्रतिवादीने पीडितेस आर्थिक साहाय्य कुठे, कधी, कसे करावे याविषयी स्पष्टपणे माहिती देऊन न्यायदंडाधिकाऱ्यांकडून तसे स्पष्ट आदेश मिळवावेत. दिलेल्या तपशिलात ह्याचा समावेश असेल-
  - रकमेचे प्रमाण
  - रक्कम कधी दिली जावी—रक्कम देण्याची महिन्याची विशिष्ट तारीख
  - रक्कम कुठे दिली जावी—न्यायालयात दिली जावी की पीडितेच्या बँक खात्यात जमा केली जावी ते ठरवावे. जर खात्यात जमा करायची असेल तर खात्याचा सर्व तपशील सादर केला जावा.
  - दावा केल्यापासून किती काळ याचा स्पष्ट उल्लेख असावा. साधारणपणे, अर्ज दाखल केल्यापासूनची तारीख धरली जाते त्यामुळे थकबाकीचा हिशेब करणे सोपे जाते.
  - प्रतिवादीने पैसे कसे द्यावे—पोस्ट डेटेड चेकच्या साहाय्याने, बँक ट्रान्सफर का रोख रकमेने इ.
- काही योग्य केसेसमध्ये, परिस्थिती विचारात घेता, आर्थिक साहाय्याची वस्तूच्या रूपात सुध्दा मागणी करता येते .उदाः पैशाच्या स्वरूपात साहाय्य करणे हा जरी अधिक चांगला पर्याय असला तरी काही किराणा माल देण्याचा, औषधे देण्याचा, निर्देश प्रतिवादीस देता येतो.
- अधिक चांगली अंमलबजावणी करता यावी यासाठी आदेशाची प्रत न्यायालयाने पोलिस चौकीकडे आणि संरक्षण अधिकाऱ्यांना पाठवावी अशी विनंती करता येते.

रेणुकाचा पती शेतकरी होता आणि त्याने घरातली कुठलीही जबाबदारी घेण्याचे नाकारले होते. त्याला शेतीतून उत्पन्न होत असे परंतु तो त्यातील काहीही घरखर्चासाठी देत नसे. शेवटी रेणुका न्यायालयात गेली. त्याचे पोटगी देण्यासाठी बँकेत खाते नव्हते परंतु रेणुकास शेती उत्पादनाची माहिती होती. म्हणून तिने आर्थिक साहाय्य मागताना काही रक्कम मागितली आणि काही वाटा शेतीच्या उत्पन्नात मागितला. तो विकून ती स्वतःचे उत्पन्न मिळवू शकत होती.

या केसमध्ये पैशाच्या ऐवजी शेती उत्पादनातील वाटा मागितला गेला. वकिलाने आर्थिक साहाय्य मिळण्याबाबतच्या शक्यतेची चर्चा करून त्याप्रमाणे हेतू साध्य होईल असे नवीन मार्ग शोधून काढावेत.

**पूर्वसूचनाः** जर प्रतिवादीने आर्थिक आदेशाची परिपूर्ती केली नाही किंवा पैसे दिले नाहीत, तर प्रतिवादीच्या मालकास, किंवा कर्जदारास, प्रतिवादीच्या पगारातून किंवा रोजगाराच्या पैशातून थेट पीडितेस पैसे देण्यासाठी निर्देशित करण्याचा न्यायदंडाधिकाऱ्यांस अधिकार आहे.

४. **<u>ताबा आदेश – कलम 21</u>** :

सदर कायदयाच्या कलम 2(b) नुसार 'मूल' म्हणजे अठरा वर्षांखालील कोणतीही व्यक्ती आणि त्यात मुलगी आणि मुलगा असा दोन्ही अपत्यांचा समावेश होतो. त्यात पीडितेच्या दत्तक, सावत्र, किंवा मानलेल्या मुलांचाही समावेश होतो. ताबा आदेशानुसार पीडितेस मुलांचा तात्पुरता ताबा मिळतो.

कायमस्वरूपी ताबा मिळविण्यासाठी (हा वादाचा मुद्दा असेल तर) पीडितेस किंवा प्रतिवादीस गार्डियनशिप आणि वॉर्ड्स कायद्यातील तरतुदींचा किंवा पीडितेस किंवा प्रतिवादीस लागू असलेल्या पर्सनल लॉचा (व्यक्तिविषयक कायद्याचा) आधार घेतला पाहिजे.

न्यायदंडाधिकाऱ्यांना मुलांना किंवा मुलाला भेटण्याची परवानगी देण्याचा अधिकार आहे तसेच त्या भेटींची व्यवस्था प्रतिवादीने करावी असे सांगण्याचाही अधिकार आहे.
तात्पुरत्या ताबा देण्याच्या केसचा विचार करताना मुलाच्या किंवा मुलांच्या सर्वाधिक हिताचे काय आहे याचा न्यायालय विचार करते. 'सर्वाधिक हिताचे' हा निकष आर्थिक आणि भौतिक घटकांपेक्षा मुलाच्या मनो-सामाजिक आरोग्यपूर्ण निगेसाठी आणि वाढीसाठी जे घटक कारणीभूत आहेत त्यावर भर देतो.

**ताबा आदेशाच्या विनंतीचा मजकूर लिहिण्यासाठी पूर्वसूचना**

खालील गोष्टींची खातरजमा करून घेणे वकिलासाठी महत्त्वाचे असते-

- पीडितेस याची माहिती द्यावी की हा ताबा आदेश तात्पुरता असून प्रतिवादीकडे मुले असल्यास त्याने त्या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन पीडितेच्या हिंसा थांबवण्याच्या प्रयत्नांना खीळ घालू नये हा या आदेशामागचा उद्देश असतो.
- शक्य तेवढे ह्या आदेशाची मागणी केसच्या सुरुवातीसच केली जावी.
- पीडितेस ही माहिती द्यावी की मुलाचे आर्थिकदृष्ट्या पालन पोषण करण्याची पीडितेची असमर्थता हे तिच्याकडे मुलाचा ताबा न देण्याचे कारण असते असे बऱ्याच महिलांना वाटू शकते.
- जर प्रतिवादीने मुलाचा छळ केला असेल किंवा तो करत असेल तर सदर कायदयाच्या कलम 12 अन्वये केलेल्या अर्जात तसे सर्व तपशील देऊन नमूद करावे, त्यामुळे मुलाच्या हिताचा विचार करता प्रतिवादीस मुलापर्यंत पोचण्यास बंदी करणारा किंवा भेट नाकारणारा आदेश न्यायालयाकडून मिळविता येतो.
  या आदेशाचे स्वरूप तात्पुरते असल्याने त्याचवेळी वकिलाने अन्य कायद्यांच्या आधारे ताबा मिळविण्यासाठी पीडितेस साहाय्य करावे.

ह्या आदेशासाठी विवाद करताना 'मुलाच्या हिताचे' सर्व घटक त्यात आणावेत.

### ५. <u>भरपाईचा आदेश - कलम 22</u>

सदर कायदा हे मान्य करतो की पीडितेस शारीरिक इजेमुळे, मानसिक छळामुळे, किंवा अन्य भावनिक छळामुळे जो त्रास सहन करावा लागला त्याची भरपाई मागण्याचा हक्क आहे.

सदर कायदा हेही मान्य करतो की कौटुंबिक हिंसाचारामुळे पीडितेचा जो प्रत्यक्ष आर्थिक खर्च झाला त्यापेक्षा कैक पटीने जास्त तिचे नुकसान झाले म्हणून भरपाईचा आदेश हा आर्थिक आदेशाहून वेगळा आहे. भरपाईमुळे तिला जीवन नव्याने सुरू करण्यास साहाय्य मिळते.

सदर कायदयाने देऊ केलेल्या अन्य आणि आर्थिक आदेशांपेक्षा भरपाईचा आदेश हा सर्वात महत्त्वाचा आहे. कलम 12 अन्वये भरपाईच्या आदेशासाठी विनंती करता येते.

कोणत्याही अन्य दिवाणी कायद्याखाली भरपाईसाठी केलेल्या दाव्याव्यतिरिक्त पीडितेस सदर कायदयांतर्गत या आदेशाची मागणी करता येते. जर अन्य दिवाणी केसमध्ये तिला भरपाई मिळाली तर तिला ते न्यायालयात उघड करावे लागते.

केसमधील वस्तुस्थितीचे आणि परिस्थितीचे तसेच किती अपाय झाला आहे त्याचे मूल्यमापन केल्यानंतर न्यायालय भरपाईची रक्कम ठरवते आणि ती एका वेळी दिली जाते.

**भरपाईचा आदेश मिळवण्यासाठी विनंती करण्याविषयी पूर्वसूचना**

- सर्वात प्रथम पीडितेस आर्थिक आदेश आणि भरपाईचा आदेश यातील फरक समजावून सांगावा.
- कौटुंबिक हिंसेमुळे झालेल्या इजा, मानसिक त्रास, आघात तसेच नुकसान / नासाडी इ.चे स्वरूप कसे होते त्याचा शोध घ्या.
- विनंतीत भरपाई कशासाठी हवी त्या हेतूचा उल्लेख करा.
- त्याचवेळी पीडितेकडे नसलेल्या साधन सामुग्रीचा उल्लेख करा आणि भरपाईची गरज का आहे त्याचे समर्थन करा.
- अन्य दिवाणी कायद्यात मिळालेल्या कुठल्याही भरपाईचा अर्जात उल्लेख करा.

### ६. अंतरिम आदेशाची मागणी / विनंती - कलम 23

कायदेशीर कारवाईमुळे उशीर होत असल्याने तातडीने संरक्षण मिळवण्यासाठी आणि हिंसेस आळा घालण्यासाठी अंतरिम आदेश मिळवणे उचित होईल. महिला न्यायालयात आल्यामुळे कुटुंबाची बेइज्जती झाली असे समजून कुटुंबाकडून तिला जास्त हिंसेस तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. संरक्षणाच्या अंतरिम आदेशामुळे (आणि साहाय्यामुळे) पीडितेस कमी धोक्याच्या किंवा अजिबात धोका नसलेल्या परिस्थितीत कारवाई पुढे नेता येते.

सदर कायदयाच्या कलम 23 अन्वये अंतरिम आणि एकतर्फी आदेश देता येतात. त्यासाठी अर्जातच विनंती करता येते परंतु शपथपत्र तयार करून ते न्यायदंडाधिकाऱ्यांकडे सादर करावे लागते, त्यात त्या पीडितेस शपथपूर्व हिंसा झाली असे सांगावे लागते. शपथपत्र हे महत्त्वाचे असते कारण कौटुंबिक हिंसेच्या बऱ्याच केसेसमध्ये त्या महिलेकडे हिंसेचा कागदोपत्री पुरावा नसतो कारण हिंसा चार भिंतींच्या आड बंद दरवाजामागे घडते. म्हणून सदर कायदा शपथपत्राच्या[3] रूपाने महिलेस तिचा पुरावा सादर करण्याची परवानगी देतो. सदर कायद्याखाली फाईल केलेल्या केसेसमध्ये, शपथपत्राचे प्रारूप फॉर्म ३ मध्ये नियम 6(4) आणि सदर कायदयाच्या नियम 7 खाली विहित केले आहे.[4] (फॉर्म ३ साठी परिशिष्ट ४ पाहा)

---

[3] निर्णयविधीनुसार विशाल दामोदर पाटील वि.विशाखा विशाल पाटील २००९ फौजदारी कायदा जे. 107 मुंबई, अन्वये असे ठरवले गेले की कलम 23 अन्वये स्वतंत्र अर्ज देणे बंधनकारक नाही, कलम 12 अन्वये केलेल्या अर्जात अंतरिम आदेशाची विनंती करता येते.

[4] फॉर्म ३ 'as nearly as possible' असा फाईल केला पाहिजे. जर अन्य तक्रारीचा मसुदा अशा पध्दतीने आवश्यक त्या सर्व तपशिलासह आणि फॉर्म ३ मधील विहित नमुन्याप्रमाणे माहितीसह लिहिला गेला तर तो

दिवाणी कारवाई संहितेच्या आदेश क्र. XIX ची तरतूद शपथपत्राशी संबंधित आहे. आदेश क्र. XIX चा नियम 3(1) ज्या बाबीपुरते शपथपत्र सीमित असेल त्या बाबींशी संबंधित आहे आणि त्यात अशी तरतूद आहे की:

> *"ज्या बाबीपुरते शपथपत्र सीमित असेल – १ शपथपत्र अशा बाबींपुरते सीमित असेल की ज्या बाबी अभिसाक्षी त्याच्या ज्ञानानुसार सिध्द करू शकेल, अपवाद फक्त वादकालीन अर्जाचा असेल ज्यावर त्याला जे वाटले ते विधान मान्य केले जाईल जर त्याचे कारण दिले गेले तर."*

शपथपत्र वाचल्यावर जर न्यायदंडाधिकाऱ्यांना सकृद्दर्शनी वाटले की ही केस कौटुंबिक हिंसेची आहे तर ते अंतरिम आदेश आणि एकतर्फी आदेश देतील.

## आदेशा अंमलबजावणी करण्याची योजना विनंतीत समाविष्ट करावी

अंमलबजावणी योजना जर विनंतीत समाविष्ट केली तर त्याप्रमाणे न्यायालयाला आदेश देता येतील आणि आदेशांची त्वरित व प्रभावीपणे अंमलबजावणी करता येईल. पीडितेस तिची स्वतःची परिस्थिती माहीत असते आणि प्रतिवादी अंमलबजावणी लांबवण्यासाठी कोणत्या क्लृप्त्या करू शकतो हे ती जाणते, म्हणून अंमलबजावणी योजना तिच्या सल्ल्याने करावी. उदाः पोटगीचा आदेश देताना किती रक्कम द्यावी, त्याचा तपशील, ती कुठे दिली जावी, कोणत्या स्वरूपात दिली जावी (रोख, चेक, किंवा ई-ट्रान्सफरने) आणि कधी दिली जावी ती तारीख या सर्वाचा समावेश असावा. निवासाच्या बाबतीत जर घराला कुलुप आढळले तर पोलिसांच्या साहाय्याने ते तोडण्याची परवानगी मागावी.

---

स्वीकारलाच पाहिजे. हे मिलनकुमार सिंग वि. यू.पी, राज्य २००७ फौजदारी प्रक्रिया संहिता जे.4742 नुसार ठरवले गेले.

## २.८ पीडितेने केलेल्या आरोपांसाठी पुरावा मिळवा

पीडितेने सहन केलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या हिंसेसाठी पुरावा कसा मिळवावा ते वकिलाने तिला सांगावे. याचा तिला तिच्या केसची तयारी करण्यासाठी उपयोग होईल. बरेच वेळा महिला कारवाई करण्याचा निर्णय घेण्यास घाबरतात कारण त्यांना असे वाटते की त्या त्यांची केस सिध्द करू शकणार नाहीत. वेगवेगळ्या हिंसा प्रकारांसाठी देता येणारे काही पुरावे खालील प्रमाणे आहेत:

| **शारीरिक हिंसा** | **भावनिक किंवा मानसिक हिंसा** | **लैंगिक हिंसा** | **आर्थिक हिंसा** |
|---|---|---|---|
| शारीरिक इजा झाल्यास वैद्यक कायदा प्रमाण पत्र | नैराश्य, ताण आल्याचे डॉक्टरांचे प्रमाणपत्र, पीडितेने तिच्या नातेवाईकांना, मैत्रिणींना किंवा अन्य व्यक्तींना लिहिलेली पत्रे, मेसेजेस,इ. | नको त्या भाषेत लिहिलेले इ-मेल, किंवा मेसेजेस | प्रतिवादीच्या खात्यात जमा झालेले पैसे दाखवणारे बँकेचे कागद |
| इजा झाल्याचे फोटो, जुन्या व्रणांचा उल्लेख असावा. | प्रतिवादीने लिहिलेली शिवराळ भाषेतील हिंसा दर्शवणारी पत्रे, मेसेजेस | लैंगिक छळ झाल्याचे वैद्यक कायद्याचे प्रमाणपत्र | भाडे न देणे, दैनंदिन खर्चाची, वीज, किराणाची बिले थकवणे, |
| पोलिसांकडे केलेल्या कुठल्याही तक्रारीची प्रत | शपथपत्र | लैंगिक गुन्हयापासून मुलांना संरक्षण या कायद्यान्वये(२०१२) एफआयआर जर प्रतिवादीने कौटुंबिक नातेसंबंधातील मुलांवर लैंगिक अत्याचार केले | क्रेडिट कार्डच्या बिलातून प्रतिवादीने केलेला खर्च दिसून येणे |
| --- | हिंसा पाहिलेले किंवा ऐकलेले साक्षीदार | ---- | कौटुंबिक हिंसेमुळे कामावर गैरहजेरी (पुष्टी देणारा पुरावा) |

ही फक्त उदाहरणांची सूचक यादी असून त्यावरून कोणते पुरावे देता येतात ते समजते.

## २.९ अशिलाचा अन्य सेवांशी संपर्क घडवून आणा:

या मार्गदीपिकेत आधी म्हटल्याप्रमाणे ,तपशीलवार माहिती घेताना पीडितेस अन्य कोणत्या सेवांची गरज आहे का ते तपासले पाहिजे, तशी गरज असल्यास तिला मिळू शकणाऱ्या सेवांची माहिती वकील देऊ शकतो. जर तिने या सेवा केस दाखल करण्याआधी किंवा नंतर घेण्याचे ठरवले तर वकील तिचा त्या सेवांशी संपर्क करून देऊ शकतो.

**उदाः**

**संरक्षण अधिकाऱ्यांच्या सेवेचा वापर करावा**: पीडितेस सांगावे की संरक्षण अधिकारी तिला मदत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. कौटुंबिक हिंसा अहवाल (डीआयआर) तयार करणे,कारवाईच्या कालावधीत पाठिंबा देणे, अंतरिम आणि अंतिम आदेशांची अंमलबजावणी करणे, अणीबाणीच्या काळात पीडितेपर्यंत पोचणे इ.बाबतीत मदत होते. पीडितेचा संरक्षण अधिकाऱ्यांशी संपर्क साधून दिल्यास त्यांच्यात जवळीक निर्माण होण्यास साहाय्य होते.

**आवश्यकता भासल्यास पोलिसांची मदत घ्यावी:** पोलिसांकडे दाखल केलेली तक्रार हा पुरावा होऊ शकतो. पोलिसांकडे केलेली अदखलपात्र गुन्ह्याची तक्रारसुध्दा जरब बसवण्यास साहाय्य करते. काही वेळा महिलेस पोलिसात तक्रार दाखल करायची नसते आणि तरीही तिला हिंसेस तोंड द्यावे लागत आहे हे पोलिसांना कळू द्यायचे असते, अशा प्रसंगी ती जरब बसवण्यासाठी पोलिसांना तिच्या तक्रारीची त्यांच्या स्टेशन डायरीत नोंद करायची विनंती करू शकते. गस्त घालणारे पोलिस जरी तिच्या मदतीसाठी आले तरी ते तिला तिची तक्रार पोलिस डायरीत नोंदवली आहे का याची तपासणी करायला सांगून मार्गदर्शन करू शकतात.

**निवारागृहाशी संपर्क साधणे:** तिची सुरक्षितता ही सर्वात महत्त्वाची आहे. जर पीडितेस घरी सुरक्षित वाटत नसेल आणि तिला अन्य कोणतीही राहण्याची जागा नसेल तर वकिलाने तिचा निवारागृहाशी संपर्क साधून द्यावा. (कायद्याने नोंद केलेली किंवा अधिसूचित केलेली) निवारागृहे सेवा देणारी म्हणून कौटुंबिक हिंसा अहवाल (डीआयआर) दाखल करू शकतात.

**वैद्यकीय साहाय्य :** जर पीडितेस शारीरिक इजा झाली असेल किंवा हिंसेचे तिच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम झाले असतील तर वकील तिला मनो-वैद्यकीय मदत घेण्याचा सल्ला देऊ शकतो. त्यामुळे स्वतःची काळजी घेणे ही तिची सर्वात प्राथमिक जबाबदारी आहे हे तिला कळू शकते. त्यामुळे कारवाईमुळे आलेल्या ताणास ती अधिक चांगल्या प्रकारे तोंड देऊ शकते. आवश्यकतेनुसार तिला दिलेले प्रिस्क्रिप्शन, वैद्यकीय तपासण्यांचा अहवाल पुरावा म्हणून वापरता येतील. योग्य असेल

तिथे वैद्यक-कायदा केससुध्दा करता येईल. वकिलाने पीडितेस सांगावे की कारवाई चालू असताना सुध्दा जर तिला हिंसेस तोंड द्यावे लागले तर तिने पोलिसांकडे आणि वैद्यकीय सुविधांकडे जावे  आणि वैद्यकीय तपासणीचा अहवाल घ्यावा.

**समुपदेशन सेवा:** पीडिता जेव्हा केस फाईल करण्याचा निर्णय घेते तेव्हा तिने समुपदेशकाची मदत घ्यावी असे वकील तिला सुचवू शकतो. या समुपदेशनामुळे तिला तणावपूर्ण परिस्थितीचा सामना करण्यास, स्वाभिमान ठेवण्यास, आणि आत्मविश्वास वाढवण्यास साहाय्य  होऊ शकते.  बऱ्याच स्त्रियांना न्यायालयात जाण्यात अपराधीपणाची भावना वाटते आणि त्यांना सतत हे सांगून दिलासा द्यावा लागतो की तिला मानाचे, सन्मानाचे, आणि हिंसामुक्त नातेसंबंध ठेवण्याचा हक्क आहे. अशा प्रकारच्या समुपदेशनामुळे ती कारवाईस अधिक चांगल्या प्रकारे तोंड देण्यास तयार होऊ शकते. अशी पण शक्यता असते की समुपदेशक प्रतिवादीस बोलावू शकतो आणि जर त्याने सकारात्मक रित्या समुपदेशनास प्रतिसाद दिला तर ती समस्या एकतर सलोख्याने किंवा खेळीमेळीच्या वातावरणात विभक्त होऊन सुटू शकते.

पीडितेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलाने निव्वळ केस फाईल करण्याच्या एकमेव हेतूने काम करू नये तर सर्वंकष दृष्टिकोन ठेवून पीडितेस हिंसेच्या परिस्थितीतून शक्यतो सर्वोत्कृष्ट पध्दतीने बाहेर येण्यास साहाय्य  करावे.

## अर्ज तयार करताना लक्षात ठेवण्याचे काही मुद्दे

१. कोणत्याही प्रकारे निर्णायक न होता पीडितेविषयी समानुभूती ठेवावी.
२. कोणत्याही प्रकारचा विपर्यास न करता सर्व वस्तुस्थितीचा उल्लेख करावा.
३. जेव्हा वकिलास एखादी विशिष्ट गोष्ट  खात्रीपूर्वक माहीत नसते तेव्हा ती गृहीत न धरता अशिलास विचारून खात्री करून घ्यावी.
४. हिंसेचा तिच्या जीवनावर कसा परिणाम झाला आहे त्याविषयी लिहावे.
५. पुराव्यनिशी वस्तुस्थिती पडताळून घ्यावी आणि त्यात जर काही विरोधाभास आढळला तर तो दूर करावा  म्हणजे कुठलीही संदिग्धता न ठेवता पीडितेचे प्रतिनिधित्व करता येईल.
६. तिचा विनंती अर्ज तयार करताना तिला विचारावे की तिला आदेश कसे हवे आहेत.
७. जिथे जिथे तिला पुरावे देता येत असतील तिथे तिथे ते जोडावेत.
८. तिने सही करण्यापूर्वी तिला अर्जातील मजकूर वाचायला सांगावा.
९. मजकूरातील तिच्या सर्व शंकांचे निरसन करा कारण अशिलाच्या आणि वकिलाच्या विचारात एकवाक्यता असायला हवी.

१०. शक्य तो अशिलास सोपी वाटेल अशी भाषा मजकूरात वापरावी.

११. विविध आदेशातून तिला काय मिळू शकते ते स्पष्ट करा म्हणजे

तिची निवड मिळालेल्या/ समजलेल्या माहितीवर पूर्णपणे आधारित असेल.

**अर्जाच्या मजकूरात विनंतीमधील प्रत्येक वस्तुस्थितीचा परामर्श घेतला जावा जेणेकरून कोणतीही संदिग्धता राहणार नाही. एकदा अर्ज फाईल केल्यानंतर त्यात सुधारणा करणे ही काही सोपी प्रक्रिया नाही.** ती वेळखाऊ आहे आणि इतकेच नव्हे तर त्यामुळे अंतरिम आदेश मिळण्याससुध्दा विलंब होऊ शकतो. म्हणून वकिलाने अर्जाचा मसुदा तयार करताना खूप परिश्रम घेतले पाहिजेत.

# ३.० कारवाई चालू असताना

## कारवाई चालू असताना

१. अर्ज न्यायलयात फाईल करणे
२. नोटीस बजावणे
३. प्रतिवादीचे लेखी निवेदन आणि खटल्यास सामोरे जाणे
४. गरजेनुसार समुपदेशकाकडे जाण्या बाबत निर्देश मागणे/करणे
५. पुरावा नोंदवणे
६. युक्तिवाद
७. अंतिम आदेश

## ३.१ अर्ज न्यायालयात फाईल करणे:

### ३.१.१ अर्ज कोठे फाईल करावा

सदर कायद्याच्या कलम 12 अन्वये प्रथमवर्ग ज्युडिशियल मॅजिस्ट्रेटकडे किंवा पीडितेचे कायमस्वरूपी अथवा तात्पुरते निवास स्थान असलेल्या विभागात किंवा जिथे प्रतिवादी राहत आहे अशा ठिकाणच्या किंवा जिथे कौटुंबिक हिंसा घडली आहे अशा न्यायक्षेत्रात जे महानगर प्रथमश्रेणी न्यायाधीश असतात त्यांच्याकडे अर्ज दाखल केला जातो.

पीडितेची जर दिवाणी, फौजदारी किंवा कौटुंबिक न्यायालयात अन्य केस कलम 12 खालील अर्जाच्या प्रतिवादीच्या विरोधात प्रलंबित असेल तर सदर कायदयाच्या कलम 26 अन्वये त्याच न्यायालयात अर्ज दाखल करता येतो. या तरतुदीमुळे त्याच दोन पक्षात एकाच न्यायालयात केस प्रलंबित असेल तर ह्या न्यायालयातून त्या न्यायालयात धावपळ करायला न लागता तिथेच केस दाखल करता येते.

### ३.१.२ अर्जाबरोबरच कौटुंबिक हिंसेचा अहवाल (डीआयआर) सुध्दा दाखल करायला लागतो का?

बऱ्याच केसेसमध्ये जेव्हा केस थेट वकिलाकडून फाईल केली जाते तेव्हा अर्जाबरोबर कौटुंबिक हिंसेचा अहवाल (डीआयआर) फाईल केला जात नाही. हे बंधनकारक[5] नसल्यामुळे न्यायालय संरक्षण अधिकाऱ्यांना कौटुंबिक हिंसेचा अहवाल (डीआयआर) फाईल करायला सांगू शकते.

| |
|---|
| **पूर्वसूचना** : जर कौटुंबिक हिंसेचा अहवाल (डीआयआर) नसेल तर सदर कायद्याखालील केससाठी कौटुंबिक हिंसेच्या अहवालाची (डीआयआर) आवश्यकता नसल्याचे नमूद करावे. त्यामुळे विलंब टाळता येतो. |

तथापि, असे असून सुध्दा न्यायालयाने डीआयआर असल्याशिवाय कारवाई पुढे जाणार नाही असा आग्रह धरला तर आणि त्यामुळे पीडितेचा अवाजवी वेळ जात असेल तर वकील न्यायालयास पीडितेच्या सुरक्षेसाठी अंतरिम आदेश देण्याची विनंती करू शकतो.

काहीवेळा संरक्षण अधिकाऱ्यांना डीआयआर फाईल करण्यासंबंधीचा न्यायालयाचा आदेश मिळण्यास विलंब होतो. या प्रक्रियेस गती देण्यासाठी, वकील संरक्षण अधिकाऱ्यांना देण्याचा आदेश अधिनियम कलम 28 अन्वये हाताने, नेऊन देण्यास परवानगी द्यावी अशी विनंती करू शकतो / शकते.

संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर संबंध प्रस्थापित करून वकील या प्रक्रियेस गती कशी देता येईल ते पाहू शकतो.

### ३.१.३ आधीच फाईल केलेल्या अर्जातील सुधारणा

अर्ज फाईल केल्यावर पीडितेस त्यात उल्लेख न केलेल्या काही गोष्टी आठवणे शक्य आहे. कौटुंबिक हिंसेतील प्रत्येक सत्य पीडितेस अनुकूल असणारे आदेश मिळवण्यासाठी महत्त्वाचे आहे. म्हणून वकिलाने पीडितेस असे सांगितले पाहिजे की ती न्यायदंडाधिकाऱ्याकडे अर्ज करून तिच्या विनंतीत सुधारणा करण्याची परवानगी मागू शकते.

---

[5] अमर कुमार महादेव विरुद्ध कार्तीयायिनी (MANU/TN/9632/2007) हया केस मध्ये असा निर्णय झाला की केस मध्ये दखल घेण्यासाठी डी आय आर असण्याची गरज नाही.

अशी सुधारणेसाठीची विनंती करताना वकिलाने  हे सांगितले पाहिजे की महत्त्वाच्या वस्तुस्थितीचा समावेश केला जावा आणि त्यातील कोणत्याही गोष्टी वगळल्या जाऊ नयेत. सुधारणेच्या विनंतीबाबत प्रतिवादीच्या वकिलाचे काय म्हणणे आहे ते ऐकून न्यायालयाकडून मगच आदेश दिला जाईल. अशा वेळी वकिलाने कलम 28 अन्वये न्यायालयाकडे असलेल्या व्यापक अधिकाऱाच्या आधारावर न्यायालयाने सुधारणा करू द्याव्या असे सांगून न्यायालयाचे मन वळविले पाहिजे.

मीनाला तिच्या पतीकडून शारीरिक, आर्थिक, मानसिक, आणि लैंगिक हिंसाचारास तोंड द्यावे लागले. तिची केस फाईल करणाऱ्या वकिलाने फक्त आर्थिक हिंसाचाराचा उल्लेख केला आणि अन्य प्रकारच्या हिंसेचा उल्लेखच केला नाही. त्यामुळे न्यायालयाला ती किती असुरक्षित होती हे कळलेच नाही म्हणून तिने केलेली सुरक्षेच्या आदेशाची मागणी न्यायालयाने फेटाळून लावली.

तिची परिस्थिती कळल्यावर दुसऱ्या वकिलाच्या लक्षात आले की तिने केलेली विनंती पुरेशी नाही. तसेच लैंगिक छळाविषयी तिला वाटत होते की त्याविषयी बोलल्यास आपल्या कुटुंबाचे नाव बदनाम होईल म्हणून तिने त्याबाबतीत मौन पाळले आहे हेही त्या वकिलाच्या लक्षात आले. सर्व वस्तुस्थितीचा उल्लेख करणे व त्याविषयी लिहिणे महत्त्वाचे आहे कारण त्यामुळे न्यायालय योग्य तो निर्णय घेऊन त्या प्रमाणे आदेश काढू शकते असे त्या वकिलाने तिला सांगितले. शेवटी मीना तयार झाली. वकिलाने न्यायालयात अर्ज करून त्यात महत्त्वाच्या वस्तुस्थितीचा उल्लेख का केला नाही ह्याचे कारण नमूद केले. नंतर पहिला अर्ज रद्द करू देण्ऱाची विनंती केली आणि नवीन अर्ज करू देण्याची परवानगी मागितली.

या केसमध्ये फारच थोडी वस्तुस्थिती मांडली होती त्यामुळे त्यात खूप मोठे बदल करण्यात आले म्हणून जुना अर्ज रद्द करू देण्याची विनंती करण्यात येऊन नवीन अर्ज करू देण्याची परवानगी मागितली. जेव्हा थोडेसेच किरकोळ बदल करायचे असतात तेव्हा सुधारणेसाठी अर्ज करता येतो. कौटुंबिक हिंसा थांबविण्याच्या एकमेव उद्देशाने न्यायालयास प्रस्थापित पध्दत सोडून वागण्याचा सदर कायद्याच्या कलम 28 अन्वये अधिकार असतो. तो वापरण्यासाठी वकील न्यायालयाचे मन वळवू शकतो.

### ३.१.४ सुरक्षा नियोजन करणे

वकिलाने पीडितेबरोबर हिंसेचा धोका किती आहे याविषयी चर्चा करावी आणि सुरक्षा उपाय योजण्याचा विचार करावा तसेच सदर नियम मधील फॉर्म ५ नियम ८ (१)(४) प्रमाणे सुरक्षा योजना तयार करावी.

असे केल्याने पीडितेच्या परिस्थितीस नेमकेपणाने लागू होणाऱ्या सुरक्षा पर्यायांचा तिला विचार करावाच लागेल हे तिच्या दृष्टीने चांगले होईल. आवश्यकता भासल्यास केसची सुनावणी चालू असताना कधीही फॉर्म ५ मधील सुरक्षा योजना योग्य तऱ्हेने भरून वकील प्रथमश्रेणी न्यायाधीशाकडे सादर करू शकेल. यामुळे न्यायालयाला परिस्थितीचे गांभीर्य कळण्यास साहाय्य  होईल  आणि आदेश लवकर मिळवण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

### ३.१.५ अंतरिम आणि एकतर्फी आदेश मिळविण्याकरता शपथपत्र भरून देणे

अधिनियमाच्या कलम 23 अन्वये अंतरिम आणि एकतर्फी आदेश शपथपत्राव्दारे मिळविता येतात,त्याचा फॉर्मॅट सदर कायदयाच्या  फॉर्म ३ नियम 6(4)आणि 7 मध्ये पुरवलेला असतो.

हे आदेश प्रतिवादीच्या सुनावणीशिवाय किंवा जेव्हा न्यायालयाला सकृद्दर्शनी असे वाटते की ही केस कौटुंबिक हिंसेची आहे आणि तिची त्वरित दखल घेऊन हिंसा थांबवली पाहिजे तेव्हा नोटीस देण्याच्या आधीसुध्दा देता येतात.

आदेशाचे स्वरूप अंतरिम असल्याने जेव्हा परिस्थिती बदलते तेव्हा ते आदेशही बदलता येतात.

शपथपत्राचे अवलोकन केल्यावर जर न्यायदंडाधिकाऱ्यांचे असे मत झाले की प्रतिवादीने कौटुंबिक हिंसा केली आहे , तो ती करत आहे किंवा ती करण्याची शक्यता आहे तर एकतर्फी अंतरिम आदेश देता येतो. एकतर्फी अंतरिम आदेश का दिला जावा ह्याचे वकिलास न्यायालयास स्पष्टीकरण द्यावे लागते.

राधिका पीएचडी करत होती आणि त्यासाठी तिला शिष्यवृत्तीही मिळाली होती. तिच्या आई आणि भावांना तिचा पीएचडी करण्याचा निर्णय मान्य नव्हता कारण त्यांना तिने लग्न करायला हवे होते आणि तिचा त्याला नकार होता.  त्यामुळे घरात खूपच तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती व त्यामुळे त्याच घरात एकत्र राहणे तिला अवघड झाले होते. ती आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असल्याने तिला घराबाहेर पडायचे होते. जेव्हा तिने

तिच्या आई आणि भावांना ते सांगितले तेव्हा त्यांनी तिला धमकावायला सुरुवात केली. म्हणून ती संरक्षण आदेशाशिवाय घराबाहेर पडू शकत नव्हती कारण तिला भीती वाटत होती की ते तिला अपाय करतील.

तिने सदर कायदयाच्याखाली संरक्षण आदेशासाठी अर्ज केला. सुरुवातीस न्यायालयाची एकतर्फी अंतरिम आदेशाचा अर्ज विचारात घेण्याची तयारी नव्हती. वकिलाने जेव्हा असा युक्तिवाद केला की सर्वात प्रथम या केसमध्ये काळ हा सर्वात मोठा भाग आहे कारण ती घराबाहेर पडल्याशिवाय ती तिचा अभ्यास करू शकत नव्हती. दुसरे म्हणजे जर प्रतिवादींना नोटीस पाठवली तर ते तिचे घराबाहेर पडणे अजिबातच बंद करून टाकतील आणि त्यांना तिने केस केली आहे कळल्यावर ते तिला केसलाही उपस्थित राहू देणार नाहीत. न्यायालयाला हा युक्तिवाद पटला आणि ज्या दिवशी तिने अर्ज दाखल केला त्याच दिवशी तिला नोटीस न बजावता अंतरिम आणि एकतर्फी संरक्षण आदेश मिळाला. म्हणून ती अंतरिम आणि एकतर्फी संरक्षण आदेशासह सुरक्षितपणे घराबाहेर पडू शकली.

सदर कायद्यातील अंतरिम आणि एकतर्फी आदेशाची तरतूद हिंसा तत्काळ थांबावी यासाठी आहे. साधारणपणे कौटुंबिक हिंसेच्या केसमध्ये पीडिता शेवटचा उपाय म्हणून न्यायालयात येते. सुरक्षेसाठी ती किती हातघाईस आली आहे हे वकिलाने समजून घेतले पाहिजे आणि अंतरिम आणि एकतर्फी आदेश त्वरित देण्याची आवश्यकता का आहे ते न्यायालयास पटवून दिले पाहिजे. बऱ्याच केसेसमध्ये अंतरिम आदेश एकतर्फी न देण्यामागे न्यायालयाचे असे म्हणणे असते की दुसऱ्या पक्षास सुध्दा न्याय्य संधी दिली गेली पाहिजे. कौटुंबिक हिंसा थांबावी म्हणून हा हितकारक कायदा तयार केला आहे हे वकिलाने न्यायालयाला सांगून त्यांची भूमिका बदलली पाहिजे. शपथपत्रावरून सकृद्दर्शनी जर असे आढळून आले की पीडिता ही सुरक्षित नाही तर सदर कायदयाचे कलम 23[6] लागू केले पाहिजे.

हे कलम लागू करताना विशेषतः जेव्हा एकतर्फी आदेश महत्वाचे असतात तेव्हा वकिलाने हिंसेचे भूतकाळातील तसेच वर्मानकाळातील प्रसंग आणि भविष्यकाळातील तशा घटना

---

[6] कलम 23(2) नमूद करते की: " जर न्यायदंडाधिकाऱ्यांचे समाधान झाले की अर्जाप्रमाणे सकृद्दर्शनी प्रतिवादी कौटुंबिक हिंसा करत आहे किंवा केली आहे किंवा तो करण्याची शक्यता आहे असे दिसून आले तर कलम 18, 19, 20, 21 अन्वये विहित केल्याप्रमाणे पीडितेने दिलेल्या शपथपत्रानुसार किंवा जशी केस असेल तसा कलम २२ अन्वये प्रतिवादीच्या विरोधात एकतर्फी आदेश दिला जावा.

पुन्हा घडण्याच्या शक्यता न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या पाहिजेत. हिंसेची मिळालेली नुसती धमकी सुध्दा पीडितेस अंतरिम आणि एकतर्फी आदेश मिळण्यास पुरेशी असते.

## ३.२ नोटीस बजावणे:

सदर कायदयाच्या कलम 13 अन्वये अर्ज दाखल केल्यापासून दोन दिवसांच्या आत नोटीस बजवावयास हवी. सदर नियमांच्या नियम 12 खाली विहित केलेल्या विविध मार्गांचा अवलंब करून नोटीस बजावणे हे संरक्षण अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. संरक्षण अधिकारी स्वतः किंवा दुसऱ्या कोणाच्या हातून ही नोटीस बजावू शकतात. नोटीस बजावतेवेळी जो कोणी तिथे असेल त्या व्यक्तीने जर ती नोटीस स्वीकारली तर ती बजावली गेली असे समजायला हरकत नाही. जर ती कोणत्याही कारणाने बजावली गेली नाही तर ती सहज नजरेस पडेल अशा एखाद्या ठिकाणी त्या परिसरात चिकटवावी. चिकटविलेल्या नोटीसचा फोटो काढून ठेवणे ही एक चांगली पध्दत आहे.

सदर कायद्यान्वये अधिनियमाच्या कलम 28 अन्वये न्यायाधीशास त्यांची स्वतःची कार्यपध्दती अंमलात आणता येते आणि त्यामुळे न्यायाधीशास नोटीस बजावण्याचे विविध मार्ग उपलब्ध होण्यास भरपूर वाव राहतो तसेच न्यायाधीशांना स्वतःची प्रक्रिया ठरविण्याचे व्यापक अधिकार पीडित स्त्रीला न्याय मिळवून देण्यासाठी दिलेले आहेत.

- प्रतिवादी जर भारताबाहेर राहत असेल तर कुरियरमार्फत नोटीस पाठवता येते आणि त्याने ती स्वीकारल्याची पावती नोटीस बजावल्याचा पुरावा म्हणून न्यायालयात सादर करता येते.
- नोटीस फॅक्सने पाठवता येते आणि फॅक्सची पावती न्यायालयात पुरावा म्हणून सादर करता येते. नोटीस खाजगीरीत्या बजावल्यास सदर कायद्यांतर्गत असलेल्या तरतूदीचा भंग होत नाही.
- जर पीडितेस प्रतिवादीचा ठावठिकाणा माहीत नसेल तर वकिलाने विनंतीत असा उल्लेख करावा की नोटीस विविध ठिकाणी बजावली जावी म्हणजे प्रतिवादीस न्यायालयातील सुनावणीविषयी कळविण्याचा उद्देश साध्य होईल.

संरक्षण अधिकारी जेव्हा नोटीस बजावण्यासाठी दिवसा प्रतिवादी पतीच्या राहत्या घरी जातील तेव्हा तो तिथे नसेल हे लिलीला ठाऊक होते. म्हणून तिच्या केसच्या

बाबतीत प्रतिवादीच्या ऑफिसचा पत्तासुध्दा दिलेला होता जेणेकरून आठवड्यातील कोणता दिवस व त्या दिवसातील कोणती वेळ आहे हे बघून ती नोटीस बजावली जावी. अशा तऱ्हेने नोटीसेत दोन्ही पत्ते घातले त्यामुळे संरक्षण अधिकारी वेळ आणि दिवस पाहून घरी किंवा ऑफिसच्या पत्त्यावर नोटीस बजावू शकले.

प्रत्येक केसमधील परिस्थितीनुसार अनेक नवे नवे मार्ग असू शकतात त्यामुळे नोटीस बजावता येते आणि विलंब टाळता येतो. जेव्हा नेहमीच्या मार्गांनी नोटीस बजावता येत नसेल तेव्हा वकिलाने अर्जात वेगळ्या मार्गांचा उल्लेख केला पाहिजे.

**पूर्वसूचना:** अभिनव मार्गाने नोटीस बजावण्याची विनंती करताना वकिलाने पुढील गोष्टी कराव्यात:

अ. जर प्रतिवादी नोटीस घेण्याचे आणि न्यायदंडाधिकाऱ्यास टाळत असेल तर सदर कायदयाच्या कलम 28 अन्वये न्यायालयाने आपले अधिकार वापरण्याविषयी वकिलाने पटवून दिले पाहिजे आणि हे स्पष्ट केले पाहिजे की नोटीस बजावण्यासाठी अभिनव मार्ग वापरणे हे खरोखरच अतिशय महत्त्वाचे का आहे.

ब. नोटीस बजावण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा उदाः इ मेल किंवा व्हॉटस् ॲपसारख्या इलेक्ट्रॉनिक पध्दतींचा वापर करण्याविषयी सुचवावे. मुंबई उच्च न्यायालयाचे खालील उदाहरण उद्धृत करावे–कानडी फिल्म पुष्पक विमानाच्या निर्मात्याला कॉपीराईट प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या गौतम पटेल या न्यायाधीशांनी त्या निर्मात्याच्या फोन नंबरची ट्रू कॉलरवर खात्री करून त्याला व्हॉटस् ॲपचा वापर करून नोटीस पाठवली आणि आता त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाकडून अशाप्रकारे नोटीस पाठ्विण्याला मान्यता आहे.

क. जर प्रतिवादी दुसऱ्या जिल्हयात किंवा राज्यात राहत असेल तर न्यायदंडाधिकाऱ्यांस विनंती करून त्या जिल्हयातील किंवा राज्यातील संरक्षण अधिकाऱ्यांची सेवा नोटीस बजावण्यासाठी उपलब्ध करून घ्यावी.

ड. प्रतिवादी नोटीस बजावण्याच्या कामात काही अडथळा आणेल किंवा अनावश्यक समस्या उभी करेल अशी भीती वाटल्यास संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर पोलिस अधिकाऱ्यास नोटीस बजावण्याच्या कामी पाठवावे असा निर्देश द्यावा अशी विनंती न्यायदंडाधिकाऱ्यांकडे करावी.

इ. विलंब टाळण्यासाठी अशा अन्य विनंत्या कराव्यात.

## ३.३ प्रतिवादीचे लेखी निवेदन आणि खटल्यास सामोरे जाणे:

पीडितेने केलेल्या अर्जास प्रतिवादीने लेखी निवेदन उत्तर म्हणून द्यावे असे अपेक्षित असते. प्रतिवादी लेखी निवेदन देण्यास किती वेळ लावतो / लावतात यावर वकिलाचे लक्ष हवे. अनेक केसेसच्या बाबतीत प्रतिवादी उत्तर द्यायला मुद्दामहून बराच वेळ लावतात. अशा वेळेस, वकिलाने ही बाब न्यायालयाच्या नजरेस आणून द्यावी आणि प्रतिवादीस त्याची बाजू मांडण्याची संधी न देता अंतरिम आदेश द्यावा म्हणून आग्रह धरावा. (न्यायालयाने दिलेला नाही) जेणे करून पीडितेच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होणार नाही.

तीन तारखांपेक्षा जास्त कालावधी  उलटून गेल्यानंतर वकील न्यायालयाकडे लेखी निवेदन नको असा अर्ज करू शकतो त्यामुळे प्रतिवादीचा वकील लेखी निवेदन दाखल करू शकत नाही. एक प्रकारे यामुळे प्रतिवादीच्या वकीलावर लेखी निवेदन लवकर द्यावे म्हणून दबाव येतो.

लेखी निवेदनाचा अभ्यास केल्यावर वकिलाने पीडितेस कुठल्या बाबीवर तिला उत्तर द्यायचे आहे का ते विचारावे. जर उत्तर द्यायचे असेल तर त्या उत्तराचा मसुदा तयार करावा आणि तो दाखल करावा. पीडितेने उत्तर दिल्यामुळे तिच्या दृष्टिकोनातून काही बाबी मांडण्याचा हक्क राहतो म्हणून उत्तर देणे आवश्यक आहे असे वकिलाने न्यायालयास सांगावे.

## ३.४ गरजेनुसार समुपदेशकाकडे जाण्याबाबत निर्देश मागणे/करणे:

सदर कायदयाच्या कलम 14 अन्वये, न्यायाधीश कारवाईच्या कुठल्याही टप्प्यात समुपदेशनासाठी प्रतिवादीस किंवा पीडितेस एकेकट्याने किंवा दोघांना एकत्र *समुपदेशकाकडे* पाठवू शकतात. अधिनियमाच्या कलम 10 अन्वये *समुपदेशकाची* सेवादायी संस्थेचे सदस्य म्हणून नोंदणी झालेली असते. कारवाईच्या कुठल्याही टप्प्यात सदर कायदयाच्या कलम 14 अन्वये समुपदेशनाचा उद्देश हिंसा थांबवणे हा असतो त्यासाठी त्याविषयी प्रतिवादीकडून हमी घेतली जाते.

सदर कायदयाखाली समुपदेशकाच्या उपलब्धतेविषयी वकील चर्चा  करू शकतो आणि त्याचा उद्देश काय आहे ते पीडितेस सांगू शकतो आणि आहे त्या परिस्थितीत त्याचा काय परिणाम होईल याविषयी तिच्याबरोबर बारकाईने विचार करू शकतो. जर त्या पीडितेस समुपदेशन

घेण्याची इच्छा असेल तर तसे कलम विनंती अर्जात घालता येते किंवा कारवाईच्या कोणत्याही टप्प्यात तशी न्यायदंडाधिकाऱ्यांकडे विनंती करता येते.

काही वेळा न्यायाधीश स्वतःच्या मतानेच प्रतिवादीस आणि किंवा पीडितेस समुपदेशकाकडे पाठवू शकतो. अशा बाबतीत वकिलाने सांगावे की समुपदेशनामुळे कोणत्या गोष्टी अपरिहार्य होतात आणि विचारावे की तिला समुपदेशकाकडे जायचे आहे का. **जर न्यायालयाने तिला समुपदेशकाकडे जाण्याचा निर्देश दिला तर दोन्हीपैकी कोणताही पक्ष आपापली कारणे देऊन समुपदेशनासाठी जाण्यास नकार देऊ शकतात. सर्वसाधारणपणे, समुपदेशनासारख्या सेवा अनिवार्य नसतात परंतु न्यायालयाचे आदेश नाकारू नये अशी पध्दत आहे.**

**पूर्व सूचना:** अशिलास समुपदेशनास जाण्यासाठी सांगण्याआधी अंतरिम संरक्षणाचा आदेश (हिंसा थांबवा आदेश) मंजूर करून घेणे अधिक चांगले. त्यामुळे पीडितेस बोलणी करण्यास अधिक चांगला वाव मिळू शकेल आणि त्याचप्रमाणे तिला असलेला धोकाही कमी होईल. अशा प्रकारच्या समुपदेशनाने न्याय व्यवस्थेबद्दल विश्वास निर्माण होण्यास साहाय्य होईल आणि व्यक्तीत सुरक्षितता आणि संरक्षणाची भावना निर्माण होईल. यामुळे पुढील हिंसेस आळा बसेल.

बरेचदा न्यायाधीश मध्यस्थी करण्यासाठी उभय पक्षांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नियमाप्रमाणे वकील मध्यस्थ किंवा न्यायाधीश मध्यस्थ सुचवताना दिसतात. जेव्हा न्यायदंडाधिकाऱ्यांना वाटते की मैत्रीपूर्ण तडजोड होऊ शकेल तेव्हाच असे घडते.(सलोखा करायचा किंवा नाही). बरेचदा मध्यस्थी करणारे जे ज्येष्ठ वकील किंवा न्यायाधीश असतात त्यांना मध्यस्थी करण्याचे प्रशिक्षण दिले गेलेले असते.

अशा केसेसध्ये वकिलास पीडितेला सांगावे लागते की मध्यस्थीमुळे काय घडणार आहे आणि त्यानुसार मध्यस्थी करणे स्वीकारायचे किंवा नाही हे ठरवावे लागेल. जर तिने मध्यस्थी मान्य केली तर तिला ज्या काही अटी आणि शर्ती घालायच्या आहेत त्या तिने घालाव्यात आणि तिला सांगावे की कोणत्याही परिस्थितीत तिने स्वतःच्या आयुष्याला किंवा हिताला धोका होईल अशी तडजोड करण्याचे दडपण स्वतःवर येऊ देऊ नये.

**'समुपदेशन' आणि 'मध्यस्थी' यातील फरक** लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

### ३.४.१ समुपदेशन (काउन्सेलिंग) म्हणजे काय?

समुपदेशन किंवा **काउन्सेलिंग** ही व्यक्तीच्या मानसिक बाजूशी संबंधित असणारी एक प्रक्रिया आहे. यामुळे व्यक्तीस बदल घडविण्यासाठी चालना मिळून तिचा दृष्टिकोन आणि वर्तन सकारात्मक रीतीने बदलते. सदर नियमांखालील नियम 14 अन्वये समुपदेशन कसे करावे याचे तपशीलवार मार्गदर्शन मिळते. नातेसंबंधातील हिंसा संपुष्टात आणणे हा त्याचा उद्देश असतो.

हे विचारात घेता आपण असे म्हणू शकतो की सदर कायदयानुसार समुपदेशनाचा प्रमुख रोख असा असेल: प्रतिवादीच्या स्वतः आणि नातेसंबंधांविषयीच्या दृष्टिकोनात (प्रामुख्याने पितृसत्ताक) बदल घडवून आणणे, त्याच्या वर्तन आणि कृतीत परिवर्तन होणे, राग आणि निराशा तसेच पीडितेकडून असलेल्या अपेक्षांना हाताळण्याचे त्याचे कौशल्य विकसित होणे जेणेकरून तो किंवा ती हिंसा करण्यास उद्युक्त होणार नाही. त्याच वेळी स्वतः आणि नातेसंबंधांविषयीच्या दृष्टिकोनात आणि स्वतःची काळजी घेऊन स्वतः ठाम राहून आणि संवादाची कौशल्ये विकसित करून वर्तन आणि कृतीत परिवर्तन घडवून आणणे ह्यावर प्रामुख्याने पीडितेच्या समुपदेशनाचा रोख राहील.

प्रत्येक केसच्या एकमेवतेमुळे समुपदेशनाचा उद्देश बदलेल.परंतु, प्रतिवादीने हिंसा न करण्याची हमी देणे, लेखी स्वरूपात अटी स्वीकारणे यातून हिंसा थांबविणे हे समुपदेशनाचे अपेक्षित फलित आहे. समुपदेशकाने हे फलित न्यायालयास कळविले पाहिजे.

### ३.४.२ मध्यस्थी (मिडिएशन) म्हणजे काय?

याउलट, मध्यस्थीचा उद्देश दोन्ही पक्षांबरोबर व्यवहार्य तोडग्यातून समझौत्याच्या अटी ठरवून त्यानुसार समझौता करणे हा असतो. विनंतीतील कलमांविषयी बोलणी करून पीडितेस हव्या असलेल्या हिंसा बंदीच्या तोडग्याचा विचार केला गेला नाही तर मध्यस्थीस काही अर्थ राहणार नाही. जर मध्यस्थीतून केसची समस्या सुटत असेल तर दोन्ही पक्षांना न्यायालय मध्यस्थीचा पर्याय देते आणि त्या पक्षांना मध्यस्थाकडे पाठवते.

सर्व अटींना मान्यता (बोलणी यशस्वी ) किंवा काही अटींनाच मान्यता किंवा कुठल्याच अटी मान्य नाहीत (बोलणी अयशस्वी) असे मध्यस्थीचे फलित होऊ शकते. त्याप्रमाणे मध्यस्थ अहवाल देतो. जर मध्यस्थी यशस्वी झाली तर सुनावणी न्यायालय त्यानुसार आदेश देते. जर मध्यस्थी अयशस्वी झाली तर त्याविषयी न्यायालयाला अहवाल दिला जातो परंतु चर्चेचा तपशील दिला जात नाही.

**पूर्वसूचना**: जर दोन्ही पक्षांनी अंशतः अटी मान्य केल्या तर वकील पीडितेच्या पक्षास पीडितेमार्फत मध्यस्थास विनंती करायला सांगतो आणि दोन्ही पक्षांना मान्य होतील अशा अटींना अंतिम रूप द्यायला सांगतो तसेच न्यायालयास अन्य तोडगे सुनावणी प्रक्रियेतून ठरवावेत अशी विनंती करतो. यामुळे केस पूर्ण करण्यास लागणारा वेळ कमी होईल किंवा वाचेल.

हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की सदर नियमांखालील नियम 14 अन्वये समुपदेशकांना मार्गदर्शन दिले जाते त्यासाठी स्त्रीवादी हक्कांवर आधारलेला दृष्टिकोन आवश्यक असतो परंतु अशा प्रकारचे मार्गदर्शन मध्यस्थांना दिले जात नाही. अशा वेळेस, त्यांचा दृष्टिकोन स्त्रीवादी हक्कांवर आधारलेला असण्याची खात्री नसल्यामुळे मध्यस्थांच्या संवेदनशीलतेवर विसंबून राहावे लागेल.

## ३.६ पुरावा नोंदवणे :

पुरावे हे कागदोपत्री किंवा शपथ पत्राच्या स्वरूपात सादर केले जातात.कौटुंबिक हिंसेच्या घटना चार भिंतींच्या आड घडत असल्यामुळे पीडितेस पाठिंबा देणारा पुरावा असणे हे कधी कधी खूप अवघड होऊन बसते. पीडितेने सहन केलेली हिंसा न्यायदंडाधिकाऱ्यांपुढे मांडण्यास पुराव्याच्या शपथपत्राचे साहाय्य होते. म्हणून न्यायालय तोंडी आणि कागदोपत्री पुरावा मानते.

पीडितेने न्यायालयात पुरावा द्यावा म्हणून वकिलास विशेष काळजी घेऊन वेगवेगळ्या धोरणांचा अवलंब करून तिला तयार करावे लागते. तिला न्यायालयाशी तसेच विरोधी वकिलाशी सामना करण्याची भीती वाटू शकते.

**पीडितेस सुनावणीसाठी तयार करण्यासाठी पूर्वसूचना:**

- तिला अर्ज आणि शपथपत्र वाचायला सांगून काही प्रश्न विचारायचे असल्यास त्यावर चर्चा करा.
- तात्पुरत्या प्रश्नांची यादी तयार करा आणि तिच्याबरोबर एक लुटुपुटीच्या उलट तपासणीचे सत्र घ्या. यामुळे न अडखळता उलटतपासणीस तोंड देण्याचा तिचा आत्मविश्वास वाढेल.
- पुराव्याचे-शपथपत्र (evidence affidavit) सादर करून जरी मुख्य तपासणी केली गेली तरी देखील पीडितेला न्यायालयात हजर करून मुख्य तपासणी करण्याचा पर्याय वकील देऊ शकतात. साक्षीदाराच्या पिंजऱ्यात न्यायालयासमोर उभे राहणे, आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे या अनुभवामुळे पीडितेची उलट तपासणीसाठी अधिक चांगल्या प्रकारे तयारी होते.
- जर ती पीडिता साहाय्यासाठी अशासकीय संस्थेत गेली असेल तर तिच्या बरोबर न्यायालयात त्या संस्थेतील कोणीही सदस्य तिला आधार म्हणून उभा राहू द्यावा यासाठी वकील न्यायालयास विनंती करून परवानगी घेऊ शकतो.

वंदनाने हिंदी भाषेत एम.ए. केले होते. ती सुशिक्षित असली तरी तिला इंग्रजी फार येत नव्हते. जेव्हा तिला विचारण्यात आले की तिला अर्जाचा मसुदा कोणत्या भाषेत लिहायचा आहे तेव्हा तिने इंग्रजीला पसंती दिली. वकिलाने तो अर्ज इंग्रजीत लिहिला, तिला वाचून दाखवला, समजावून सांगितला, सर्व माहिती बरोबर आहे याची खात्री करून घेतली, आणि शेवटी तो अर्ज फाईल केला. जेव्हा तिची केस उलट तपासणीपर्यंत आली तेव्हा प्रतिवादीच्या वकिलाने मुद्दामहून तिला तिच्या अर्जातील इंग्रजी शब्दांचा अर्थ विचारण्यास सुरुवात केली कारण त्याला असे सिध्द करायचे होते की तिला जी भाषा फारशी समजत नाही त्या भाषेत तिचा अर्ज लिहिलेला असल्यामुळे त्यातील वस्तुस्थिती तिला नीट माहीत नाही. वंदनाने न्यायालयात सांगितले की तिच्या वकिलाने तिला अर्जात लिहिलेला प्रत्येक परिच्छेद वाचून दाखवला आहे, आणि त्यात काय लिहिले आहे ते तिला माहीत आहे. पुढच्या उलट तपासणीच्या तारखेसाठी वंदनाने तयारी करण्यास सुरुवात केली, अर्जातील प्रत्येक कठीण शब्दाचा अर्थ तिने शब्दकोषातून शोधून काढला आणि स्वतः त्याचा अर्थ जाणून घेतला. या अभ्यासात तिच्या वकिलाने तिला मदत केली. पुढील

तारखेच्या वेळी वंदनाने निर्भयतेने उलटतपासणीस तोंड दिले. वंदनाच्या या केसमध्ये वकिलाने तिला प्रेरणा दिली आणि त्यामुळे ती सक्षम होऊन न्यायालयाचा धीटपणे सामना करू शकली. तिचे तिच्या केसवर पूर्णपणे नियंत्रण होते आणि ती त्यात तिच्या वकिलासह सक्रीयपणे गुंतलेली होती.

## ३.७ युक्तिवाद:

पुराव्याच्या टप्प्यानंतर युक्तिवादाचा टप्पा असतो. यात दोन्ही पक्षांचे वकील त्यांचे युक्तिवाद मांडतात. ते युक्तिवाद अर्जातील म्हणणे, लेखी निवेदन, पीडितेने दिलेले निवेदन,पुराव्याच्या टप्प्यात प्रतिवादीने आणि त्यांच्या साक्षीदाराने दिलेले निवेदन यावर आधारलेले असतात. शेवटचा युक्तिवाद हा संपूर्ण केसचा सारांश असतो. युक्तिवादसुध्दा लेखी स्वरूपात सादर करता येतात. युक्तिवादात दिलेले मुद्दे न्यायाधीश शेवटचा आदेश देताना विचारात घेतात. म्हणून पीडितेस अनुकूल असलेले आदेश मिळविण्यासाठी महत्त्वाच्या मुद्द्यांवर वकिलाने भर दिलाच पाहिजे.

## ३.८ अंतिम आदेश :

अंतरिम आदेश ही तत्काळ हिंसा थांबविण्यासाठी केलेली कामचलाऊ व्यवस्था आहे. जेव्हा सकृद्दर्शनी कौटुंबिक हिंसेची केस असते तेव्हा सदर कायदा न्यायालयास एकतर्फी अंतरिम आदेश देण्यासाठी परवानगी देतो. जेव्हा अंतरिम आदेश दिला जातो तेव्हा पुराव्याचा अधिक खोलात जाऊन विचार केला जात नाही आणि म्हणून अंतिम आदेश हा अंतरिम आदेशासारखाच नसतो. अधिक तपशिलासाठी कारवाईपूर्व भागातील आदेशाचा विभाग पाहावा.

# ४.० कारवाईपश्चात टप्पा

**कारवाईपश्चात टप्पा**

१. अंतिम आदेशाची अंमलबजावणी

२. संरक्षण आदेशाचा भंग

३. अपील

## ४.१ अंतिम आदेशाची अंमलबजावणी

आदेशाची अंमलबजावणी करण्यात पीडितेस साहाय्य करणे हे संरक्षण अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे[7].

पीडितेचे हिंसेपासून संरक्षण करण्यासाठी पोलिसांनासुध्दा अशाच प्रकारचे कर्तव्य पार पाडावे लागते. काही वेळा कलम 19(5)) आणि 19(7)) अन्वये दिल्या गेलेल्या निवासाच्या आदेशाबाबत, प्रथमश्रेणी न्यायाधीश पोलिसांना संरक्षण देण्याबाबत आणि निवासाच्या आदेशाची आणि सुरक्षेच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश देऊ शकतात.

म्हणून पीडितेची आदेशाच्या अंमलबजावणीबाबत जी अपेक्षा असते तिचा उल्लेख वकिलाने विनंतीअर्जाच्या कलमात करावा. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर सदर कायद्याच्या कलम 12 अन्वये जो अर्ज केला असेल त्यातील विनंतीत अंमलबजावणी योजना समाविष्ट करावी. त्यामुळे न्यायालयाला त्याप्रमाणे आदेशांची प्रभावी अंमलबजावणी होण्यास साहाय्य करणारे आदेश देता येतात.

आदेशांची भारतातल्या[8] कुठल्याही भागात अंमलबजावणी करता येते आणि त्यासाठी स्थानिक संरक्षण अधिकाऱ्यांनी / पोलिसांनी तिला साहाय्य करावे अशी अपेक्षा असते. उदाः प्रियाचे उदाहरण पाहूया-

---

[7] कलम 9(1)(i) आणि नियम 10(d)(e) सदर कायदा

[8] कलम 1(2) सदर कायदा

प्रियाने कौटुंबिक हिंसाचाराची केस जळगाव येथे दाखल केली. तिचा नवरा जिथे आधीपासून राहत होता अशा एकत्रित घरात राहण्याचा निवासाचा आदेश तिला देण्यात आला. ती जळगाव न्यायालयाने दिलेला आदेश घेऊन पुण्यात आली. तिच्या नवऱ्याने तिला घरात येऊ दिले नाही आणि त्याला जेव्हा कळले की तिच्याकडे एकत्रित घरात राहण्याचा आदेश आहे तेव्हा तो पुण्याबाहेर निघून गेला. म्हणून तिने पोलिसात तक्रार केली. तिने आदेशाची अंमलबजावणी व्हावी यासाठी पुण्याच्या संरक्षण अधिकाऱ्यांची मदतसुध्दा घेतली. म्हणून संरक्षण अधिकाऱ्यांनी आदेशाची अंमलबजावणी न झाल्याचा अहवाल पाठवला. मध्यंतरीच्या काळात त्या पीडितेस जळगावला असलेली घराची दुसरी किल्ली सापडली. म्हणून ती पुण्यात परतली आणि तिने घराचा ताबा घेतला.

जेव्हा वकिलांना असा अंदाज येतो की प्रतिवादी आदेशाची अंमलबजावणी सहजपणे होऊ देण्यास सहकार्य करणार नाही तेव्हा ते न्यायालयाकडून अतिरिक्त आदेश यावा म्हणून विनंती करू शकतात. हे आदेश लागू केले जातील किंवा जाणारही नाहीत परंतु ते जास्तीची खबरदारी म्हणून मागवले जातात. उदाः निवासाच्या आदेशाची अंशतः अंमलबजावणी म्हणून जर प्रतिवादीने पर्यायी घराच्या किल्ल्या दिल्या नाहीत तर त्यात दुसऱ्या आदेशाचा उल्लेख असू शकतो जेणे करून घराचे कुलुप तोडण्याकरता पोलिसांची मदत घेता येते.

सदर कायदा हा दिवाणी कायदा आहे. म्हणून अधिनियमाच्या कलम 28 अन्वये प्रथमश्रेणी न्यायाधीशास दिवाणी प्रक्रिया संहिता किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता किंवा त्याची स्वतःची अशी प्रक्रिया वापरण्यास परवानगी असते. आदेशाच्या अंमलबजावणीसाठीसुध्दा हेच तत्त्व लागू असते. आदेश म्हणजे पीडितेने प्रतिवादीस हिंसा थांबावी यासाठी देण्यास मिळालेले निर्देश असतात आणि म्हणून ते दिवाणी स्वरूपाचे असतात.जर प्रतिवादीने संरक्षण आदेशाचा भंग केला तर त्यासाठी त्याला तुरुंगवास किंवा दंडाची शिक्षा होऊ शकते. प्रतिवादीने हिंसा थांबवावी यासाठी त्याला कोणतीही फौजदारी कारवाई करण्याअगोदर संधी दिली जाते.

## ४.२ संरक्षण आदेशाचा भंग :

**पीडितेस हे सांगणे महत्त्वाचे आहे की एकदा संरक्षण आदेश दिला की तो तिने मागे घेण्यासाठी अर्ज करेपर्यंत लागू असतो.** म्हणून आदेश दिल्यानंतर एक वर्ष असो की दहा वर्ष असोत किंवा त्याहूनही जास्त असोत, जर पीडितेने तो मागे घेण्यासाठी कौटुंबिक हिंसेविरोधी कायद्याच्या कलम 25 अन्वये अर्ज केला नसल्यास तो पाळला नाही किंवा तो मोडला तर अधिनियमाच्या कलम 31 अन्वये त्याचा भंग झाला असे मानले जाते.

**सदर कायदा हा फौजदारी परिणाम करणारा दिवाणी कायदा आहे.** जर प्रतिवादीने संरक्षण आदेशाचे पालन केले नाही तर शिक्षा होण्याचा धोका असतो. कलम ३१ अन्वये संरक्षण आदेशाचा भंग केल्यास तो दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा आहे. संरक्षण अधिकारी आदेशभंगाचा अहवाल देऊ शकतो. तसेच आदेशभंग झाल्यास पीडिता पोलिसांकडे तसेच प्रथमश्रेणी न्यायाधीशांकडे जाऊ शकते. प्रतिवादीस हिंसा थांबवण्याची एक संधी दिली जाते आणि तरीसुध्दा हिंसा होत राहिली तर त्याला शिक्षा होते.

हा कायदा अन्य कुठल्याही कायद्यास डावलत (not in derogation) नाही आणि म्हणून पीडिता अन्य दिवाणी आणि फौजदारी कायद्यांखालीसुध्दा केस करू शकते. हा कायदा प्रतिवादीस तुरुंगात पाठवण्याखेरीज पीडितेस अन्य तोडगे पुरवू शकतो. बऱ्याच केसेसमध्ये पीडितेस प्रतिवादीला गुन्हेगार ठरवायचे नसते. परंतु जेव्हा प्रतिवादी न्यायालयाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करतो तेव्हा पीडितेस अधिनियमाच्या कलम ३१ अन्वये त्याला तुरूंगवासाची शिक्षा व्हावी हा पर्याय निवडता येतो.

कलम 31 अन्वये अंतरिम तसेच अंतिम आदेशाचा भंग केल्यास या अधिनियमाखाली तो गुन्हा ठरतो. त्यासाठी साधी किंवा सश्रम कारावासाची एक वर्षापर्यंत शिक्षा किंवा २०, ००० रु.पर्यंत दंड किंवा दोन्ही होऊ शकतो. तुरुंगवास झाला की प्रतिवादी त्याच्या जबाबदारीतून दोषमुक्त होत नाही. प्रतिवादीस जरी आदेशभंगासाठी तुरुंगात पाठवलेले असले तरी न्यायालयाने दिलेले आदेश त्याला मानावेच लागतात.

कलम 31(3) असे नमूद करते की कौटुंबिक हिंसेविरोधी कायद्याच्या कलम 31(3) अन्वये आरोप करताना प्रथमश्रेणी न्यायाधीशसुध्दा भारतीय दंडसंहितेच्या कलम 498(A) अन्वये आरोप करू शकतात. म्हणून प्रतिवादीने संरक्षण आदेशाचा भंग केल्यास फौजदारी कायदा सुध्दा लागू होऊ शकतो.

सदर कायद्याच्या कलम 32 मध्ये असा उल्लेख आहे की पीडितेच्या एकटीच्या शपथपूर्वक साक्षीवरून न्यायालय प्रतिवादीस दोषी ठरवू शकते.

संरक्षण आदेशाचा भंग झाल्याचे पीडिता संरक्षण अधिकाऱ्यांना कळवू शकते. असा अहवाल तयार करण्यासाठी वकिलाने पीडितेस साहाय्य करावे. जेव्हा आदेशाची अंमलबजावणी होत नाही तेव्हा ती काय कारवाई करू शकते याविषयी तिला वकिलाने माहिती द्यावी. पीडिता पोलिसांकडे किंवा न्यायाधीशांकडे थेट तक्रार करू शकते.

**संरक्षण आदेशाचा भंग झाल्यास पीडितेने उचलायची पावले:**

संरक्षण आदेशाचा भंग करण्यास कारणीभूत होणारी सर्व वस्तुस्थिती पीडितेने नमूद करावी.

जर ती थेट न्यायाधीशांकडे गेली तर एफआयआर न करताच आरोप करता येतात.

संरक्षण आदेशाचा भंग केल्यास अर्ज दाखल करण्यास मर्यादा नाहीत परंतु फौजदारी प्रक्रिया अनुसरली गेल्यास, फौजदारी प्रक्रिया संहितेखाली कलम ४६८(२)(बी) ची तरतूद लागू होईल. या कलमान्वये कालमर्यादा गुन्हयाच्या तारखेपासून एक वर्ष आहे. अशा केसच्या बाबतीत वकील पीडितेस अर्ज दाखल करण्यास उशीर झाला असेल तरी तो विलंब माफ करून अर्जाचा विचार करावा असा विनंती करणारा (application for delay condonation) अर्ज करावा असा सल्ला देऊ शकतो.

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४७२ अन्वये हिंसा सातत्याने होत आहे असे वकील दाखवू शकतो आणि प्रत्येकवेळी हिंसा झाल्यास कालमर्यादा नव्याने विचारात घेतली जाऊ शकते.

भारतीय दंडसंहितेच्या कलम ४९८ए सारख्या संबंधित कलमांखाली न्यायाधीशांनी दखल घ्यावी म्हणून वकील त्यांना विनंती करू शकतो.

ज्यावेळेस विशेषतः प्रतिवादीस बेलवर मुक्तता मिळणार असते तेव्हा वकील त्याच्यावर संबंधित मर्यादा घालण्याचा आदेश मागू शकतो. अशा वेळेस पीडितेस जो संभाव्य धोका जाणवतो त्याविषयी वकिलास सांगितले पाहिजे.

## ४.३ अपील

दोन्हीपैकी कोणताही पक्ष जर न्यायदंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाबाबत समाधानी नसेल तर त्या पक्षाला अपील करता येते. अपील अंतरिम अथवा अंतिम आदेशानंतर करता येते. असे अपील न्यायदंडाधिकाऱ्यांनी निर्णय दिलेल्या तारखेपासून ३० च्या दिवसांच्या आत सत्र न्यायालयाकडे करता येते. प्रथमश्रेणी न्यायाधीशांच्या न्यायालयाने सत्र न्यायालयात अपील करावे. आदेशापासून ३० दिवसांच्या आत अपील केले जावे.

कोणताही पक्ष अंतरिम आदेशातून अपील करू शकतो. हा हक्क मर्यादित असतो आणि जेव्हा न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयाने त्यांचा अधिकार निर्णयात्मक रीतीने वापरला आहे हे अपील न्यायालयाला कळते तेव्हाच ते त्यांचे तारतम्य वापरतात. अंतरिम आदेश हे तात्पुरत्या स्वरूपाचे असतात आणि ते कामचलाऊ व्यवस्था म्हणून वापरले जातात. अंतरिम आदेशाच्या विरुध्द अपील केल्यास दोन्ही पक्षांच्या कारवाईचा वेळ वाढतो म्हणून ते टाळावे.

अपील कोणत्या आधारावर केले जात आहे ते थोडक्यात स्पष्ट केले जावे. यात न्यायालयाने मूल्यमापन न केलेल्या पुराव्यांचे तपशील असले पाहिजेत. अपिलात नवी वस्तुस्थिती सादर करता येत नाही. अनेकदा अशिलांना असे वाटत असते की जी वस्तुस्थिती मूळ अर्जात दिलेली नाही ती अपिलात लिहिता येईल. अशिलांना हे स्पष्ट करून सांगावे की अपिलात फक्त केसचा निकाल देताना ज्या कायद्याच्या मुद्द्यांचा विचार करायला हवा होता परंतु केला गेला नाही अशाच मुद्द्यांचा उल्लेख केला जावा. अपील करणाऱ्याचे म्हणणे ऐकून घेतल्यावर न्यायालय अपील फेटाळून लावेल किंवा आदेशात बदल करेल.

## ५.० पीडिता वापरू शकेल असे अन्य कायदे

सदर कायदा हा अन्य कुठल्याही कायद्यास कमी लेखत नाही. कौटुंबिक हिंसेची केस सर्व बाजूंनी विचारात घेतली पाहिजे. पीडितेस मार्गदर्शन करता यावे यासाठी वकिलाने अनेक आंतरसंबंधित असलेले कायदे विचारात घेतले पाहिजेत. कधीकधी अन्य कायद्यांचा वापर केल्यास पीडितेस तिच्यावर होणारी हिंसा थांबविण्यासाठी अनेक तोडगे उपलब्ध होतात. काही तोडगे हे दिवाणी स्वरूपाचे असतात तर काही फौजदारी स्वरूपाचे असतात. काही कायदे पीडितेच्या केससह अन्य लोकांना संरक्षण देण्यासाठी वापरता येतात. उदाः प्रतिवादी आपल्या मुलाचा लैंगिक छळ करत आहे अशी आई तक्रार करते. त्यानंतर पॉक्सो अधिनियम २०१२ चा वापर करता येतो कारण यात असा अहवाल देणे बंधनकारक आहे.

**लक्षात ठेवण्याचे मुद्दे**

- सदर कायद्या व्यतिरिक्त अन्य कायद्यांचा वापर करू शकते.
- शक्य तितका वकिलाने सर्वोत्कृष्ट तरतुदींचा वापर करावा आणि अनेक वाद टाळावेत.
- अन्य सेवादायी संस्थाबरोबर वकिलांनी संपर्क जाळे तयार करावे त्यामुळे पीडिता त्यांच्याकडे गेल्यास तिला त्या संपर्कांचा उपयोग होईल.
- वकिलाने अशिलास केसमधील सर्व प्रक्रिया आणि टप्पे समजावून सांगावेत म्हणजे त्यास तयारी करण्यास साहाय्य होईल.
- केससंबंधीची माहिती साध्या आणि सुबोध भाषेत सांगावी म्हणजे ती अशिलास कळण्यास सोपी जाईल.
- जर प्रतिवादी किंवा त्याचा वकील पीडितेच्या वकिलाकडे समझौता करण्यासाठी आले तर त्यांच्यातील सर्व व्यवहार पारदर्शक असावा म्हणजे पीडितेस आपण असुरक्षित परिस्थितीत आहोत असे वाटणार नाही.
- कौटुंबिक हिंसाचाराच्या केसचा इतर अन्य कायद्यांशीसुध्दा संबंध येतो. उदाः
  - घटस्फोटाशी संबंधित कायदा
  - बाल लैंगिक गुन्हा जिथे अनिवार्यपणे तक्रार करण्याची तरतूद आहे.
  - फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२५ अन्वये पोटगी
  - अन्य व्यक्तिविषयक कायद्यांखाली पोटगी
  - भारतीय दंड संहितेखाली तक्रार

## विभाग ब - प्रतिवादीचे प्रतिनिधित्व करणारे वकील

प्रतिवादीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांनी या विशिष्ट कायद्याचे उद्दिष्ट लक्षात ठेवले पाहिजे. हिंसा थांबवणे आणि हिंसामुक्त वातावरणात संवाद साधण्यास वाव देऊन समस्या सोडवणे हे सदर कायद्याचे वैशिष्ट्य आहे. म्हणून विशेषतः जिथे सकृद्दर्शनी पीडितेने हिंसेचा सामना केला आहे असे दर्शवणारा पुरावा असला तरी प्रतिवादीच्या वकिलाने ते नाकारण्याऐवजी हिंसा थांबविण्यासाठी काही मार्ग आणि तंत्र शोधून काढण्याचा विचार केला पाहिजे.

प्रत्येक पक्षास आपली बाजू मांडण्याचा हक्क असला तरी त्या पक्षाची बाजू मांडण्यापुरतीच वकिलाची भूमिका सीमित नसावी. त्यांची आपल्या अशिलास जी योग्य आहे तीच कृती करण्यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या मार्गदर्शकाची व्यापक भूमिका असावी आणि ते त्यांचे कर्तव्य असावे.

जिने हिंसा सहन केली आहे तिच्या दृष्टिकोनातून हिंसा समजून घेतली पाहिजे आणि त्याकडे पाहिले पाहिजे. पीडित महिलेसमोर तिच्या जगाविषयीच्या कल्पनांचे प्रारूप असेल किंवा प्रतिवादीच्या समोर त्याचे किंवा तिचे असे प्रारूप असेल परंतु हितकारक कायद्यात पीडितेचा दृष्टिकोन समजून घेतला पाहिजे आणि म्हणूनच कुठल्याही वस्तुस्थितीस हिंसा नाही म्हणून तिला क्षुल्लक समजू नये.

हिंसा थांबवणे आणि संवाद साधून हिंसेस आळा बसवणे शक्य होईल अशी वातावरण निर्मिती करणे आणि तसा वाव निर्माण करणे ही सदर कायद्याची व्यापक भूमिका आहे. नकारात्मक भूमिका घेतल्यास कौटुंबिक नातेसंबंधातील दरी नष्ट होण्यास कुठल्याच पक्षास मदत होणार नाही.

प्रतिवादीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांची उद्दिष्टे सदर कायद्याच्या मोठ्या उद्दिष्टांशी खालील काही प्रकारे मिळती जुळती असतात

त्यापैकी एक म्हणजे समुपदेशन सेवांचा लाभ घेण्यास पसंती देणे. कौटुंबिक वातावरण निरोगी राहावे हा सदर कायद्याचा हेतू आहे. बरेच वेळा प्रतिवादींना असे वाटत असते की त्यांना समुपदेशन सेवेची गरज नाही, परंतु प्रत्यक्षात मात्र समुपदेशनामुळे सर्व बाबींकडे योग्य दृष्टिकोनातून पाहण्यास साहाय्य होते. वकिलाने प्रतिवादीस समुपदेशन घेण्यासंबंधी दिलेल्या सल्ल्यामुळे दोन्ही पक्षांना साहाय्य होते.

न्यायालयात खटला करण्याचे टाळण्याची वृत्ती असल्याने प्रतिवादीने पहिल्याच वेळी न्यायालयाच्या नोटीसा टाळल्याची अनेक उदाहरणे आहेत. ते नोटीस स्वीकारण्यापूर्वी वकिलाचा सल्ला घेण्याचा प्रयत्न करतात. त्यावेळी वकिलाने त्यांना वेळीच नोटीस स्वीकारण्यास सांगितले तर त्यांना केसची तयारी करण्यासाठी अधिक चांगला आणि बराच वेळ मिळू शकतो. आजकालच्या जमान्यात न्यायालयसुध्दा नोटीस पाठवण्यासाठी मोबाईल तंत्रज्ञानाचा वापर करते. त्यामुळे नोटीस स्वीकारण्याचे टाळण्यात काही अर्थ नसतो. नोटीस हे केवळ केस दाखल केली आहे हे कळवण्याचे एक साधन असते ज्यात प्रतिवादीसही त्याची बाजू मांडण्याची एक योग्य ती संधी मिळते.

लेखी स्वरूपात प्रतिवादीने उत्तर दाखल करणे या प्रक्रियेतसुध्दा न्यायालयीन वेळ खूप जातो. उत्तर देण्यात आवश्यक तेवढाच वेळ घेतला जावा. अन्यथा प्रतिवादीस देखील वेळेवर केस संपवता येणार नाही. कायदेशीर पूर्तता लवकर करण्यास वकिलाने प्रतिवादीस साहाय्य केले तर केसचा निकाल लवकर लागेल. हे तत्त्व वकिलाने प्रतिवादीस समजावून सांगावे.

प्रतिवादीने त्वरित उत्तर/प्रतिसाद न दिल्यास ती परिस्थिती त्याच्या विरूध्द आहे असे समजले जाईल. फौजदारी कायद्याप्रमाणे सदर कायद्यात मौन पाळायचा हक्क दिला जात नाही. पीडितेने ठामपणे केलेली विधाने सत्य नाहीत याचा पुरावा देण्याची जबाबदारी प्रतिवादीवर असते.

प्रतिवादीचे प्रतिनिधित्व करणारे वकील अर्जदाराने (पीडित महिलेने) संरक्षण आदेश मागितल्यास विरोध करतात. त्यांनी या आदेशास विरोध करण्याची आवश्यकता नाही कारण त्या आदेशानुसार प्रतिवादीस त्याच्या मौल्यवान संपत्ती किंवा पैशातून काहीही द्यायचे नसते. या आदेशानुसार प्रतिवादीने परिस्थिती अधिक चिघळणार नाही अशा काही कृती करायच्या असतात किंवा करायच्या नसतात. जेव्हा पीडितेस हिंसेची शक्यता दिसत असते तेव्हा संरक्षण आदेश देऊ नये असे वकील म्हणू शकत नाही. उलटपक्षी, प्रतिवादीचा वकील परिस्थिती चिघळली आहे असे वाटेल असे त्याने किंवा तिने काही करू नये म्हणून त्याला किंवा तिला खबरदारी घेण्याचा सल्ला देऊ शकेल. त्याऐवजी प्रतिवादीचा वकील कौटुंबिक हिंसा होणार नाही असे न्यायालयाला पटवून देण्यासाठी प्रतिवादी पक्षाने काय उपाय योजावेत याविषयी मार्गदर्शन करू शकेल.

पीडितेस अनुकूल असा निवासाचा आदेश दिला गेल्यास पुढील कारवाई टाळण्यासाठी प्रतिवादीच्या वकिलाने त्याला किंवा तिला आदेश न मानण्याऐवजी आदेशाचे पालन करण्याचा

सल्ला दिला पाहिजे. हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की  या आदेशामुळे पीडितेचा मालमत्तेवर स्वतंत्र हक्क प्रस्थापित होत नाही.

जेव्हा एखाद्या सकृद्दर्शनी केसमध्ये प्रतिवादीस पीडितेस आर्थिक खर्च द्यायचा असतो तेव्हा तो पूर्णपणे देण्यास नकार देण्याऐवजी वकील प्रतिवादी देऊ शकत असलेली रक्कम सांगून केस लांबवणे टाळू शकतो. त्यामुळे न्यायालयास प्रतिवादीच्या देय क्षमतेचे चित्र सुस्पष्ट होण्यास साहाय्य  होईल. यामुळे दोन्ही पक्षांस फायदा होईल तो असा की पीडितेस आर्थिक साहाय्य मिळेल आणि प्रतिवादीस त्याला किती रक्कम देणे शक्य आहे ते सांगण्याची संधी मिळेल.

न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी न केल्यास गंभीर परिणाम होऊ शकतात हे प्रतिवादीच्या वकिलाने सांगावे आणि त्यास न्यायालयाच्या आदेशांचे पालन करण्याविषयी मार्गदर्शन करावे. त्याचप्रमाणे जेव्हा न्यायदंडाधिकारी फौजदारी कायद्यान्वये कारवाई करण्याचे ठरवतात तेव्हा प्रतिवादीची आदेशाचे पालन करण्यापासून तसेच त्याची अंमलबजावणी करण्यापासून सुटका होत नाही.

अंतिमतः दोन्ही पक्षांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांची सत्य परिस्थिती मांडण्यात आणि कायदा खऱ्या अर्थाने लागू करण्यात महत्त्वाची भूमिका असते जेणेकरून कायद्याची प्रभावी आणि यशस्वी अंमलबजावणी होते.

# परिशिष्टे

परिशिष्ट १

फॉर्म क्र. ४

[नियम 8(1)(ii)]

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ नुसार हिंसाग्रस्त व्यक्तिंच्या अधिकारांची माहिती

१. तुमच्याबरोबर राहत असलेल्या व्यक्तिकडून तुम्हाला मारहाण होत असेल तुमचा छळ होत असेल किंवा तशी धमकी दिली जात असेल तर ती तुमच्यावर होणारी हिंसाच आहे. सदर कायद्यापासून तुम्हाला सर्व प्रकारच्या हिंसेपासून संरक्षण मिळणे व त्याची सर्व माहिती, मार्गदर्शन, मदत व सहकार्य मिळणे हा तुमचा अधिकार आहे.

२. तुमच्याशी किंवा तुमच्यावर अवलंबून व तुमच्या ताब्यात असलेल्या मुलांशी तुमच्याबरोबर राहणारी व्यक्ती पुढील कोणत्याही प्रकारचे वर्तन करत असेल तर तुम्हाला या कायद्याअंतर्गत संरक्षण व मदत मिळवण्याचा अधिकार आहे.

अ. शारीरिक छळ

- मारहाण,
- चापट्या मारणे
- झोडपणे
- चावणे
- ठोसे, बुक्क्या मारणे
- लाथा मारणे, ढकलणे
- भिंतीवर किंवा जमिनीवर धरून आदळणे
- किंवा याव्यतिरिक्त शरीराला वेदना व दुखापत होईल असे कोणतेही वर्तन

ब. लैंगिक छळ

- उदाः जबरदस्तीने लैंगिक संभोग
- अश्लील साहित्य पाहण्याची जबरदस्ती करणे
- तिच्या सन्मानास धक्का पोचेल
- तिला नकोसे होईल असे कोणतेही वर्तन
- लहान मुलांचा लैंगिक छळ

क. शाब्दिक किंवा भावनिक छळ

- उदाः अपमान करणे
- नावे ठेवणे
- वागणूक व चारित्र्यावर शिंतोडे उडवणे
- वाईट चालीची आहे असे ठरवणे
- हुंडा आणला नाही म्हणून अपमान करणे
- तुम्हाला किंवा तुमच्या ताब्यातील मुलांना शाळा, कॉलेज किंवा इतर कोणत्याही ठिकाणी जाण्यास मनाई करणे
- नोकरी / व्यवसाय करू न देणे
- असलेली नोकरी / काम सोडण्याची जबरदस्ती करणे,
- दररोजच्या संपर्कातील व्यक्तिंना भेटू न देणे,
- तुम्हाला नको असताना, तुम्हाला नको असलेल्या मुलाशी लग्न करण्याची तुमच्यावर जबरदस्ती करणे,
- तुमच्या पसंतीच्या जोडीदाराबरोबर लग्न करण्याची परवानगी न देणे,
- घरातील लोकांनी किंवा नातेवाईकांनीच ठरवलेल्या मुलाशी, त्यांनी सांगितलेल्या पध्दतीनेच लग्न करण्याची जबरदस्ती करणे,
- त्यांच्या मनाप्रमाणे न वागल्यास आत्महत्या करेन अशी धमकी देणे,
- किंवा इतर कोणत्याही पध्दतीचा भावनिक व शाब्दिक छळ .

ड. आर्थिक छळ

- उदाः तुमच्या व तुमच्या मुलांच्या दैनंदिन खर्चासाठी तुम्हाला पैसे न देणे
- तुमच्या व तुमच्या मुलांच्या अन्न, वस्त्र, व निवारा, औषधपाणी अशा साध्या गरजाही न पुरवणे.
- तुम्हाला नोकरी व्यवसाय करू न देणे
- तुमच्या नोकरी व्यवसायामध्ये अडथळे आणणे,
- कोणताही नवीन व्यवसाय सुरू करू न देणे,
- तुमचा पगार मजुरी तुमच्याकडून हिसकावून घेणे,
- तुमचा पगार , मजुरीचे पैसे वापरण्याची तुम्हाला परवानगी न देणे,

- घराच्या काही भागात प्रवेश करू न देणे, किंवा तो भाग वापरण्याची परवानगी न देणे
- कपडे भांडी किंवा इतर दैनंदिन गरजेच्या वस्तु वापरण्याची परवानगी न देणे
- भाड्याच्या घरात राहत असताना घरभाडे न भरणे,
- याप्रकारचे इतर कोणतेही वर्तन

३. क्र.२ मधील वर्णनानुसार तुमच्याबरोबर राहत असलेल्या किंवा राहत होत्या अशा कोणत्याही व्यक्तिने तुमचा छळ केल्यास त्याच्या विरुध्द तुम्हाला पुढीलपैकी एक अथवा सर्व प्रकारचे आदेश मिळवता येतील.

(अ) कलम १८ नुसार

१. तुमचा व तुमच्या मुलांचा होणारा छळ ताबडतोब थांबवणे.
२. स्त्री–धन, दागिने, कपडे इ. तुमच्या वस्तु तुम्हाला परत करणे,
३. तुमच्या परवानगीशिवाय तुमचे बँकेचे खाते किंवा लॉकर न वापरणे,

(ब) कलम १९ नुसार

१. तुम्ही राहत असलेल्या घरात राहण्यास तुम्हाला मनाई न करणे
२. शांतपणे घरात राहण्यास तुम्हाला कोणतेही अडथळे न आणणे,
३. तुम्ही राहत असलेल्या घराची कोणत्याही प्रकारे तोडफोड न करणे, किंवा त्या घराची विक्री व तत्सम व्यवहार न करणे,
४. भाडे तत्त्वावर घरात राहत असल्यास वेळेवर भाडे भरणे, किंवा तुमच्या राहण्यासाठी तुम्हाला सोईची असेल व पूर्वीच्या घरातील सर्व सुविधा उपलब्ध असतील अशी राहण्याची पर्यायी व्यवस्था करणे,
५. कोर्टाच्या परवानगीशिवाय राहत्या घराचे कोणतेही हक्क हस्तांतरित न करणे,
६. राहत्या घरावर कोणतेही कर्ज न काढणे, किंवा कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा त्या घरावर न चढवणे,
७. तुमच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असे खालीलपैकी आदेश

(क) कलम १९ नुसार सर्वसाधारण आदेश

१. तक्रार केल्यानुसार कौटुंबिक हिंसेचे प्रकार ताबडतोब थांबवणे.

(ड) कलम १९ नुसार विशेष आदेश

१. तुमच्या राहत्या ठिकाणापासून व कामाच्या ठिकाणापासून त्याने दूर राहणे
२. तुम्हाला भेटण्याचा कोणताही प्रयत्न न करणे
३. तुमच्याशी इ-मेल, पत्र, फोन अशा कोणत्याही माध्यमातून संपर्क साधण्याचा प्रयत्न न करणे,
४. तुमच्या लग्नाची बोलणी न करणे, त्यांच्या पसंतीच्या स्थळाला भेटण्याची लग्नसंदर्भात भेटण्याची जबरदस्ती न करणे,
५. मुलांच्या शाळेपासून किंवा तुम्ही मुले जिथे नेहमी वावरतात अशा ठिकाणांपासून त्याने स्वतःला दूर ठेवणे,
६. त्याच्याजवळ असलेली शस्त्रे, बंदूक, पिस्तूल, किंवा इतर धोकादायक वस्तू त्याने ताबडतोब जमा करणे,
७. बंदूक, पिस्तूल, शस्त्रे किंवा कोणत्याही धोकादायक वस्तू स्वतःजवळ बाळगणे
८. दारू, ड्रग्ज, किंवा कौटुंबिक छळाला खतपाणी मिळेल असे कोणतेही व्यसन न करणे
९. तुमच्या व तुमच्या मुलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असे इतर आदेश

(इ) कलम २० आणि २१ नुसार आर्थिक तरतुदींसाठी अंतरिम आदेश

१. तुमच्या व तुमच्या मुलांच्या उदरनिर्वाहासाठी खर्च
२. तुम्हाला कौटुंबिक हिंसेमुळे झालेल्या दुखापतीसाठी औषधपाण्याचा खर्च व दुखापतीची नुकसान भरपाई,
३. मानसिक छळ व भावनिक ओढाताणीची नुकसान भरपाई
४. हिंसेच्या काळात नोकरी, व्यवसाय, मजुरीतील बुडालेल्या उत्पन्नाची भरपाई
५. हिंसेच्या प्रकारात घराची, घरातील वस्तुंची झालेली तोडफोड, तुमच्या हिसकावून घेतलेल्या वस्तू या सर्वांचा मोबदला.

टीपः १. वरीलपैकी आदेश हे तुम्ही न्यायालयात तक्रार दाखल केल्यावर तात्पुरत्या, अंतरिम स्वरूपाचे मिळू शकतात.

२. या फॉर्म क्र. १ मध्ये उल्लेख केलेल्या तक्रारीला कायद्यामध्ये कौटुंबिक घटना अहवाल असे म्हटले आहे.

४. तुमच्यावर जर कौटुंबिक हिंसा होत असेल, तर या कायद्यानुसार तुमचे हक्क पुढीलप्रमाणे आहेत

१. कलम ५ नुसार सर्व सुविधा तसेच सुरक्षा अधिकारी व सेवादायी संस्थांकडून सर्व प्रकारच्या सेवा सुविधा मिळणे.
२. कलम ९ व १० नुसार तक्रार दाखल करताना व न्यायालयामध्ये अर्ज दाखल करताना सुरक्षा अधिकारी, जवळच्या पोलीस चौकीतील अधिकारी व सेवादायी संस्थांकडून मदत व मार्गदर्शन मिळणे.
३. कलम १८नुसार तुमच्या व तुमच्या मुलांच्या सुरक्षिततेची हमी घेतली जाणे,
४. तुम्हाला व तुमच्या मुलांना जर काही असुरक्षितता जाणवत असेल तर त्यापासून सुरक्षितता मिळणे.
५. ज्या ठिकाणी तुमच्यावर हिंसा झाली त्या ठिकाणी तुमच्या राहत्या घरात सुरक्षित राहता येणे, कलम १९ नुसार त्या घरात तुम्ही शांततेने राहण्यात अडथळे न आणले जाणे, अडथळे आणणाऱ्या पुरुषाने त्या घरापासून दूर राहावे असा त्याच्या विरुध्द आदेश मिळणे,
६. कलम १८नुसार तुमचे स्त्री धन, दागिने, कपडे इतर दैनंदिन गरजेच्या वस्तू व घरातील आवश्यक सामान इत्यादींचा ताबा तुम्हाला परत मिळणे.
७. कलम ६,७,९,१४ नुसार तुमच्या गरजेनुसार वैद्यकीय सुविधा, आधारगृह,समुपदेशन,कायदेविषयक मोफत सेवा उपलब्ध होणे.
८. कलम १८मध्ये सांगितल्याप्रमाणे, तुमचा छळ करणाऱ्या व्यक्तीस त्याने तुमच्याशी कोणताही संपर्क साधू नये असा आदेश मिळणे,
९. कलम २२नुसार कोणत्याही शारीरिक ,मानसिक, दुखापतीची किंवा आर्थिक नुकसानीची भरपाई मिळणे,
१०. कलम १२, १८, १९, २०,२१, २२, २३ नुसार सेवा मिळण्यासाठी थेट न्यायालयात अर्ज दाखल करणे.
११. तुम्ही अथवा तुमचे मूल यांनी काही वैद्यकीय मदत घेतली असल्यास त्याचा दाखला,कोर्टामध्ये अर्ज दाखल केला असल्यास किंवा कोणतीही तक्रार दाखल केली असल्यास त्याची निःशुल्क प्रत मिळणे.

१२. कौटुंबिक हिंसेसंदर्भात कोणत्याही अधिकाऱ्यानी एखादी नोंद घेतली असेल तर त्याची प्रत मिळणे.

१३. तुमचा जीव धोक्यात असेल तेव्हा त्या परिस्थितीतून तुमची सुटका करण्यासाठी सुरक्षा अधिकारी व पोलीस यांची मदत व मार्गदर्शन मिळणे.

५. हा फॉर्म तुम्हाला देणाऱ्या व्यक्तीने तो तुम्हाला देण्यापूर्वी त्यामध्ये खालील माहिती भरून द्यायची आहे.

| संस्थेचे नाव | सेवादायी संस्था | संपर्कासाठी तपशील |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

---------------------------------------------------------------------------------

परिशिष्ट २

**फॉर्म नं.५**

**सुरक्षा नियोजन तक्ता.**

See rule 8(1)(iv)

| **अ.क्र** | **स्त्रीवर झालेली हिंसा** | **'अ' रकान्यामध्ये दिलेल्या हिंसेचा तिच्यावर झालेला परिणाम** | **हिंसेच्या संदर्भात स्त्रीला जाणवणार धोका** | **सुरक्षीततेसाठी घेण्याची खबरदारी** | **न्यायालया कडून मिळविण्याचे आदेश** |
|---|---|---|---|---|---|
| | अ | ब | क | ड | इ |
| १. | शारीरिक हिंसा | असा हिंसक प्रकार परत घडण्याची भीती | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल,<br>३. जास्त दुखापत होईल,<br>४. इतर काही | | |
| २. | लैंगिक छळ व शिव्या तिला अपमानास्पद वाटेल असे इतर वर्तन | १. नैराश्य येईल,<br>२. अशी हिंसा परत होण्याची भिती<br>३. लैंगिक छळाच्या प्रयत्नांनाही तोड द्यावे लागेल. | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल,<br>३. जास्त दुखापत होईल,<br>४. इतर काही | | |
| ३. | तिच्यावर हत्याराने वार करण्याचा प्रयत्न करणे | १. शारीरिक दुखापत<br>२.मानसिक दडपण आणि अस्वास्थ्य<br>३. इतर काही, | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल,<br>३. जास्त दुखापत होईल,<br>४. इतर काही | | |
| ४. | मुलांना मारहाण करणे | १. मुलांना दुखापत होईल.<br>२. त्यांच्या मनावर वाईट परिणाम होईल,<br>३. इतर काही. | १. पुन्हा मारहाण होऊ शकते<br>२. त्यांच्या हिंसक वागणूकीमूळे घरातील वातावरण बिघडेल त्यांचा मुलांवर वाईट परिणाम होतो<br>३. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | आत्महत्या करण्याची धमकी हिंसाग्रस्त स्त्रीला दिली जाणे. | १. घरातील वातावरण तणावाचे होते<br>२. सुरक्षीततेला धोका निर्माण होतो<br>३. इतर काही | १. आत्महत्येचा प्रयत्नं करेल<br>२. पुन्हा पुन्हा प्रयत्नं करेल<br>३. इतर काही. | | |
| ६. | आत्महत्येचा हिंसक व्यक्तीने प्रयत्नं करणे | १. घरामध्ये हिंसक वातावरण होते<br>२. असुरक्षीतता भिती,नैराश्य, वैफल्य आणि मानसिक धक्का स्त्ीला बसू शकतो.<br>३. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा प्रयत्नं करेल,<br>२. मानसिक ताण,दुःख.<br>३. इतर काही. | | |
| ७. | मानसिक आणि भावनिक छळ उदा.अपमान खिल्ली उडवणे,नावे ठेवणे, मुलगा होत नाही म्हणून अपमान करणे वाईट चालीची असल्याचे खोटे आरोप करणे | १. वैफल्य,नैराश्य येऊ शकते,<br>२. मानसिक ताण,तीव्र,दुःख होईल<br>३. मुलांच्या विकासासाठी हे वातावरण योग्य नसेल<br>४. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा छळ,होईल<br>२. मानसिक ताण दुःख<br>३. इतर काही. | | |
| ८. | हिंसाग्रस्त स्त्री,तिची मुले किंवा तिचे नातेवाईक यांना इजा पोहोचवण्याच्या घमक्या देणे | १. सतत काळजी वाटत राहील<br>२. मानसिक ताण दुःख<br>३. इतर काही | १. धमकी दिल्याप्रमाणे खरंच काही इजा पोहोचवेल<br>२. मानसिक ताण,दुःख<br>३. इतर काही | | |
| ९. | शाळा,महाविद्यालय किंवा इतर कोणत्याही शैक्षणीक उपक्रमात सहभागी होऊ न देणे | १. वैफल्य,नैराश्य येऊ शकते,<br>२. मानसिक ताण,तीव्र,दुःख होईल<br>३. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा असा त्रास दिला जाईल.<br>२. मानसिक ताण,दुःख<br>३. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | तिच्या मनाविरुध्द लग्न करण्यास भाग पाडणे,तिच्या पसंतीच्या जोडीदाराबरोबर लग्न करू न देणे,घरातील लोकांच्या पसंतीच्या मुलाशी लग्न करण्याची जबरदस्ती करणे | १. वैफल्य,नैराश्य येऊ शकते,<br>२. मानसिक ताण,दुःख<br>३. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा असा त्रास दिला जोईल.<br>२. मानसिक ताण दुःख<br>३. इतर काही. | | |
| ११ | मुलांना किडनॅप करण्याची,पळवून नेण्याची धमकी देणे | १. मुलांची सतत काळजी लागुन राहील.<br>२. मुलांच्या सुरक्षीततेला धोका निर्माण होईल.<br>३. इतर काही | १. मुलांना पळवून नेले◌े जाईल.<br>२. इतर काही | | |
| १२ | हिंसाग्रस्त स्त्रीला, तिच्या मुलांना किंवा तिच्या नातेवाईकांना मारहाण,दुखापत करणे | १. पुन्हा मारहाण होईल अशा दडपणाखाली सतत रहावे लागू शकते.<br>२. इतर काही. | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल<br>३. जास्त दुखापत होइ◌्◌्ल<br>३. इतर काही. | | |
| १३ | हिंसक व्यक्तीच्या व्यसनांमूळे होणारा त्रास | १. तो त्यं◌ाच्या व्यसनामूळे मारहाण किंवा<br>२. इतर काही त्रास देईल याची सतत भिती आणि दडपण येते<br>३. दैनंदिन आयुष्य सुरळीत राहू शकत नाही.<br>३. इतर काही | १. व्यसन केल्याचे निमित्त सांगून हिंसक वर्तन सहन करावे लागू शकते.<br>२. व्यसन केल्यावर अधिक त्रासदायक वर्तन करेल<br>३. घरखर्चासाठी तिला तो पैसे देणार नाही.<br>२. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | त्याची वृत्ती गुन्हेगारी असेल यापूर्वी गुन्हेगारी रेकॉर्ड असेल | १. हिंसा होईल अशी सततची भिती काळजी वाटत राहील.<br>२. सुडवृत्तीने तो वागेल अशी भिती | १. कायदे नियमांच्या विरोधात वागण्याची वृत्तीच असल्याने न्यायालयाने हिंसा थांबवा असा दिलेला आदेश पाळेल याची खात्री देता येत नाही.<br>२. हिंसाग्रस्त स्त्री,तिची मुले त्याच्या पासून धोका होऊ शकतो<br>२. इतर काही. | | |
| १५ | अन्न,वस्त्र,निवारा औषधे,अशा दैनंदिन खर्चासाठी तो पैसे देणार नाही | | १. मुलाच्या आणि स्वतःच्या गरजा भागवताना खूप ओढाताण होऊ शकते<br>२. इतर काही. | | |
| १६ | तिला नोकरी व्यवसाय करू दिला जाणार नाही,रस असलेल्या कामात अडथळे आणले जातील | १. स्वतःच्या आणि मुलांच्या किमान गरजा पुर्ण करू शकणार नाही<br>२. इतर काही. | १. मुलांच्या आणि स्वतःच्या गरजा भागवताना खूप ओंढाताण होऊ शकते<br>२. इतर काही. | | |
| १७ | घरातून घालवून देणे घराचा ठरावीक भाग वापरण्यास परवानगी न देणे | १. स्त्री व मुले बेघर होण्याची भिती<br>२. घराच्या ठरावीकच भागात कोंडल्यासारखे वावरावे लागू शकते | १. स्त्रीची आणि तिच्या मुलांची सुरक्षीतता धोक्यात येते,<br>२. मुलांसाठी आणि स्वतःसाठी किमान निवऱ्याची सोय करताना खूप प्रयत्नं करावे लागतील.<br>२. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | कपडे,भांडी व इतर दैनंदिन गरजेच्या वस्तू वापरण्याची परवानगी न देणे | १. तिच्या वस्तुंवर तिचा ताबा राहणार नाही.<br>२. त्या सर्व वस्तु परत आणण्याची ऐपतही नसेल. | १. तो त्या वस्तु विकुनही टाकू शकेल<br>२. इतर काही. | | |
| १९ | भाडेतत्वावर घरात रहात असेल तर घरभाडे न भरणे | १. घरभाडे न भरल्यामूळे घर सोडावे लागू शकते<br>२. राहण्याची पर्यायी व्यवस्था न होणे<br>३. पुन्हा स्वतः भाडयाने घर घेण्यासाठी पैसे नसणे | १. निवारा गमवेल<br>२. इतर काही | | |
| २० | तिचे स्त्रीधन व इतर मौल्यवान वस्तू तिच्या परवानगी शिवाय विकल्या जाऊ शकतील | १. तिच्या मौल्यवान वस्तू तिच्याकडे राहणार नाही.<br>२. इतर काही. | १.तिच्या वस्तू तिच्यापासून कायमच्या हिरावून घेतल्या जाऊ शकतील.<br>२. इतर काही. | | |
| २१ | तिचे स्त्रीधन तिच्याकडून काढून घेणे | १. ती तिच्या मौल्यवान वस्तूपासून वंचित राहील.<br>२. इतर काही | १. तो तिच्या सर्व वस्तु विकून टाकील किंवा त्यांची नासधूसही करेल.<br>२. त्या तिला कधीच मिळणार नाहीत अशी तिला भीती काळजी वाटू शकते.<br>३. इतर काही. | | |
| २२ | दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयाने दिलेला आदेश तो डावलून टाकेल | १. इतर काही | १. इतर काही | | |

**हिंसाग्रस्त स्त्रीची सही** **संरक्षण अधिकारी / सेवादायी संस्था**

परिशिष्ट ३

# Form 1

# अर्ज १

(नियम ५ (१) आणि १७ (३) पहा)

कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये

कलम ९ (ब) आणि ३७८ (२) (क) नुसार

# कौटुंबिक घटना अहवाल

१) **पीडित व्यक्ती बाबतचा तपशील:**

१. पीडित व्यक्तीचे नाव -

२. वय -

३. लग्नानंतरचा सामायिक घराचा पत्ता -

४. सध्याचा पत्ता -

५. दुरध्वनी क्रमांक

**२) प्रतिवादीची सविस्तर माहिती:**

| अ क्र | नाव | प्रतिवादी पीडीत व्यक्ती बरोबर नाते संबंध | पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**३)पीडीत व्यक्तीच्या मुलांविषयी सविस्तर माहिती:**

अ) मुलांची संख्या :

ब) मुलांविषयी सविस्तर माहिती :

| अ.क्र | नाव | वय | लिंग | मुलाचे सध्याचे वास्तव्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**४) कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना :**

**१) शारीरीक हिंसाचार:-**

| **अ. क्र.** | **दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ** | **कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती** | **कुठल्याही प्रकारची दुखापत झाली असल्यास कृपया स्पष्टीकरण देणे** | **तपशील** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## २)लैगिंक हिंसाचार

चौकोनात ( ✓) योग्य खुन करावी.

| अ. क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | हिंसाचाराचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|
| १. | | | ▪ सक्तीने लैंगिक संबंध ठेवणे<br><br>▪ अश्लिल चित्र बघण्यास सक्ती करणे<br><br>▪ दुसऱ्याच्या मनोरंजनासाठी तुमचा वापर केला असल्यास<br><br>▪ लैंगिक संबंधावद्दल इतर काही कृती अश्लिल शब्द वापरणे.<br><br>▪ अपमाणित करणे किंवा | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | इतर काही तुमच्या स्वाभिमानाला ठेच पोहचविणे (कृपया खाली दिलेल्याजागेवर या बाबतची सविस्तर माहिती देणे) | |

## ३)शाब्दिक आणि भावनिक हिंसाचार

चौकोनात ( ✓ ) योग्य खुन करावी.

| अ. क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | हिंसेचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ चारित्रयावर संशय घेणे/ वागणुकीबद्दल दोषी धरणे<br>▪ हुंडा न आणल्याबद्दल अपमाणास्पद वागणुक देणे, इत्यादी<br>▪ मुलगा होत नाही म्हणुन अपमान करणे<br>▪ मुल होत नाही म्हणुन अपमान करणे<br>▪ घालुन पाडुन बोलणे, अपमानकारक, उपहासणात्मक किंवा अपशब्द वापरणे, मानहानी करणे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ थट्टा करणे<br><br>▪ नावे ठेवणे<br><br>▪ शाळा कॉलेज किंवा इतर शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ नोकरी करु देण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ घराबाहेर पडण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ दुसऱ्या विशिष्ट व्यक्तीस भेटण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ तुमच्या इच्छेविरुद्ध लग्न करण्याची सक्ती करणे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ तुम्ही निवडलेल्या व्यक्तीबरोबर लग्न करण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ इतर मानसिक किंवा शाब्दिक छळ असल्यास (कृपया त्याचे स्पष्टीकरण खालील दिलेल्या जागेवर लिहिणे | |

## ४) आर्थिक हिंसाचार

चौकोनात ( ✓ ) योग्य खुन करावी.

| अ. क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | हिंसेचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ तुमच्या व मुलाच्या पालन पोषणासाठी घरखर्च न देणे<br>▪ तुम्हाला व तुमच्या मुलांना जेवण व औषध इत्यादी उपलब्ध करुन न देणे<br>▪ तुम्हाला जबरदस्तीने घराबाहेर काढणे<br>▪ घराचा कुठलाही भाग वापरण्यास प्रतिबंध करणे<br>▪ तुम्ही करत असलेली नोकरी /काम सोडण्यास भाग | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पाडणे /प्रतिबंध करणे<br><br>▪ नोकरी करण्यास परवानगी न देणे<br><br>▪ भाड्याच्या घरात राहत असल्यास भाडे न भरणे<br><br>▪ तूम्हाला कपडे किंवा इतर घरगुती वस्तु वापरु न देणे<br><br>▪ तुमच्या परवाणगीशिवाय तुमचे स्त्रीधन किंवा इतर मौल्यवान वस्तु विकणे किंवा गहाण ठेवणे<br><br>▪ बळजबरीने तुमचा पगार,कमाई किंवा मजुरी घेणे<br><br>▪ बिल न भरणे उदा. लाईट बिल इत्यादी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ इतर आर्थिके छळ(कृपया त्याचे स्पष्टीकरण खाली दिलेल्या जागेवर लिहिणे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**(४) हुंडयासंबंधी देण्यात येणारा त्रास-**

| **अ.क्र.** | **दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ** | **कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती** | **हिंसेचा प्रकार** | **तपशील** |
|---|---|---|---|---|
| १. | | | ▪ हुंडयाची मागणी करणे (कृपया याबाबत विवरण दयावे) | |
| २. | | | ▪ हुंडयाबाबत इतर काही माहिती असल्यास कृपया सविस्तर माहिती दयावी | |
| ३ | | | ▪ हुंडयाचे साहित्य, स्त्रीधन, इ. बाबतची सविस्तर माहिती या अर्जासोबत जोडलेली आहे का?<br>होय<br>नाही | |

### ५) कौटुंबिक हिंसाचाराबाबत तुमच्या व मुलांविषयी इतर काही माहिती असल्यास:-

| | |
|---|---|
| १. | |

### ६) सोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी

| कागदपत्रांची नावे | दिनांक | इतर सविस्तर माहिती |
|---|---|---|
| कायदेशीर वैदयकीय प्रमाणपत्र | | |
| डॉक्टरांचे प्रमाणपत्र किंवा इतर कोणतीही डॉक्टरांनी सांगितलेली औषधे | | |
| इतर काही कागदपत्रे असल्यास | | |
| | | |
| | | |

### ७) कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण अधिनियम २००५ तुम्हाला गरज असलेले आदेश

| अ.क्र | आदेश | होय/नाही | इतर काही |
|---|---|---|---|
| १. | कलम 14 अन्वये | | |
| 2 | कलम 17 अन्वये | | |
| ३. | कलम 18 अन्वये | | |
| ४. | कलम 19 अन्वये | | |
| ५. | कलम 20 अन्वये | | |
| ६. | कलम 21 अन्वये | | |
| ७. | कलम 22 अन्वये | | |
| 8 | कलम 23 अन्वये | | |

## ८) तुम्हाला पाहिजे असलेली मदत

| अ.क्र. | उपलब्ध सहाय्य मदत | होय/नाही | मदतीचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | समुपदेशन | | |
| २. | पोलिस मदत | | |
| ३. | फौजदारी कारवाईसाठी मदत | | |
| ४. | आधार गृह | | |
| ५. | वैदयकिय मदत | | |
| ६. | कायदयाची मदत | | |

## ९)कौटुंबिक घटना अहवाल नोंद करण्यास मदत करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याला सूचना:-

या नमुन्यातील माहितीमधुन पोलिसांच्या असे लक्षात आले की, भारतीय दंड विधान संहिता किंवा इतर कोणत्याही कायदयाने सांगितलेला गुन्हा घडला आहे तर पोलिस अधिकाऱ्याने-

(अ) हिंसाग्रस्त व्यक्तीला माहिती दिली पाहिजे की, अशा गुन्हयाबद्दल आरोपी व्यक्तीविरुद्ध फौजदारी प्रक्रिया , १९७३ (१९७४ च्या २ ) अन्वये करु शकते.

(ब)तिला फौजदारी कार्यवाही करायची नसेल तर तशी नोंद रोजनिशीमध्ये केली पाहिजे.त्यामध्ये या बाबीचा आवर्जुन उल्लेख करावा की हिंसाग्रस्त व्यक्तीचा आरोपीवर अत्यंत सलगीचा संबंध असल्यामुळे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण व्हावे म्हणुन दिवाणी उपाय करण्याची तिची इच्छा आहे आणि तिने अशी विनंती केली आहे की तिला मिळालेल्या माहितीनुसार प्रथमदर्शनी माहिती अहवाल नोंदणी करण्याअगोदर सदर बाब अनिर्णित ठेवावी.

(क) हिंसाग्रस्त व्यक्तीने शारिरिक दुखापत किंवा त्रास याबाबत सांगितले असेल तर तिला त्वरीत वैदयकीय अधिकाऱ्यापासुन तिची वैदयकीय तपासणी करुन घेतली पाहिजे.

ठिकाण -

दिनांक -

पीडीत व्यक्तीची सही / अंगठा

नाव-

संरक्षण अधिकारी/ सेवादायी संस्था

सही व शिक्का

नाव-

पत्ता-

**प्रत रवाना-**

१.स्थानिक पोलिस ठाणे
२.सेवादायी संस्था / संरक्षण अधिकारी
३.पीडीत व्यक्ती
४.न्यायदंडाधिकारी

परिशिष्ट ४

**फॉर्म - ३**

# कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण अधिनियम

# २००५ कलम २३(२) चे प्रतिज्ञापत्र (२००५ चा ४३ )

मे. न्यायदंडाधिकारी ......................... ............................................. यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.**

सौ. ...................................................................................

वय- ................. वर्षे. व्यवसाय-

**अर्जदार**

पत्ता- रा द्वारा...................................................................

...................................................................................................

**विरुद्ध**

श्री ..............................................................................................

वय- ...................वर्षे. व्यवसाय-नोकरी

**जाबदेणार**

पत्ता - रा द्वारा ........................................................................

...................................................................................................

## प्रतिज्ञापत्र

मी ...............................................................श्री.........................................................................................यांची
पत्नी/ मुलगी/विधवा/ राहणार ..........................................................................................................................

सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की,

१. की माझ्या करीता किंवा माझ्या मुलाच्या / मुलीच्या वतीने ..........................................................................
याकरीता केलेल्या अर्जातील मी अर्जदार आहे.

२. की मी ....................................................................................................................................याची नैसर्गिक पालक आहे.

३. की मला या प्रकरणातील सर्व तथ्ये व परिस्थिती माहित आहे आणि म्हणुन हे प्रतिज्ञापत्र करण्यास मी समर्थ आहे.

४. की अभिसाक्षी प्रतिवादी सोबत.......................... ...........................................................येथे गेली ..................दिवस राहत होती.

५. सदर अर्जामधील सर्व तपशील लाभ कलम / कलमे ......................................................................अन्वये मान्य करावा यासाठी माझ्या संमतीने दाखला केला आहे.

६. की अर्जातील सर्व मजकुर हा मला वाचुन दाखविण्यात आला आहे आणि त्याचा आर्थ इंग्रजी/हिंदी स्थानिक भाषेत(स्थानिक भाषा.......................)मला समजावुन सांगण्यात आला आहे.

७. की अर्जातील सर्व मजकुर सोयी करीता व पुरावृत्ती टाळण्याकरीता या प्रतिज्ञापत्राचा एक भाग म्हणुन वाचण्यात यावा.

८. की अर्जदारास असे वाटते कि प्रतिवादीकडुन कौटुंबिक हिंसाचार न होण्यासाठी जी मदत अर्जात मागितली आहे तो कौटुंबिक हिंसाचार प्रतिवादी कडुन पुन्हा होईल.

९. की अर्जदारास प्रतिवादीने असे धमकाविले आहे की.

....................................................................................................................................................................

....................................................................................................................................................................

....................................................................................................................................................................

....................................................................................................................................................................

१०.	की प्रतिज्ञापत्रा सोबत केलेला विनंती अर्ज तातडीचा असुन तो मंजुर करण्यात यावा जर अंतरिम एकतर्फी विनंती अर्ज अमान्य केला तर अर्जदारास खुपच आर्थिक त्रासास तोंड दयावे लागेल आणि अर्जात कथन केल्यानुसार प्रतिवादीकडुन अर्जदारास पुन्हा कौटुंबिक हिंसाचार जबरदस्तीने पुन्हा सहन करावा लागेल.

११.	की सदर अर्जात नमुद केलेली सर्व तथ्ये ही माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहेत तसेच कोणत्याही गोष्टी लपवून ठेवलेल्या नाहीत यातील कोणतेही भागातील कथने खोटी नाहीत.

अभिसाक्षी-

## सत्यता

सत्यता तपासुन घेतली............................................ठिकाणी.......................................................................या तारखेला सदर प्रतिज्ञापत्रात कथन केलेला सर्व मजकूर हा माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असुन कोणत्याही गोष्टी लपवुन ठेवलेल्या नाहीत तेव्हाच हे प्रतिज्ञापत्र केले आहे.

संरक्षण अधिकाऱ्याची सही व शिक्का

पीडीत व्यक्तीची सही